

श्री।जिनभक्तपरायण, गुरुसेवातत्पर, विद्याप्रेमी
श्रीयुत शहा माणिकचंद मोतीचंद जाळंदकर
यांच्या धार्मिक प्रेमाचें स्मरण रहावें म्हणून
ही कहाण्यांची कृति समाजापुढें ठेवित आहोत.

हरणाप्पा काळप्पा आंबे
पाठशालाध्यापक
आळंद

वर्धमान छा. सोलापुर.

॥ ॐ नमः सिद्धेभ्यः ॥

श्री भट्टाकलंकदेव विरचितम् ॥

स्वरूप संबोधनम् ।

मुक्ताऽमुक्तैकरूपो यः कर्मभिः संविदादिभिः ।
अक्षयं परमात्मानं ज्ञानमूर्तिं नमामि तम् ॥ १ ॥

अर्थ—श्री अकलंकदेव मंगलाचरणामध्यें परमात्म्याला नमस्कार करून त्यांची स्तुति करितात. ती अशी-जो ज्ञानावरण, दर्शनावरण, वेदनीय, मोहनीय, आयु, नाम, गोत्र आणि अंतराय या आठ द्रव्य कर्मांपासून, रागद्वेषादिक भावकर्मांपासून व शरीरादिक नोकर्मांपासून मुक्त झालेला (सुटलेला) असून, जो ज्ञानादि गुणानीं मुक्त झालेला नाहीं असा आहे. ज्याचा कधींही नाश होत नाहीं, व जो ज्ञानस्वरूपी आहे अशा परमात्म्याला म्हणजे १००८ नांवानें युक्त अशा तीर्थंकराला मी नमस्कार करितों.

भावार्थ—आचार्यांनीं या ग्रंथांत स्याद्वाद शैलीनें तत्त्व प्रतिपादन व त्याबरोबर परमत खंडन केल्याचें दृग्गोचर होतें.

परमात्मा मुक्ताऽमुक्त स्वरूप आहे, असें म्हटल्यानें कित्येक अशी शंका उपस्थित करतील कीं,

जो मुक्त आहे तो मुक्त नाहीं हें परस्पर विरुद्ध दिसतें. ज्या प्रमाणें शीत व उष्ण हे विरुद्ध धर्म असल्यानें शीततेच्या स्थानीं उष्णता राहात नाहीं, व उष्णतेच्या स्थानीं शीतता राहत नाहीं, त्याप्रमाणें मुक्तत्व व अमुक्तत्व हे दोन्ही परस्पर विरोधी धर्म असल्यानें मुक्तत्व ज्या ठिकाणीं राहील त्या ठिकाणीं अमुक्तत्व राहणार नाहीं. किंवा ज्या ठिकाणीं अमुक्तत्व राहील त्या ठिकाणीं मुक्तत्व राहणार नाहीं. [illegible]

होंचा आधार भिन्न भिन्न असला पाहिजे. मुक्तत्व व अमुक्तत्व हे दोन्ही धर्म एकाच आधारामध्यें राहिल्यास त्यांचा संकर होईल म्हणजे हे दोन्ही धर्म एकमेकामध्यें मिसळून जातील. अथवा त्यांचा व्यतिकर होईल म्हणजे मुक्तत्व अमुक्तत्व होईल किंवा अमुक्तत्व मुक्तत्व होईल. याप्रमाणें विरोध, वैयधिकरण्य, संकर, व्यतिकरादि दोष उपस्थित होतील असें म्हणणें, हें अयुक्तिक आहे याविषयीं आचार्य पंचाध्यायींमध्यें म्हणतात कीं—

विरुद्धधर्मयोरेव वैपक्षं नाविरुद्धयोः ।
शीतोष्णधर्मयोर्वैरं न तत्क्षारद्रवत्वयोः ॥ ३२६ ॥

अर्थ—ज्यामध्यें परस्पर विरुद्ध धर्म आहे. तोच विपक्ष होऊं शकतो. उदाहरणार्थ जसें शीत व उष्ण हे दोन्ही विरुद्ध असल्यानें या दोहोंमध्यें परस्पर वैर आहे.

जे परस्पर विपक्ष होऊं शकत नाहींत त्यांचा कधींच विरोध येत नाहीं. जसें समुद्रांतील पाण्यामध्यें द्रवत्व म्हणजे पातळपणा व क्षारत्व म्हणजे खारटपणा हे दोन्ही धर्म अविरुद्ध रीतीनें राहिलेले आहेत. किंवा ज्याप्रमाणें मनुष्य आपल्या बापाच्या अपेक्षेनें मुलगा होतो व आपल्या मुलाच्या अपेक्षेनें तोच मनुष्य बाप होतो. तेव्हां पुत्रत्व आणि जनकत्व हे दोन्ही धर्म एकाच ठिकाणीं विरोध न येतां राहतात, त्याप्रमाणें अपेक्षाभेदानें मुक्तत्व व अमुक्तत्व हेहि धर्म परमात्म्याच्या ठिकाणीं विरोध न येतां राहूं शकतात. यास्तव वेगळ्या आधाराची आवश्यकता नाहीं. पदार्थ सामान्य आणि विशेष धर्मांना स्वतःच धारण करीत असल्यानें त्यांचा संकर होत नाहीं. जसें अनेक प्रकारचे रंग काचेंत दिसत असून ही त्यांचा संकर होत नाहीं. संकर न होतां हे धर्म राहत असल्यानें व्यतिकर दोषाची भीति बाळगण्याचें कारणच नाहीं. याप्रमाणें विरोध, वैयधिकरण्य, संकर, व्यतिकरादि दोष येत नसल्यानें आचार्यांनीं भिन्न भिन्न अपेक्षेनें परमात्म्याला मुक्ताऽमुक्त म्हटलें तें योग्यच. आहे. ज्ञाना-

वरणादि समस्त कर्मापासून सुटला, या अपेक्षेनें तो मुक्त आहे. ज्ञान दर्शनादिक गुणांपासून तो सुटत नाहीं, या अपेक्षेनें अमुक्त आहे, कारण कर्म हें भिन्न द्रव्य आहे म्हणून त्यापासून याला जसें सुटतां आलें, तसें केवलज्ञान, अनंतदर्शन, अनंतसुखादिक आपल्या स्वगुणापासून सुटका करून घेतां येत नाहीं, या अपेक्षेनें तो अमुक्त आहे. जर तो आपल्या गुणापासून सुटला, तर त्यानें आपलें स्वत्वच गमावल्यासारखें झालें. आणि गुण व गुणी हे अभिन्न असल्यानें गुणांच्या अभावानें गुणीचाही अभाव होईल. मग वस्तु शून्यरूप झाली. परमात्म्याचें ज्ञान दर्शनादिक गुण नाहींसे झाल्यानें परमात्म्याचे ज्ञानमूर्तित्व नाहींसे होऊन तो जडमूर्ति होईल. मुक्त होणें म्हणजे जडपणा प्राप्त करून घेणें नसून आत्मामध्यें एकक्षेत्रावगाह संबंधानें राहिलेलें जडत्व घालवून शुद्ध चैतन्य कायम ठेवणें होय. याकरितां केवल ज्ञानादिक अनुजीवी गुणापासून आत्म्याची मुक्तता होत नाहीं हें सिद्ध आहे. नैयायिक व वैशेषिक मताचें अवलंबन करणाऱ्या लोकांनीं मुक्तात्म्याच्या ठिकाणीं ज्ञान दर्शनादि गुणांचा उच्छेद मानला आहे. हें त्यांचें मानणें चुकीचें आहे हें दर्शविण्याकरितां ' संविदादिभिरमुक्तः ' परमात्म्याच्या ज्ञानादि गुणांचा उच्छेद होत नाहीं असें म्हटलें आहे. कर्ममुक्त या विशेषणानें परमात्म्याला कर्मरहित मानणाऱ्या नैयायिकाचें खंडन तर झालेंच, पण त्याबरोबर दुसरेंहि अनुमान निघतें, तें हें कीं—

ज्याप्रमाणें सोन्याच्या खाणींतील सुवर्ण मूळचें मातींत मिसळलेलेंच सांपडतें, त्याप्रमाणें जीव हे कर्मांनीं जखडलेले असल्यानें मूळ सर्व जीव अशुद्ध अवस्थेंतच असतात, नंतर कर्मनाश करून मुक्त होतात.

परमात्म्याचा क्षय कधींच होत नाहीं म्हणून ' अक्षयं ' हें विशेषण दिलें आहे, कोणत्याही द्रव्याचा निरन्वय नाश होत नाहीं असा सिद्धांत आहे. जर द्रव्याचा निरन्वय नाश होऊं लागेल तर जग परमात्मशून्य होईल. याकरितां परमात्म्याचा क्षय होत नाहीं, परंतु शुद्ध स्वरूपांतच परि-

णांत चाललेली असते. जैन धर्मांत कोणतीही वस्तु कूटस्थ नित्य मानिली नाहीं. व युक्तीनेंही तेंच सिद्ध होतें.

परमात्म्याचा नाश होणें लांबच राहिलें पण त्यांच्यांत किंचित देखील वैभाविक विकार उत्पन्न होत नाहीं. याविषयीं स्वामी समंतभद्राचार्य म्हणतात,

काले कल्पशतेऽपिच गते शिवानां न विक्रिया लक्ष्या ।
उत्पातोऽपि यदि स्यात् त्रिलोकसंभ्रांतिकरणपटुः ॥ १ ॥

अर्थ—शेकडों कल्प काल गेले अथवा तीन्ही लोकांला भीति उत्पन्न होण्यासारखें भयंकर संकट जरी ओढवलें तरी मोक्षगामी जीवांना विकार उत्पन्न होत नाहीं. यावरून मुक्तजीव पुनः संसारांत येतात असें मानणाऱ्यांचें मत चुकीचें आहे हें सिद्ध होतें.

एक बहिरात्मा, दुसरा अंतरात्मा आणि तिसरा परमात्मा असें आत्म्याचे तीन भेद आहेत. आपल्या शुद्ध आत्मज्ञानापासून उत्पन्न होणारें जें खरें सुख त्या सुखाहून भिन्न असलेल्या इंद्रियसुखामध्येंच गढून गेलेला तो बहिरात्मा, किंवा शरीराहून भिन्न असलेला जो आत्मा त्या आत्मज्ञानानें रहित शरीरादिक परद्रव्यांच्या ठिकाणीं आत्मबुद्धि ठेवणारा म्हणजे मेदस्वरूप मी आहे असें मानणारा बहिरात्मा. अथवा हेय उपादेय पदार्थांचा विचार करणारें मन, व निर्दोष परमात्म्याहून भिन्न असलेले रागद्वेषादिक दोष, आणि शुद्ध चैतन्य लक्षणानें युक्त असा आत्मा या तिन्ही विषयीं अथवा वीतराग सर्वज्ञदेवांनीं सांगितलेल्या पदार्थांविषयीं नयविभागांनीं श्रद्धा आणि ज्ञान करून घेत नाहीं तोही बहिरात्मा होय. इत्यादिकांहून भिन्न असलेला म्हणजे इंद्रियसुखामध्येंच गढून न जाणारा, शरीरादिक परद्रव्यांच्या ठिकाणीं आत्मबुद्धि न ठेवणारा आणि नयविभागांची परस्पर अपेक्षा घेऊन वस्तुस्वरूपाचें ज्ञान करून घेणारा तो अंतरात्मा जाणावा. संपूर्ण लोकालोकाला निर्मल अशा केवल ज्ञानानें जो जाणतो व व्यापून टाकतो त्यास विष्णु म्हणतात. परब्रह्मरूप आपल्या शुद्ध आत्मभावनेनें उत्पन्न

होणाऱ्या सुखरूपी अमृतानें तृप्त झाल्यानें उर्वशी, तिलोत्तमादि देवांगनांनीं देखील ज्याचें ब्रह्मचर्यव्रत खंडित होत नाहीं त्याला परब्रह्म म्हणतात. केवल ज्ञानादि ऐश्वर्ययुक्त असल्यामुळें स्वर्गांतील इंद्राला देखील त्यांच्या पदवीची इच्छा असते यास्तव ज्यांची आज्ञा इंद्र देखील पालन करितात म्हणून त्यांना ईश्वर म्हणतात. केवलज्ञाना प्रत ज्यांचें ज्ञान पोंहचले म्हणून त्यांना सुगत म्हणतात, किंवा जो मोक्षाला गेला म्हणून त्यास सुगत म्हणतात. परमोत्कृष्ट ज्ञानानें युक्त अशा मोक्षाला गेला म्हणून त्यास शिव म्हणतात. याप्रमाणें १००८ नांवांनीं स्तविला जाणारा तो परमात्मा होय. पहिल्या तीन गुणस्थानामध्यें तारतम्यरूपानें बहिरात्मा व चवथ्या गुणस्थानांत जघन्य अंतरात्मा, बाराव्या गुणस्थानांत उत्कृष्ट अंतरात्मा, मधल्या गुणस्थानांत हीनाधिक रूपानें अंतरात्मा असतो. तेराव्या व चवदाव्या गुणस्थानीं एक देश अशुद्ध निश्चय नयानें सिद्धासारखा परमात्मा व सिद्ध साक्षात् परमात्मा होय. बहिरात्मा हेय आहे व अंतरात्मा व परमात्मा उपादेय आहेत. परमात्म्याची प्राप्ती करून देणारा असल्यानें अंतरात्माही उपादेय आहे.

परमात्म्याला ज्ञानमूर्ति म्हटल्यानें इतर गुण त्याच्या ठिकाणीं नाहींत असें नाहीं कारण ' संविदादिभिरमुक्तः ' या पदानेंच जी इतर गुणांची सिद्धि होते तर ' ज्ञानमूर्ति ' म्हणण्याचा उद्देश काय ? त्याचें स्पष्टीकरण असें आहे कीं कोणत्याही पदार्थाला इतर पदार्थापासून वेगळे करण्याकरितां त्याचें लक्षण सांगण्याची आवश्यकता असते, त्याप्रमाणें जीव द्रव्याला इतर पदार्थापासून जेणें करून लवकर ओळखतां येईल असें जर साधन असेल तर ज्ञानच एक मुख्य साधन आहे. त्या साधनानें आत्म्याची ओळख लवकर होते. म्हणून आत्म्याचें असाधारण लक्षण ज्ञान आहे. व त्या ज्ञानामध्येंच इतर पदार्थांना व स्वतःला जाणण्याची शक्ति असल्यानें इतर गुणापेक्षां ज्ञानगुणच श्रेष्ठ ठरतो. याविषयीं पंचाध्यायीमध्यें असें म्हटलें आहे कीं,—

ज्ञानाद्विना गुणाः सर्वे प्रोक्ताः सल्लक्षणाङ्किताः ।
सामान्याद्वा विशेषाद्वा सत्यं नाकारमात्रकाः ॥ ३९५ ॥
ततो वक्तुमशक्यत्वात् निर्विकल्पस्य वस्तुनः ।
तदुल्लेखं समालेख्य ज्ञानद्वारा निरूप्यते ॥ ३९६ ॥

अर्थः—ज्ञानाशिवाय इतर सर्व गुण सन्मात्र आहेत. ह्मणजे केवळ अस्तित्व दाखविणारे आहेत. सामान्य स्वरूपानें अथवा विशेषरूपानें ते निर्विकल्पच आहेत, ह्मणून निर्विकल्पक वस्तूंचें वर्णन होत नाहीं. याकरितां इतर गुणांचा उल्लेख ज्ञान गुणांनेंच करितां येतो. ह्मणून इतर गुणांपेक्षां ज्ञान गुणच श्रेष्ठ असल्यानें परमात्म्याला ज्ञानमूर्ति ह्मटलें आहे. यावरून परमात्म्यामध्यें इतर गुणांचा अभाव होत नसून सद्भाव सिद्ध करण्याला पुष्कळ पुरावे आहेत. ते असें—

संमत्त णाण दंसण वीरिय सुहुमं तहेव अवगहणं ।
अगुरुलघु अव्वाबाहं अट्ठगुणा हुंति सिद्धाणं ॥ १ ॥

अर्थ– सम्यक्त्व, ज्ञान, दर्शन, वीर्य, सूक्ष्मपणा, अवगाहन अगुरुलघु, अव्याबाध याप्रमाणें सिद्धामध्यें आठ गुण आत्मख्याति वचनिकेमध्यें जीवत्वशक्ति, चित् शक्ति, प्रभुत्वशक्ति, स्वच्छत्वशक्ति, इत्यादि अनेक शक्ति त्यामध्यें दाखविल्या आहेत. आत्म्यामध्यें जितके ह्मणून धर्म आहेत. ते सर्व आप आपल्या स्वरूपांनीं भिन्न आहेत. त्यांच्यामध्यें प्रदेशभेद नाहीं, ह्मणजे ज्ञानाचें क्षेत्र वेगळें दर्शनाचें क्षेत्र वेगळें, सुखाचें क्षेत्र वेगळें असें नसून ज्या क्षेत्रांत ज्ञान गुण आहे त्याच क्षेत्रांत सर्व इतर गुण राहिलेले आहेत. ह्मणून ज्ञानी ह्मटल्यानें ज्ञान गुणच तेवढा येत नसून तादात्म्य रूपानें राहिलेले सर्व गुण त्यामध्यें येतात असें समजावें.

सोऽस्त्यात्मा सोपयोगो यः क्रमाद्धेतुफलावहः ।
यो ग्राह्योऽग्राह्यनाद्यन्तः स्थित्युत्पत्तिव्ययात्मकः ॥२

अर्थ—जो ज्ञान व दर्शन या दोन्ही उपयोगाला धारण करितो असा आत्मा क्रमानें कार्यकारणरूप आहे, म्हणजे आत्मा कारण व उप-

योग हें त्याचें कार्य आहे. व जो केवलज्ञानानें ग्रहण करण्यास योग्य असल्यानें ग्राह्य स्वरूप असून बाह्य चक्षुरादि इंद्रियांनीं ग्रहण करितां येत नसल्यानें अग्राह्यही आहे. ज्याला आदि व अंत नसून जो उत्पत्ति, विनाश व ध्रौव्य स्वरूपी आहे.

भावार्थ—कोणतेंही कार्य होतें त्याला बाह्य व अंतरंग कारणांची आवश्यकताही असतेच. त्याप्रमाणें ज्ञान व दर्शनरूपी उपयोगात्मक ज्ञानालाही कारणांची आवश्यकता असतेच। उपयोगाचीं कारणें पंचाध्यायीमध्यें दाखविलीं आहेत त्यांपैकीं कांहीं देतो—

उपयोगविवक्षायां हेतुरस्याऽस्ति तद्यथा ।
अस्ति पंचेंद्रियं कर्म कर्म स्यान्मानसं तथा ॥ १ ॥

अर्थ—पदार्थाचें ज्ञान करून घेण्याकरितां आत्मा ज्यावेळीं पदार्थाकडे उन्मुख होतो त्याला ज्ञान होतें त्यालाच उपयोग म्हणतात.

श्रीमत्पूज्यपाद आचार्यांनीं उपयोगाचें लक्षण असें केलें आहे कीं,—

' उभयनिमित्तवशादुत्पद्यमानश्चैतन्यानुविधायी परिणाम उपयोगः ' बाह्याभ्यंतर अशा दोन्ही कारणांनीं उत्पन्न होणारा जो चैतन्यरूप परिणाम त्यास उपयोग असें ह्मणतात. श्रीमदकलंकदेवांनींही उपयोगाचें लक्षण तदनुरूपच केलें आहे. तें असें:—

' बाह्याभ्यंतरहेतुद्वयसन्निधाने यथासंभवमुपलब्धुश्चैतन्यानुविधायी परिणाम उपयोगः' अशा ह्या उपयोगात्मक ज्ञानाचीं पंचेंद्रिय कर्म व मानस कर्म हीं दोन्हीं कारणें आहेत. त्याचप्रमाणें पर्याप्तनाम कर्माचीही आवश्यकता त्यांत असते. त्यायोगें नोकर्मवर्गणा येत असल्यानें इंद्रिय व मन यांचा आकार बनतो. द्रव्येंद्रियाचा आकारही उपयोगात्मक ज्ञानाचें कारण आहे. याशिवाय ' अस्ति तत्राऽपि हेतुर्वा प्रकाशो रविदीपयोः ' सूर्यप्रकाश व दिव्याचा प्रकाश इत्यादि बाह्य कारणांचीही आवश्यकता असते. त्यावांचून पदार्थांचें ज्ञान होत नाहीं. याविषयीं पंचाध्यायीकार ह्मणतात कीं:—

अस्ति तत्र विशेषोऽयं विना बाह्येन हेतुना ।
ज्ञानं नार्थोपयोगीति लब्धिज्ञानस्य दर्शनात् ॥ १०१ ॥

अर्थ—क्षायोपशमिक लब्ध्यात्मक ज्ञान असून देखील बाह्य कारणावाचून उपयोगात्मक ज्ञान होत नाहीं, यांत विशेष आहे. त्यांत ही बाह्य सूर्यप्रकाशाची दिव्याच्या प्रकाशाची सर्वच प्राणीमात्रांना आवश्यकता असते असें कांहीं नाहीं. कारण घुबडाला सूर्यप्रकाशाची आवश्यकता लागत नाहीं. त्याचप्रमाणें मांजराला दिव्याच्या प्रकाशाची आवश्यकता लागत नाहीं. अंतरंग कर्माची क्षयोपशमरूप शक्ति व बाह्य कारणें ज्यांना जितकीं लागतील तितकीं असलीं म्हणजे उपयोगात्मक ज्ञान होतें. या उपयोगात्मक ज्ञानाचे दर्शनोपयोग व ज्ञानोपयोग असे दोन भेद आहेत. त्यांत दर्शनोपयोगाचे चार व ज्ञानोपयोगाचे आठ भेद आहेत. आत्मा तीन्ही लोकांतील व तीन्ही कालांतील संपूर्ण पदार्थांना युगपत सामान्य रीतीनें पाहणारा व जाणणारा असूनही अनादि कालापासून कर्मबद्ध झाल्यानें तो तसें जाणूं व पाहूं शकत नाहीं. जितक्या प्रमाणानें कर्म नाहींसे होईल तितक्या प्रमाणानें हा आत्मा जाणतो व पाहतो चक्षुर्दर्शनावरणीय कर्माच्या क्षयोपशमानें व बाह्य द्रव्येंद्रियाच्या सहायानें सामान्यपणें कोणताही विकल्प न भासतां मूर्तिक पदार्थाचें सत्ता मात्र अवलोकन होणें याला चक्षुर्दर्शनोपयोग ह्मणतात. त्याचप्रमाणें स्पर्शन, रसना, घ्राण, श्रोत्र इत्यादि इंद्रियांना आवरण टाकणाऱ्या कर्माचा क्षयोपशम होण्यानें, व त्या त्या इंद्रियांचीं बाह्य द्रव्येंद्रियें प्राप्त झाल्यानें मूर्तिक पदार्थांना विकल्परहित व सत्तामात्रानें जें परोक्ष पाहणें याला अचक्षुर्दर्शन ह्मणतात. मनावर आवरण टाकणारें जें मनोइंद्रियावरण कर्म त्याचा क्षयोपशम होण्यानें व अष्टदल कमलाकाराप्रमाणें असलेल्या द्रव्य मनाच्या सहायानें मूर्त व अमूर्त स्वरूपीं संपूर्ण पदार्थांमध्यें असलेल्या सत्ता सामान्याला विकल्परहित जें पाहणें याला मानस अचक्षुर्दर्शन ह्मणतात.

हा आत्मा ज्यावेळीं अवधिदर्शनावरणीय कर्माचा क्षयोपशम होण्यानें मूर्तिक पदार्थांतील सत्तासामान्याला विकल्परहित एकदेश प्रत्यक्ष-रूपानें पाहतो त्यावेळीं त्याला अवधिदर्शन ह्मणतात. केवलदर्शनावरणीय कर्माचा क्षय झाला असतां आत्मा त्रैलोक्यांतील संपूर्ण मूर्तामूर्त पदार्थां-तील सत्ता सामान्याला विकल्परहित पूर्ण प्रत्यक्ष स्वरूपानें एकाच सम-यामध्यें पाहतो याला केवलदर्शन ह्मणतात, व हेंच ग्राह्य आहे.

मनःपर्यय ज्ञान हें ईहामतिज्ञानपूर्वक होत असल्यानें मनःपर्यय नांवाचें दर्शन नाहीं ह्मणून दर्शनोपयोगाचे चारच भेद सांगितले आहेत. मति ज्ञानावरणीय कर्माचा व वीर्यांतराय कर्माचा क्षयोपशम झाल्यानें पांच इंद्रियें व मन यांच्या सहायानें मूर्तिक व अमूर्तिक पदार्थांना एक देशानें सविकल्प रीतीनें जाणणें याला क्षायोपशमिक मतिज्ञान ह्मणतात. श्रुतज्ञानावरणीय कर्माच्या क्षयोपशमनानें व मनाच्या अवलंबनानें बाह्य प्रकाश व आचार्यादिकांच्या सहायानें संपूर्ण पदार्थांना जें ज्ञान जाणतें त्याला श्रुतज्ञान ह्मणतात. शब्दानें उत्पन्न होणारें श्रुतज्ञान व स्वर्ग मोक्षादिक बाह्य विषयांचें ज्ञान हें सर्व परोक्षरूपच असतें. सुखदुःखादि विकल्परूपाचें ज्ञान व मी अनंतज्ञानस्वरूपी आहे असें जें ज्ञान तें ईषत् परोक्ष (किंचित् परोक्ष) रूप आहे.

जें निश्चयात्मक भावश्रुत ज्ञान आहे तें शुद्धात्मस्वरूप असल्यानें सुखज्ञान स्वरूप आहे. स्वसुख ज्ञानाच्या अपेक्षेनें सविकल्प स्वरूप असून-ही त्याला निर्विकल्पक म्हटलें आहे. त्याचें कारण हेंच कीं इंद्रिय व मन यापासून उत्पन्न होणारे जे रागद्वेषादिक विकल्प ते भावश्रुत ज्ञानामध्यें नसल्यानें त्याला निर्विकल्पक म्हटलें आहे. अभेद नयानें यालाच आत्म-ज्ञान म्हणतात. आत्मज्ञानाच्या वेळीं मतिज्ञान व श्रुतज्ञान हीं दोन्हीं परोक्ष असूनही प्रत्यक्षरूप होतात. याविषयीं पंचाध्यायीमध्यें असें म्हटलें आहे कीं—

अपि किंवाभिनिबोधिकबोधद्वैतं तदादिमं यावत् ।

स्वात्मानुभूतिसमये प्रत्यक्षं तत्समक्षमपि चान्यत् ॥ ७०६ ॥

अर्थ—मति व श्रुत हीं पहिलीं दोन ज्ञानें जोपर्यंत स्वात्मानुभूति असते म्हणजे स्वतःच्या आत्म्याचें अनुभवरूप ज्ञान असतें तोपर्यंत प्रत्यक्ष ज्ञानाप्रमाणेंही प्रत्यक्ष स्वरूप होतात. यामध्यें सम्यग्दृष्टि जीवाची अलौकिक शक्ति कारण आहे. म्हणजे ही सम्यग्दृष्टि जीवाची अलौकिक शक्ति आहे.

अवधि ज्ञानावरणीय कर्माच्या क्षयोपशमानें मूर्तिक पदार्थांना एक-देश प्रत्यक्ष रूपानें विकल्पसहित जें जाणतें त्यास अवधिज्ञान म्हणतात. मनःपर्यय ज्ञानावरणीय कर्मांच्या व वीर्यांतराय कर्माच्या क्षयोपशमानें दुसऱ्यांच्या मनांतील मूर्तिक पदार्थांना विकल्पसहित एकदेश प्रत्यक्ष-रूपानें जें जाणतें त्याला ईहामतिज्ञानपूर्वक मनःपर्यय ज्ञान म्हणतात.

स्वशुद्ध आत्मद्रव्याची श्रद्धा त्याचेंच ज्ञान व त्यांतच लीन होणें-रूप चारित्र अशा एकाग्र ध्यानानें चार घातिया कर्मांचा नाश झाला असतां संपूर्ण द्रव्य, क्षेत्र, काल व भाव इत्यादिकाला युगपत् जाणणारें जें ज्ञान तेंच केवलज्ञान उपादेयरूप आहे. क्षायोपशमिक ज्ञानाला धारण करणाऱ्या जीवांना आधी दर्शनोपयोग होतो नंतर ज्ञानोपयोग होतो. केवलज्ञानी जे आहेत त्यांना हे दोन्ही युगपत होतात. त्यामध्यें समय-भेद राहत नाहीं. छद्मस्थ जीवांच्या उपयोगांत समय भेद राहतो. व्यवहार-दृष्टीनें दर्शनाचे चार भेद व ज्ञानाचे आठ भेद दाखविले आहेत. याचेच उत्तरोत्तर भेद करीत गेल्यास अनंत भेद होतील. निश्चयानें केवलज्ञान व केवलदर्शन असें दोनच भेद आहेत.

दर्शनोपयोग व ज्ञानोपयोग यांची विवक्षा ज्यावेळीं असते त्यावेळीं उपयोगाचा अर्थ पदार्थांचें ज्ञान प्राप्त करून घेण्याकरितां चालणारा उपयोग असा होतो व त्याच उपयोगाचे शुभ, अशुभ व शुद्ध असे तीन भेद करितो त्यावेळीं शुभ अशुभ व शुद्ध भावना स्वरूपी क्रिया असा अर्थ होतो. सराग सम्यक्त्वपूर्वक दान देणें, [illegible] इत्यादिक

त्रिलोकामध्यें लीन होणें हा गृहस्थाचा शुभोपयोग व अठ्ठावीस मूलगुण व उत्तर गुणांमध्यें लीन होणें हा मुनींचा शुभोपयोग होय मिथ्यात्व, कषाय, योग प्रमाद इत्यादिकांमध्यें गढून जाणें हा अशुभोपयोग आहे. निश्चयरत्नत्रयात्मक शुद्धोपयोगामध्यें लीन राहणें याला शुद्धोपयोग म्हणतात. पहिल्या तीन गुणस्थानांत अशुभोपयोग असतो. चवथ्या, पांचव्या व सहाव्या गुणस्थानांत शुभोपयोग असतो. पुढें बाराव्या गुणस्थानापर्यंत शुद्धोपयोग असतो. तेराव्या व चवदाव्या गुणस्थानांत शुद्धोपयोगाचें फल प्रगट होतें. उपरिनिर्दिष्ट ज्ञानोपयोग व दर्शनोपयोग याच्या विस्ताराला आत्मा कारण आहे व उपयोग हें त्याचें कार्य आहे म्हणून आत्मा कार्यकारणरूप आहे. ज्याप्रमाणें सोनें व त्याचें कुंडल यामध्यें कार्यकारणभाव असून दोहोंमध्यें भेद नाहीं त्याप्रमाणें आत्मा व उपयोग यामध्यें भेद नाहीं. केवलज्ञानानें आत्मा जाणला जातो व पाहिला जातो अथवा भेदज्ञानाकडे उन्मुख होऊन जाणला जातो म्हणून तो ग्राह्य स्वरूप आहे. बाह्य इंद्रियांनीं जाणता येत नाहीं, या अपेक्षेनें तो अग्राह्य आहे. ग्राह्यत्व व अग्राह्यत्व हे दोन्ही धर्म आत्म्यामध्यें अपेक्षाभेदानें अविरुद्धपणें राहिलेले आहेत. आदिनाथ तीर्थंकरापासून महावीर तीर्थंकरापर्यंत २४ तीर्थंकरांचा जन्म झाला या अपेक्षेनें आदिपणा आला व त्यांचा निर्वाण झाला या अपेक्षेनें अंतताहि आली. असें असूनही आत्मद्रव्याला आदिही नाहीं व अंतही नाहीं म्हणून तो अनादि अनंत आहे. संसारी अवस्थेचा नाश केला या अपेक्षेनें व्यय सिद्ध पर्यायाची प्राप्ती करून घेतली या दृष्टीनें उत्पत्ति व दोहोंमध्यें आत्मा तोच असल्यानें नित्यता याप्रमाणें आत्मा स्थिति उत्पत्ति व व्ययात्मक आहे. जैनागमामध्यें वस्तु कूटस्थ नित्य मानली नाहीं व बौद्धाप्रमाणें क्षणस्थायीही मानली नाहीं. कथंचित् नित्याऽनित्यात्मक मानली आहे तेंच खरें ठरतें. कारण वस्तु कूटस्थ नित्य मानल्यानें जी वस्तु जशी आहे तशी तशीच राहील. असें झाल्यानें संसारी जीव कधींच मुक्त होणार नाहींत व मुक्त होण्याकरितां प्रयत्न करणें व्यर्थ ठरेल. वस्तु क्षणस्थायी मान-

त्यानें सत्पदार्थांचा नाश व असत्पदार्थांची उत्पत्ति होईल. असें झाल्यानें आकाशपुष्प व खरविषाण यांचीहीं उत्पत्ति मानावी लागेल. त्याचप्रमाणें पूर्वक्षणामध्यें प्रयत्न करणारा आत्मा वेगळा व फायदा घेणारा आत्मा वेगळा ठरेल. जो प्रयत्न करितो त्याला त्याचें फळ न मिळतां भलत्यालाच त्याचें फळ मिळेल. व चोरी करणारा वेगळा; त्याची शिक्षा भोगणारा दुसराच. असें झालें म्हणजे न्यायाधीशाचा न्याय बाजूला राहून अन्याय केल्याचें पातक त्याच्या माथीं म्हणजे वस्तु क्षणस्थायीं मानल्यानें कशास कांहींच मेळ बसणार नाहीं. दुसरें आत्म्याला क्षणस्थायीं मानल्यानें व्यवहारांतील गोष्टीची आठवण तरी कशी राहील ! आठवण न राहिल्यानें दुसऱ्याकडील येणें व आपलें देणें याचा व्यवहार तरी कसा चालविता येणार ! याकरितां पर्याय दृष्टीनें वस्तु अनित्य व द्रव्य दृष्टीनें ती नित्य आहे, असें मानणेंच रास्त व युक्तियुक्त आहे.

प्रमेयत्वादिभिर्धर्मैरचिदात्माचिदात्मकः ।
ज्ञानदर्शनतस्तस्माच्चेतनाचेतनात्मकः ॥ ३ ॥

अर्थ—आत्मा प्रमेयत्वादि धर्मांच्या अपेक्षेने जडरूप आहे, व तो ज्ञान व दर्शन या गुणांच्या अपेक्षेनें चेतन स्वरूप आहे, म्हणून चेतन व अचेतन स्वरूपाला धारण करणाऱ्या या आत्माला आचार्य चेतनाचेतनात्मक म्हणतात.

स्पष्टीकरण— उमास्वामी आचार्यांनीं 'द्रव्याश्रया निर्गुणा गुणाः' जे द्रव्याच्या आश्रयानें राहात असून स्वतः अन्यगुणानीं रहित असतात त्यास गुण असें म्हटलें आहे. त्या गुणांचे सामान्यगुण व विशेष गुण असें दोन भेद आहेत. सामान्य गुण सर्व द्रव्यांमध्यें राहतात व विशेष गुण सर्व द्रव्यांमध्यें न राहतां आपआपल्या द्रव्यामध्येंच राहतात. अस्तित्व, वस्तुत्व, द्रव्यत्व, प्रमेयत्व, अगुरुलघुत्व, आणि प्रदेशवत्व हे सामान्य गुण अजीव द्रव्यांमध्येंही राहत असल्यानें या सामान्य गुणांच्या अपेक्षेनें आत्म्याला अचेतन स्वरूप म्हणजे जडस्वरूप आहे असें म्हटलें आहे व

ज्ञान, दर्शन, सुख आणि वीर्य या विशेष गुणांच्या अपेक्षेनें तो चेतनात्मक आहे. कारण हे गुण जीवाशिवाय इतर द्रव्यांमध्यें आढळून येत नाहींत वस्तुमध्यें असणारे सामान्य गुण देखील वेग वेगळे कार्य करीत असतात. अस्तित्व गुण वस्तूचा कधींच नाश होऊं देत नाहीं. वस्तु गुण पदार्थांमध्यें अर्थक्रिया उत्पन्न करितो. जसें वस्त्राची अर्थक्रिया थंडी व उष्णतेपासून शरीर संरक्षण करतें. शरीर झाकणें इत्यादि, त्याप्रमाणें आत्यामध्यें ज्ञान दर्शनरूप क्रिया उत्पन्न होणें.

द्रव्यत्वगुण द्रव्याला पर्यायस्वरूपानें परिणत करितो. प्रमेयत्व गुण द्रव्याला कोणत्या तरी ज्ञानाचा विषय करितो. प्रदेशवत्व गुण द्रव्याचा आकार दाखवितो.

द्रव्याची द्रव्यता कायम राहणें म्हणजे एक द्रव्य दुसरे द्रव्यरूप न होणें आणि एक गुण दुसरे गुणरूप न होणें. त्याच प्रमाणें द्रव्याचे जे अनंत गुण आहेत ते विखरून न जाणें इत्यादि गोष्टी अगुरुलघु गुणानें होतात. दुसरे असद्भूत व्यवहार नयाच्या अपेक्षेनेंही आत्मा अचेतन स्वभावी आहे. चेतनात्मक द्रव्याला अचेनात्मक ठरविणें हें असंभवनीय असें क्षणभर वाटतें पण असंभव गोष्टी देखील संभवनीय करून दाखविण्याचें सामर्थ्य स्याद्वाद धर्मामध्यें आढळून येतें. स्याद्वाद हें अमोघ शस्त्र आहे तें शस्त्र चालविणारा मोठा चाणाक्ष असला पाहिजे नाहींतर तें शस्त्र स्वताःच्या मानकुटीवर बसल्यावांचून राहणार नाहीं. याविषयीं अमृतचंद्रसूरी पुरुषार्थसिध्युपायामध्यें सांगतात कीं—

> अत्यंतनिशितधारं दुरासदं जिनवरस्य नयचक्रम् ।
> खंडयति धार्यमाणं मूर्धानं झटिति दुर्विदग्धानाम् ॥ ५९ ॥

भावार्थ—स्याद्वाद शैलीनें तत्व प्रतिपादन करणारे जिनेश्वराचे नयचक्र साधे नसून ज्याला तीक्ष्ण धारा आहेत असें आहे, व हें प्राप्त होणें फारच कठीण. प्राप्त झालें तरी चालविणारा मनुष्य जर मूर्ख असेल तर स्वतःचे मस्तकच उडवून घेईल. तात्पर्य—गहन स्याद्वाद धर्माचें प्रतिपादक

कार्यें कारण कठीण आहे.-

ज्ञानाद्भिन्नो नचाभिन्नो भिन्नाभिन्नः कथंचन ।
ज्ञानं पूर्वापरीभूतं सो ऽयमात्मेति कीर्तितः ॥ ४ ॥

अर्थ–हा परमात्मा ज्ञानाहून सर्वथा भिन्न म्हणजे निराळाही नाहीं व ज्ञानाहून सर्वथा अभिन्नही नाहीं. कथंचित भिन्नाभिन्न रूप आहे, म्हणजे एका अपेक्षेनें तो ज्ञानाहून अभिन्न ही आहे व एका अपेक्षेने ज्ञानाहून भिन्नहि आहे. पूर्वज्ञान व उत्तरज्ञान अशा सर्व ज्ञान समूहांसच आत्मा म्हणावें असें आचार्य म्हणतात.

स्पष्टीकरणः—आत्मा द्रव्य आहे व ज्ञान हें त्याचा गुण आहे म्हणून आत्मा व ज्ञान या दोहोंमध्यें गुण गुणी संबंध आहे, व तो कथंचित भिन्नाभिन्नात्मक आहे. 'संज्ञालक्षणभेदाद्धि भेदः' गुण आणि गुणी यांचें नांव व लक्षण भिन्न भिन्न असल्यानें गुणीहून (आत्म्याहून) गुण (ज्ञान) हा कथंचित् भिन्न आहे, सर्वथा भिन्न नाहीं. सर्वथा भिन्न मानल्यानें एकाला गुण व दुसऱ्याला गुणी असा व्यवहारच होणार नाहीं. याविषयीं पंचाध्यायीमध्यें अमृतचंद्राचार्य म्हणतात कीं,—

अथ चैतयोः पृथक्त्वे हठादहेतोश्च मन्यमानेऽपि ।
कथमिव गुणगुणिभावः प्रमीयते सत्समानत्वात् ॥ ४२ ॥

अर्थ–कारणावांचून दुराग्रहानें गुण गुणी या दोहोंमध्यें सर्वथैव भेद मानले असतां दोहोंची सत्ता [अस्तित्व] समान (स्वतंत्र) असल्यानें एक गुण व दुसरा गुणी असें कसें म्हणता येईल ? भावार्थ, ज्याप्रमाणें मालक आणि गुमास्ता यांच्यामध्यें भेद जर राहाणार नाहीं तर दोघेही मालक समजले जातील. मग हा गुमास्ता व हा मालक असा व्यवहारच होणार नाहीं. त्याप्रमाणें ज्ञान गुण सर्वथा आत्म्याहून भिन्न मानल्यानें या आत्म्याचाच हा गुण आहे; इतर पदार्थाचा नाहीं असें कसें म्हणतां येईल ? कारण ज्ञान आत्म्याहून जसें भिन्न आहे तसें इतर पदार्थांहूनही आहे. वास्तव

जसें सोन्याचा पिवळा रंग, साखरेची गोडी, अग्नीची उष्णता व दिव्याचा प्रकाश इत्यादिक गुण त्या त्या पदार्थांपासून निराळे नसून पदार्थमय आहेत, तसें आत्मा ज्ञान गुणापासून वेगळा नसल्यानें ज्ञान तेंच आत्मा व आत्मा तोच ज्ञान अशा अभेद बुद्धीच्या अपेक्षेनें आत्मा आपल्या ज्ञान गुणापासून अभिन्न आहे. याविषयीं नियमसारांत कुंदकुंदाचार्य ह्मणतात कीं—

अप्पाणं विणु णाणं णाणं विणु अप्पगो ण संदेहो ।
तह्मा सपर पयासं णाणं तह दंसणं होदि ॥ १०७ ॥

अर्थ—आत्म्यालाच ज्ञान असें समजा व ज्ञानालाच आत्मा असें समजा, यांत कांहींच संशय नाहीं, ह्मणून व ज्ञान दर्शन हे स्वपर प्रकाशी आहेत. आपलें व परपदार्थांचें ज्ञान करून देणारें आहेत. यांतला सारांश एवढाच आहे कीं गुणसमुदायात्मक द्रव्य असल्यानें गुणाला सोडून द्रव्य नाहीं व द्रव्याला सोडून गुण नाहींत ह्मणून गुण तोच गुणी व गुणी तोच गुण मानल्यानें ज्ञानच आत्मा आहे; ज्ञानाशिवाय दुसरा आत्मा नाहीं असें-ही ह्मणूं शकतो. यास्तव आत्मा ज्ञानाहून कथंचित् अभिन्न आहे. किंवा परमात्मा संसारी अवस्थेतील क्षायोपशमिक ज्ञानाला वर्तमानकालीं धारण करीत नसल्यानें व क्षायिक ज्ञानालाच धारण करीत असल्यानें परमात्मा क्षायोपशमिक ज्ञानापासून भिन्न आहे व क्षायिक ज्ञानापासून अभिन्न आहे या अपेक्षेनेंही ज्ञानापासून आत्मा कथंचित् भिन्नाभिन्नात्मक सिद्ध होतो. वस्तु सदैव परिणतशील आहे असें म्हटल्यानें अभेद रूपानें राहिलेले वस्तूंतील गुणदेखील नेहमीं आपल्या परिणतीला धारण करितात. याकरितां आत्म्याच्या ठिकाणीं असलेला जो ज्ञान गुण त्यामध्यें ही परिणति सारखी चाललेली आहे. शुद्धात्म्याच्या ठिकाणीं असलेल्या ज्ञानगुणाची परिणति शुद्धस्वरूपाची असते व अशुद्ध आत्म्याच्या ज्ञानगुणाची परिणति (पर्याय) अशुद्ध असते. याप्रमाणें पूर्वोत्तर होणारीं जीं ज्ञानें व त्यांचे परिणाम इत्यादिकांनीं आत्मा युक्त आहे. याविषयीं पंचाध्यायींमध्यें असें सांगितलें आहे कीं—

तेन गुणांशेन पुनर्गणिताः सर्वे भवंत्यनंतास्ते ।
तेषामात्मा गुण इति नहि ते गुणतः पृथक्त्वसत्ताकाः ॥५९॥

अर्थ—गुणांचे जितके पर्याय आहेत त्या सर्व पर्यायांची जर मोजणी करूं तर ते पर्याय अनंत होतील. असा अनंत पर्यायात्मक गुण आहे व पर्यायही आपली सत्ता गुणाहून भिन्न ठेवीत नाहींत. आत्माही गुणांहून अभिन्न असल्यानें अनादि कालापासून अनंत कालापर्यंत होणारीं जीं ज्ञानें त्या ज्ञानसमूहालाच आत्मा असें म्हणतात.

स्वदेहप्रमितश्चायं, ज्ञानमात्रोऽपि नैव सः ।
ततः सर्वगतश्चायं, विश्वव्यापी न सर्वथा ॥ ५ ॥

अर्थ—हा आत्मा नामकर्माच्या उदयानें उत्पन्न झालेल्या शरीरप्रमाणाचा असूनदेखील शरीर प्रमाण नाहीं. असा, व ज्ञानस्वरूप असुनसुद्धा ज्ञानस्वरूप नाहीं असा आहे. कथंचित् सर्व जगाला व्यापून टाकणारा व कथंचित् जगाला व्यापून न टाकणारा असा आहे.

भावार्थ—निश्चय नयानें पाहिलें तर आत्मा केवल ज्ञानादि अनंत गुण स्वरूपाचा आहे, परंतु अनादि कालीन कर्म बंधनानें जखडल्यामुळें त्याला त्याच्या स्वाभाविक गुणांची प्राप्ती होत नाहीं. या जीवाला जें शरीर प्राप्त झालें आहे त्याचीं कारणें अशीं आहेत कीं, या आत्म्याची शरीरावर ममत्वबुद्धि असल्यानें त्या शरीराच्या संरक्षणाकरितां आहार घेणें, भीति बाळगणें, मैथुनेच्छा ठेवणें, परिग्रहांची वांछा करणें इत्यादिक कर्मकृत वैभाविक गोष्टीमध्यें रंगून गेल्यानें उत्पन्न झालेलें जें शरीर नामकर्म त्या कर्माच्या उदयानें हा आत्मा शरीरामध्यें येऊन पडला आहे म्हणून हा आत्मा शरीर प्रमाणाचा आहे. आणि समुद्घाताच्या वेळीं जीव शरीराच्या आकारएवढाच रहात नसल्यानें तो देह प्रमाण नाहीं. म्हणजे तो देहाच्या बाहेरही आहे. याविषयीं गाथा—

मूल सरीर मछंडिय उत्तर देहस्स जीव पिण्डस्स ।
णिग्गमणं देहादो हवदि समुग्घादयंणाम ॥ १ ॥

अर्थ—कर्मानें प्राप्त झालेलें जें मूळ शरीर त्याला न सोडतां तैजस व कार्मण या शरीरासहित जे आत्म्याचे प्रदेश शरीरांतून निघतात त्याला समुद्घात असें म्हणतात. त्याचे सात भेद आहेत ते हे—

वेयण कसाय वेउव्विय मारणंतिओ समुग्घादो।
तेजाहारो छट्ठो सत्तमओ केवलीणं तु ॥१॥

भावार्थ—अत्यंत वेदना होऊ लागल्या असतां आपल्या मूळ शरीराला न सोडतां आत्म्याचे प्रदेश जे बाहेर पडतात त्यास वेदना समुद्घात म्हणतात. तीव्र कषयांचा उदय होण्यानें दुसऱ्यांचा घात करण्या करितां शरीराला न सोडतां आत्म्याचे प्रदेश बाहेर पडतात त्यास कषाय समुद्घात म्हणतात. विक्रिया करण्याकरितां मूळ शरीराला न सोडतां आत्म्याचे प्रदेश बाहेर पडणें याला वैक्रियिक समुद्घात म्हणतात. मरण समयीं ज्या ठिकाणीं या जीवाला जावयाचें असेल त्या स्थानाकडे मूळ शरीराला न सोडतां आत्मप्रदेश जातात त्यास मारणांतिक समुद्घात म्हणतात. संयमी साधूला क्रोध येण्यासारखीं कारणें उपस्थित होण्यानें सूच्यंगुलाच्या संख्यात भाग प्रमाण मूळ विस्तार व नऊ योजन प्रमाण अग्र विस्तार आणि १२ योजन लांब असा शेंदराच्या रंगासारखा रंग असून वाईट आकाराचा त्या साधूच्या डाव्या खांद्यांतून निघून ज्यांचा रोष असेल त्यांना जाळून मुनीलाही तो जाळून टाकतो यास अशुभ तैजस म्हणतात. हा द्वीपायन मुनीला झाला होता. भयंकर दुष्काळ रोग इत्यादि कारणांनीं ज्यावेळीं लोक त्रासून जातात त्यावेळीं उत्कृष्ट संयमाला धारण करणारे जे साधु असतात त्यांच्या उजव्या खांद्यांतून शुभ आकारानें युक्त पूर्व प्रमाणाचा पुतळा साधूच्या मूळ शरीराला न सोडतां बाहेर पडून दुर्भिक्षादि पीडा नाहींशी करून साधूच्या शरीरांत पुनः शिरतो यास शुभ तैजस समुद्घात म्हणतात. उत्कृष्ट ऋद्धि ज्याला प्राप्त झाली आहे अशा साधूला पदार्थांच्या ज्ञानाविषयीं संशय उत्पन्न झाला म्हणजे त्या साधूच्या मस्तकांतून चोवीस अंगुल प्रमाणाचा शुद्ध स्फटिकाच्या

आकाराचा पुतळा मूळ शरीराला न सोडतां बाहेर पडतो व ज्या ठिकाणीं केवली असतील त्या ठिकाणीं जाऊन त्यांचें दर्शन झाल्याबरोबर याचा संशय नाहींसा होतो. नंतर त्या साधूच्या शरीरांत पवेश करितो, आणखी कोणकोणत्या प्रसंगीं बाहेर पडतो. या विषयीं श्री नेमिचंद सैद्धांतिक चक्रवर्ति म्हणतात.

णियखेत्ते केवलिदुगविरहे णिक्कमणपहुदि कल्लाणे।
परखेत्ते संवित्ते जिणजिणघरवंदणट्ठं च ॥ २३६ ॥

भावार्थ—ते साधु जेथें असतात तेथें केवलीं किंवा श्रुतकेवली नसले, तीन्ही कल्याणें परक्षेत्रीं चालली असतां व अकृत्रिम जिन चैत्यालयांची वंदना करण्याकरितां आहारक शरीराचा पुतळा बाहेर पडतो.

दंड कपाट, प्रतर, लोकपूरण या चार प्रकारच्या समुद्घाताला केवल समुद्घात म्हणतात. या सात समुद्घातापैकीं आहारक व मारणांतिक हे दोन समुद्घात नियमानें एक दिशेलाच जातात; बाकीचे दहाही दिशेला जातात. यावरून हें सिद्ध होतें कीं समुद्घातसमयीं आत्मा देहप्रमाण राहात नाहीं. समुद्घाताशिवाय इतर वेळीं देहप्रमाण आत्मा असल्यानें स्वदेहप्रमाण सिद्ध होतो. सर्वथा सिद्ध होत नाहीं. आत्मा ज्ञानमात्र असून ज्ञानमात्रच नाहीं असा आहे. तें असें ज्ञानमात्र म्हटल्यानें आत्मा ज्ञानरूपच झाला तेव्हां आत्मा ज्ञान गुणालाच तेवढा धारण करितो इतर गुणाला तो धारण करीत नाहीं असें होईल. व असें झाल्यानें अनंतगुणी आत्मा सिद्ध होणार नाहीं, शिवाय इतर गुणांच्या अभावानें गुणीचा (आत्म्याचा) ही अभाव मानण्याचा प्रसंग येईल; व "आधारभूतस्याभावे आधेयभूतस्याप्यभाव:" या न्यायानें आत्म्याचा अभाव झाल्यानें ज्ञानचाही अभाव होईल. या करितां ज्ञान गुणाच्या अपेक्षेनें आत्मा ज्ञान आहे, सुख गुणाच्या अपेक्षेनें तो सुख आहे, चारित्र गुणाच्या अपेक्षेनें तो चारित्र आहे व दर्शन गुणाच्या अपेक्षेनें तो दर्शन आहे. कारण "व्यापकं तदतन्निष्ठं व्याप्यं तन्निष्ठमेव च" या न्यायाच्या

उक्तीप्रमाणें आत्मा व्यापक असल्यानें विवक्षित गुणांत असून इतर गुणामध्येंही तो आहे. परंतु प्रत्येक गुण मात्र तसा नसून आप आपल्यांतच राहतो. यावरून हें सिद्ध होतें कीं, द्रव्य व्यापक असल्यानें तें आपल्या ठिकाणीं असणाऱ्या संपूर्ण गुणांमध्यें व्यापून राहतें. गुण मात्र इतर गुणांत न राहतां तो आपल्यामध्येंच राहतो. एक गुण दुसऱ्या गुणस्वरूपाचा कधींच होत नाहीं. याविषयीं पंचाध्यायीमध्यें असें ह्मटलें आहे कीं:—

तदुदाहरणं चैतज्जीवे यद्दर्शनं गुणश्चैकः ।
तन्न ज्ञानं न सुखं चारित्रं वा न कश्चिदितरश्च ॥ १ ॥

भावार्थः— जीव द्रव्याच्या ठिकाणीं जो दर्शन नांवाचा गुण आहे तो कधीं ज्ञानगुण, सुखगुण, चारित्र गुण किंवा इतर कोणत्याही गुणस्वरूपाचा होत नाहीं. गुण हे आपल्या भिन्न भिन्न स्वरूपानें द्रव्यामध्यें वेगवेगळे राहिले आहेत. गुणसमूहात्मक द्रव्य गुणांहून अभिन्न असल्यानें ज्यावेळीं ज्या गुणाची विवक्षा करूं त्यावेळीं आत्मा त्या गुणस्वरूपाचा दिसतो. त्याप्रमाणें ज्ञान गुणाच्या विवक्षेनें आत्मा ज्ञानमात्र दिसतो ह्मणून तो सर्वथैव तसाच नसून इतर गुणस्वरूपाचा ही तो सिद्ध होतो. याविषयीं प्रवचनसारामध्यें कुंदकुंदाचार्य ह्मणतात कीं—

णाणं अप्पत्ति मदं वट्टदि णाणं विणा ण अप्पाणं ।
तम्हा णाणं अप्पा अप्पा णाणंव अण्णंवा ॥ २७ ॥

भावार्थ— ज्ञान आत्म्याचा असाधारण गुण असल्यानें त्या ज्ञानाशिवाय आत्म्याची सिद्धि होत नाहीं. आत्मा व गुण अभिन्न असल्यानें ज्ञान गुणही आत्मा होऊं शकतो परंतु आत्मा मात्र ज्ञानही होतो व दुसरा गुणरूपही होतो. याचा खुलासा असा कीं—सुवर्णाचे गोट, पाटल्या, सरी, तोडे, बाजुबंद इत्यादिक अनेक डागिणे बनतात त्या डागिण्यामध्यें प्रत्येकांत हें व्यापून राहिलेलें आहे म्हणून गोट म्हटल्यानें त्या बरोबर सोनें हें आलेंच पण सोनें म्हटल्यानें गोटच येत नसून सर्व डागिणे ही

येतात. कारण सोनें पर्यायमध्यें व्यापून राहिलें आहे. सोन्याचा गोट हा डागिना सोन्यावांचून राहणार नाहीं, पण सोनें मात्र गोटावांचून राहू शकेल, म्हणजे इतर डागिन्यामध्येंही राहील. गोट मात्र गोटरूपानेंच आपलं स्वरूप दाखवील परंतु सोनें हें गोटरूपानेंही आपलें स्वत्व दाखवील आणि इतर पाटल्या, सरी, वाजुबंद ह्या रूपानेंही आपलें स्वत्व दाखवील. त्या प्रमाणें आत्मा ज्ञान स्वरूपानेंच दिसत नसून सुखवीर्यादि स्वरूपानेंही तो दिसतो, म्हणून आत्मा कथंचित् ज्ञानात्मक आहे, व कथंचित् इतर गुणात्मकही आहे हें सिद्ध होतें.

परमात्मा सर्वगत आहे म्हणजे सर्व ठिकाणीं त्याचें अस्तित्व आहे अमक्या ठिकाणीं त्याचें अस्तित्व नाहीं असें कांहीं नाहीं. यावरून कित्येकांची समजूत अशी होईल कीं ज्या प्रमाणें नैयायिक, मीमांसक, सांख्य इत्यादि मतवाले लोक ईश्वर जलीं, स्थलीं पाषाणीं सर्व ठिकाणीं शरीर रूपानें भरलेला आहे असें मानतात त्या प्रमाणेंच जैनही मानीत असतील. पण जैन तसें मानीत नाहींत. जैनधर्मांत परमात्मा सर्वज्ञ असल्यानें संपूर्ण त्रैलोक्यांतील पदार्थांना एका ठिकाणींच राहून जाणतो. संपूर्ण पदार्थांमध्यें त्याला शरीर रूपानें घुसण्याची आवश्यकता नाहीं. संपूर्ण लोकालोकाला तो जाणतो म्हणून ज्ञानाच्या अपेक्षेनें तो सर्वगत आहे व शरीराच्या अपेक्षेनें तो परमौदारिक शरीरामध्येंच राहत असल्यानें सर्वगत नाहीं. या विषयीं प्रवचन सारांत कुंदाकुंदाचार्य म्हणतात.

आदा णाणपमाणं णाणं णेयप्पमाणमुद्दिट्ठं ।
णेयं लोगालोगं तम्हा णाणं तु सव्वगयं ॥ १ ॥

अर्थ—आत्मा ज्ञानप्रमाण आहे म्हणजे ज्ञाना एवढा आत्मा आहे. ज्ञान ज्ञेयप्रमाण आहे म्हणजे ज्ञेया एवढा आकार ज्ञानाचा आहे. आणि ज्ञेय संपूर्णलोकालोकामध्यें भरलेलें आहे म्हणून ज्ञान हें सर्वगत म्हणजे सर्व पदार्थांना जाणणारें आहे.

स्पष्टीकरण—' समगुणपर्यायं द्रव्यं ' ह्मणजे गुण व पर्याया इतकेंच द्रव्य आहे ह्मणून आत्म्याचा आकार ज्ञानगुणा एवढा आहे. त्याही पेक्षां त्याचें कमी किंवा जास्त प्रमाण नाहीं. ज्ञानाचें प्रमाण ज्ञेयाबरोबर (पदार्थाबरोबर) दाखविलें आहे. ह्मणजे ज्ञान ज्ञेयाकार (पदार्थाकार न होतां त्या पदार्थाला जाणतें. ह्मणजे पदार्थांना जाणणें हा त्याचा स्वभाव आहे. पदार्थ सर्वलोकाकाशांत भरलेले आहेत त्या सर्व पदार्थांना ज्ञान जाणत असल्यानें ज्ञानाला सर्वगत ह्मटलें आहे. यावरून ज्ञानाच्या अपेक्षेनें आत्मा सर्वगत आहे हें सिद्ध आलें. अथवा लोकपूरण समुद्घाताच्या वेळीं परमात्मा आपल्या आत्म्याचे प्रदेश संपूर्ण लोकभर पसरतो या दृष्टीनें तो विश्वव्यापी आहे. व वास्तविक पाहतां आपल्या परमौदारिक शरीरामध्येंच राहतो ह्मणून तो विश्वव्यापी नाहीं. यांतील तात्पर्य एवढेंच कीं वरील सर्व धर्म कथंचित् रूपानें आत्म्याच्या ठिकाणीं सिद्ध होतात, सर्वथैव सिद्ध होत नाहींत.

नानाज्ञानस्वभावत्वादेकोऽनेको ऽपि नैव सः ।
चेतनैकस्वाभावत्वादेकानेकात्मकोभवेत् ॥ ६ ॥

अर्थ—हा आत्मा अनेक प्रकारच्या ज्ञानाच्या स्वभावाला धारण करीत असल्यामुळें अनेक स्वरूपाचा असून देखील तो एकच आहे, सर्वथैव तसा नाहीं. आणि सामान्य रीतीनें चैतन्य धर्मालाच धारण करीत असल्यानें एकानेकस्वरूपाचा आहे

स्पष्टीकरण—ज्ञान आत्म्याचा एक अखंड गुण आहे. त्या गुणाचे पुष्कळ भेद दिसतील ते असे लब्ध्यपर्याप्तक सूक्ष्म निगोदिया जीवामध्यें एका अक्षराच्या अनंताव्या भागाचें ज्ञान असतें. त्या ज्ञानामध्येंही पुष्कळ अंश आहेत. अशा त्या सर्वांत हलक्या ज्ञानापेक्षां उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणाच्या ज्ञानामध्यें अधिक अधिक जाणण्याची शक्ति असते. याप्रमाणें ती शक्ति वाढत वाढत जाऊन केवलज्ञानापर्यंत जाऊन पोहचते. अशा सूक्ष्मरूपानें पाहिलें असतां ज्ञान गुणाचेच अनंत

भेद होतील. या विषयीं पंचाध्यायीमध्यें ह्मटलें आहे कीं—

अथवा ज्ञानं यावज्जीवस्यैको गुणोप्यखंडोऽपि ।
सर्वजघन्यनिरंशच्छेदैरिव खण्डितोप्यनेकः स्यात ॥ १ ॥

स्पष्टीकरण–ज्ञान जीवाचा एक अखंड गुण आहे व तो एक आहे तथापि सर्वात जघन्य अंशांनीं त्या गुणाचे भेद केल्यास अनेक होतील. त्याही पक्षां पुढें मति, श्रुत, अवधि, मनःपर्यय आणि केवल अशा या ज्ञानापर्यंत अगणित भेद होतील. त्याचप्रमाणें इतर गुणाच्या अपेक्षेनेंही भेद करितां येतील. ह्मणून भेद दृष्टीनें आत्मा अनेकरूप दिसतो आणि अभेद दृष्टीनें पाहिलें असतां एक चेतन गुणाचाच हा विस्तार आहे ह्मणून तो आत्मा एकरूपच आहे. तात्पर्य, आत्मा एकांतपणानें एकरूपही नाहीं व अनेकरूपही नाहीं. तर कथंचित् एकानेकात्मक आहे ह्मणजे द्रव्य दृष्टीनें एक व पर्याय दृष्टीनें अनेक आहे.

उदाहरणार्थ–स्थूल मानानें सुवर्णाला द्रव्य दृष्टीनें पाहिलें असतां सोन्याच्या होणाऱ्या डागिन्यामध्यें सोनें हें अभेदरूपानें राहिलें असल्यानें त्या सोन्यामध्यें कोणताही भेद प्रतिभासित होत नाहीं. आणि त्या सोन्याच्या डागिनेरूप पर्यायाकडे पाहिले असतां त्याच सोन्याचे पुष्कळ भेद दिसून येतील. तद्वत् ज्ञानादि गुण आणि आत्मा याचें वर्णन आहे.

नाऽवक्तव्यः स्वरूपाद्यैर्निर्वाच्यः परभावतः ।
तस्मान्नैकान्ततो वाच्यो नाऽपि वाचामगोचरः ॥७॥

अर्थः— आत्म्याचें जें कांहीं स्वरूप आहे त्या स्वरूपाच्या अपेक्षेनें तो वक्तव्य नाहीं असे नाहीं; तर तो वक्तव्य (सांगतां येण्याजोगा) आहे. आणि परस्वभावाच्या अपेक्षेनें अवक्तव्य आहे (सांगतां येण्याजोगा नाहीं.) ह्मणून सर्वथैव एकांत दृष्टीनें तो वाच्यही नाहीं, आणि अवाच्यही नाहीं. ह्मणजे आत्मा कथंचित् वाच्य आणि कथंचित् अवाच्य असा आहे.

स्पष्टीकरणः— वस्तु आपल्या स्वरूपाला धारण करितात व पर-स्वरूपाला धारण करीत नाहींत. उदाहरणार्थ, स्थूल मानानें पाहिलें असतां सोनें व चांदी हे दोन्ही पदार्थ आप आपल्या स्वरूपाला धारण करीत असल्यानें सोनें हें चांदी दिसत नाहीं आणि चांदी ही सोनें दिसत नाहीं. सोन्याचें वर्णन त्याच्या स्वरूपावरून होतें, चांदीच्या स्वरूपावरून त्याचें वर्णन होत नाहीं. यास्तव सोनें आपल्या स्वरूपाच्या अपेक्षेनें वक्तव्य आहे आणि चांदीच्या स्वरूपाच्या अपेक्षेनें अवक्तव्य आहे. चांदीच्या स्वरूपानेंही जर सोनें वक्तव्य होईल तर जग चांदीलाही सोनें समजूं लागेल. व त्यायोगें सोनें आणि चांदी या शब्दार्थांमध्यें भेदच राहणार नाहीं कदाचित् सोनें आणि चांदी हे पुद्गल द्रव्याचें पर्याय असल्याकारणानें यांना पुद्गल समजून याचें वर्णन करून वक्तव्य ठरवाल तर जीव आणि अजीव हीं दोन्हीं द्रव्यें असल्यानें हींही वक्तव्यच ठरतील, अवक्तव्य असें कांहींच दिसणार नाहीं. याकरितां आचार्यांनीं वस्तु सर्वथैव वक्तव्य व सर्वथैव अवक्तव्य न ठरवितां स्याद्वक्तव्य आणि स्यादवक्तव्य आहे असें ठरविलें आहे. म्हणजे स्वद्रव्य-क्षेत्र—काल—भावाच्या अपेक्षेनें वस्तु वक्तव्य आहे आणि पर चतुष्टयाच्या अपेक्षेनें तें अवक्तव्य आहे. या विषयीं समंतभद्राचार्य युक्त्यनुशासनामध्यें म्हणतात कीं:—

अवाच्यमित्यत्र च वाच्यभावादवाच्यमेवेत्ययथाप्रतिज्ञम् ।
स्वरूपतश्चेत्पररूपवाचि स्वरूपवाचीति वचो विरुद्धम् ॥१॥

भावार्थ-वस्तूच्या स्वरूपाचें वर्णन होतच नाहीं म्हणून सर्वथैव वस्तु अवाच्यच आहे म्हणाल तर अवाच्य या शब्दानें तरी तिचें वर्णन झालेंच. मग अवाच्य हा शब्दही वाच्यरूप ठरला, यास्तव वस्तु सर्वथैव अवाच्य आहे असें म्हणणें म्हणजे वस्तूच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान करून न घेता कांहीं तरी समजणें आहे. जर वस्तु स्वस्वरूपानेंच अवाच्य आहे असें म्हणाल तर वस्तु परस्वरूपानें वाच्य ठरली. परस्वरूपानें ती वाच्य ठरते म्हणून स्वरूपानेंही वाच्य म्हणाल तर वस्तु पररूपानेंही वाच्य व

स्वस्वरूपानेंही वाच्य असें म्हणणें हे परस्पर विरुद्ध आहे. याकरितां वस्तुचें स्वरूप एकांत दृष्टिनें अवाच्य ठरविणें म्हणजे ' मी मौनव्रती आहे असें बोलून दाखविणाऱ्या पुरुषाप्रमाणें स्ववचनबाधित आहे. अमृतचंद्राचार्योनीं नाटक समयसार कलशामध्यें आत्म्याचें असें वर्णन केलें आहे कीं —

अनाद्यनंतमचलं स्वसंवेद्यमिदं स्फुटम् ।
जीवः स्वयं तु चैतन्यमुच्चैश्चकचकायते ॥ १ ॥

भावार्थ–आत्मा हा स्वतः ज्ञानदर्शनानें युक्त असल्यानें सर्वांमध्यें श्रेष्ठत्वानें प्रकाशमान आहे. त्याचप्रमाणें या जीवाला आदिही नाहीं व अंतही नाहीं म्हणजे जगामध्यें नवीनच उत्पन्न झाला नसून अनादि आहे. त्याचा कधींच नाश होत नसल्यानें अनंतरूप आहे व आपल्या चैतन्यमय स्वरूपापासून कधींच चलायमान होत नाहीं. याप्रमाणें सर्व लोकांना आप आपल्या अनुभवामध्यें सुख दुःख रूपानें दिसणाराही आहे. सर्वथा आत्मा अवाच्य असतां तर असें वर्णनच करितां आलें नसतें. यावरून हें सिद्ध झालें कीं आत्मा आपल्या स्वरूपाच्या अपेक्षेनें वाच्य आणि परस्वरूपाच्या अपेक्षेनें अवाच्य आहे.

स स्याद्विधिनिषेधात्मा स्वधर्मपरधर्मयोः ।
समूर्तिर्बोधमूर्तित्वादमूर्तिश्च विपर्ययात् ॥ ८ ॥

अर्थ-आत्मा आपल्या स्वधर्मांनीं विधिरूप आहे म्हणजे अस्ति व दाखविणारा आहे, आणि परधर्मांच्या अपेक्षेनें निषेधरूप आहे (नास्तित्व दाखविणारा आहे) ज्ञानस्वरूप असल्यानें मूर्तिक आहे आणि शरीर रहित असल्या कारणानें अमूर्तिक आहे.

स्पष्टीकरण–प्रत्येक वस्तु आपआपल्या धर्मांना धारण करीत अस-ल्यानें ती स्वधर्मानें विधिरूप व परधर्मानें निषेधरूप ठरते. उदाहरणार्थ–सोनें, चांदी, माणिक, मोती हे पदार्थ आपआपल्या विशेष गुणांनीं युक्त असल्यानें सोन्याचें अस्तित्व इतर पदार्थांत ज्याप्रमाणें दिसून येत नाहीं

त्याप्रमाणें इतर पदार्थांचेंही अस्तित्व सुवर्णामध्यें दिसून येत नाहीं. यास्तव सोनें आपल्या स्वरूपानें आहे व चांदी, माणिक मोती इत्यादि परपदार्थांच्या स्वरूपानें नाहीं. किंवा आकाशद्रव्य, धर्मद्रव्य अधर्मद्रव्य, कालद्रव्य हीं आपआपल्या गुणांनीं आहेत व परद्रव्याच्या गुणांनीं नाहींत. त्याचप्रमाणें आत्मा आपल्या ज्ञान दर्शनादि गुणांच्या दृष्टीनें आपलें अस्तित्व ठेवणारा आहे आणि स्पर्श, रस, गंधादि गुणांच्या अपेक्षेनें नास्तिरूप आहे. ह्मणजे पुद्गल द्रव्याच्या गुणांनीं आपलें अस्तित्व ठेवणारा नाहीं. स्वधर्मांच्या अपेक्षेनें तो अस्तित्व ठेवणारा आहे तसा परधर्मांच्या स्वरूपानें ही तो आपलें अस्तित्व दाखवील तर जीव आणि अजीव हीं दोन्हीं एक होऊन जातील किंवा जीव अजीव रूप होईल. असा हा अनिष्ट प्रसंग ओढवेल. त्याचप्रमाणें परधर्मांच्या अपेक्षेनें आत्मा जसा आपलें अस्तित्व ठेवणार नाहीं तसा स्वधर्मांच्या अपेक्षेनें ही तो आपलें अस्तित्व ठेवीत नाहीं असें मानाल तर वस्तु शून्यस्वरूप ठरेल म्हणजे जगांत कोणत्या ही वस्तु दिसणारच नाहींत. या करितां श्रीसमंतभद्र आचार्य म्हणतात कीं,—

सदेव सर्वं को नेच्छेत् स्वरूपादिचतुष्टयात् ।
असदेव विपर्यासात् न चेन्न व्यवतिष्ठते ॥ १ ॥

स्पष्टीकरण—गुणपर्यायांना धारण करणारें द्रव्य जितक्या आपल्या प्रदेशामध्यें विभागलें गेलें आहे तेंच त्याचें स्वक्षेत्र आहे. आकाशाच्या ज्या प्रदेशांत वस्तु राहिली आहे तें तिचें क्षेत्र नसून आकाश द्रव्याचें आहे. वस्तु ही परिणतिशील असल्यानें सदैव हिची परिणति चाललेली असते, त्या परिणतीला अंतरंग कारण आणि बहिरंगकारणाची आवश्यकता असते. अंतरंग कारण वस्तु आणि बहिरंग उदासीन कारण काल असल्यानें उपादान कारणामध्यें जी परिणति चाललेली असते त्या परिणतीलाच तिचा स्वकाल असें म्हणतात. कालद्रव्याचा जो समय आहे तो त्या वस्तूचा नसून कालद्रव्याचा आहे, म्हणून वस्तूच्या परिणतीलाच

स्वकाल म्हणणें रास्त आहे. वस्तुचे जे अनेक धर्म आहेत तेच तिचे स्वभाव होत. याप्रमाणें स्वद्रव्य, स्वक्षेत्र, स्वकाल आणि स्वभाव या चारींच्या अपेक्षेनें वस्तु सद्रूप आहे असें कोण बरें शहाणा मनुष्य मानणार नाहीं? तर सर्वही मानतील. परद्रव्य, क्षेत्र काल, भाव यांच्या दृष्टीनें वस्तु असत् रूप आहे. म्हणजे परद्रव्यादि रूपानें ती नाहीं याप्रमाणें अपेक्षा घेऊन वस्तुस्वरूप मानल्यास तें सिद्ध होतें आणि अपेक्षा सोडून वस्तुस्वरूप मानाल तर वस्तूच टिकून राहणार नाहीं. एकाच अपेक्षेनें वस्तूंत विधिनिषेधरूप धर्म मानल्यानें विरोध येईल, वास्तव एका अपेक्षेनें वस्तु विधिरूप आहे आणि दुसऱ्या अपेक्षेनें तीच निषेधरूप आहे. मूळ ग्रंथकारांनीं आपल्या श्लोकांत आत्म्या स्वधर्मांच्या अपेक्षेनें अस्तिरूप आणि पुद्गलादि परवस्तूंतील धर्मांच्या अपेक्षेनें त्याला नास्तिरूप ठरविलें आहे. कित्येक ठिकाणीं आचार्यांनीं द्रव्याच्या अपेक्षेनें वस्तु अस्तिरूप आणि पर्यायांच्या अपेक्षेनें तीच नास्तिरूप ठरविली आहे. याविषयीं समंतभद्राचार्य स्वयंभूस्तोत्रांत असें म्हणतात.

विधिर्निषेधश्च कथंचिदिष्टौ ।
विवक्षया मुख्यगुणव्यवस्था ॥
इति प्रणीतिः सुमतेस्तवेयम् ।
मतिप्रवेकस्तुवतोऽस्तु नाथ ! ॥ १ ॥

स्पष्टीकरणः— वस्तु कथंचित् म्हणजे द्रव्यदृष्टीनें अस्तिरूप आहे आणि पर्यायदृष्टीनें ती नास्तिरूप आहे. असें कां म्हणाल तर सांगणाराची इच्छा ज्या वेळीं द्रव्याकडे असतें त्या वेळीं त्याला द्रव्याशिवाय दुसरा धर्मच दिसत नाहीं म्हणून द्रव्यदृष्टीला प्रधानता दिल्यानें वस्तु अस्तिस्वरूप सिद्ध होतें म्हणजे वस्तु नित्यपणाला व्यक्त करिते. आणि ज्यावेळीं वस्तु पर्यायात्मक दिसत असल्यानें ती नास्तिस्वरूप सिद्ध होतें. याचें कारण हेंच कीं पर्याय नाशवंत असतात म्हणून वस्तूही नास्तिस्वरूप दिसते. उदाहरणार्थ ज्या वेळीं आपण वृक्षाला पाहतो त्या वेळीं

तो डाहाळ्या, पानें, फुलें आणि फळें इत्यादिकांनीं युक्त असलेला दिसेल परंतु डाहाळ्या, पानें, फुलें आणि फळें इकडेच दृष्टि दिल्यानें नुसतें पानें फुलें फांद्या, फळें या शिवाय दुसरा वृक्ष ह्मणून दिसणार नाहीं. त्या प्रमाणें वस्तूच्या द्रव्यस्वरूपाकडे दृष्टि ठेवल्यानें द्रव्याशिवाय पर्याय ह्मणून दिसणार नाहींत आणि पर्यायाकडे दृष्टि दिल्यानें पर्यायाशिवाय द्रव्य ह्मणून दिसणार नाहीं तथापि द्रव्याच्या मुख्यतेच्या वेळीं पर्याय गौण असतात आणि पर्यायांच्या मुख्यतेमध्यें द्रव्य गौण स्वरूपानें असतें. या प्रमाणें वस्तूचें स्वरूप प्रतिपादन करणाऱ्या सुमति तीर्थंकरांना आचार्य ह्मणतात "हे प्रभो? आपल्या तत्त्व प्रतिपादनाला घेऊन आपली स्तुति करणारा असा जो मी त्या माझ्या बुद्धीचा विकास होवो!" विधिनिषेधरूप स्याद्वाद धर्म जिनेश्वरांनीं सांगितला त्या धर्माचें ज्ञान करून घेण्यानें बुद्धीचा विकास होतो. दुसरे आचार्यांनीं आत्म्याला कथंचित् मूर्तिक असें ह्मटलें आहे. त्या मूर्तिक या शब्दाची कल्पना दोन तऱ्हेनें होण्यासारखी आहे. ती अशी:—

व्यवहार नयाच्या योगानें हा आत्मा मूर्त कर्माच्या आधीन झाल्या कारणानें पुद्गलाच्या धर्माचा आरोप आत्म्यावर करून आत्म्याला ही मूर्तिक असें ह्मटलें आहे. आणि शुद्ध निश्चय नयाच्या अपेक्षेनें शुद्ध ज्ञानच आत्म्याचा स्वभाव असल्यानें त्याला अमूर्तिक ह्मटलें आहे. आचार्यांनीं ग्रंथाच्या मूळ श्लोकांत वरील कल्पनेच्या अगदीं उलट कल्पना घेतली आहे. ती ही कीं:—ज्ञानाच्या अपेक्षेनें आत्मा मूर्तिक आहे आणि शरीराच्या अपेक्षेनें तो अमूर्तिक आहे, ह्मणजे आत्म्याला मूर्तिक ठरविण्या करितां आचार्यांनीं 'बोधमूर्तित्वात्' हा हेतु देऊन मूर्तिक ठरविला आहे त्या हेतूचा अर्थ एवढाच आहे कीं ज्ञान हेंच कोणी एक मूर्ती ती असल्यानें तो मूर्तिक आहे. आणि अमूर्तिक सिद्ध करण्या करितां 'विपर्ययात्' हा हेतु दिलेला आहे. त्याचा अर्थ एवढाच कीं शरीररूप मूर्ति नसल्यानें तो अमूर्तिक आहे.

इतर आचार्योंनीं ही या कल्पनेचा उपयोग केला आहे तो असा—

कनत्स्वर्णाभासोऽप्यपगततनुर्ज्ञाननिवहो ।
विचित्रात्माप्येको नृपतिवरसिद्धार्थतनयः ॥
अजन्माऽपि श्रीमान् विगतभवरागोद्भुतगति ।
महावीरस्वामी नयनपथगामी भवतु मे ॥ १ ॥

भावार्थः—दैदीप्यमान सुवर्णाप्रमाणें कांति ज्यांची आहे असें असून ही ज्यांना शरीर नाहीं असे आहेत, अनेक प्रकारच्या गुणांना धारण करीत असल्या मुळें ज्यांचा आत्मा आश्चर्यजनक असून ही ज्ञानरूपी शरीराला धारण करणारा आहे, एकटे असून जे सिद्धार्थराजाचे पुत्र आहेत, जन्म नसूनही जे श्रीमान आहेत, जे विगत भवराग असून ही अद्भुतगति ज्यांची आहे असें आहेत म्हणजे संसारांतील रागभाव ज्यांचा गेलेला आहे असे असून आश्चर्यकारक अधरगमन ज्यांचें आहे असे महावीर प्रभु माझ्या दृष्टिगोचर होवोत! सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, भागचंद्राचार्यांनीं ही 'ज्ञाननिवहः' म्हणजे ज्ञानरूपी शरीर ज्यांना आहे असें म्हटल्यानें ज्ञानाच्या अपेक्षेनेंही आत्म्याला मूर्तिक ठरविलें आहे.

इत्याद्यनेकधर्मत्वं बंधमोक्षौ तयोः फलम् ।
आत्मा स्वीकुरुते तत्तत्कारणैः स्वयमेव तु ॥९॥

अर्थ—हा आत्मा मागें सांगितल्याप्रमाणें अनेक धर्मांना धारण करितो. कर्म व ज्ञान याचें फळ, बंध व मोक्ष याला आणि बंधमोक्षाची जीं कारणें असतील त्या कारणांना हा आत्मा स्वतःच धारण करितो.

स्पष्टीकरणः—आत्मा संसारामध्यें कर्मांनीं बद्ध झालेला आहे, त्या बंधाचीं कारणें उमास्वमी अशीं सांगतात. 'मिथ्यादर्शनाविरतिप्रमादकषाययोगा बंधहेतवः' मिथ्यादर्शन, अविरति, प्रमाद, कषाय, योग हीं सर्व बंधाचीं कारणें आहेत. म्हणजे एकांत मिथ्यात्व, विपरीत मिथ्यात्व, विनयमिथ्यात्व, संशय मिथ्यात्व आणि अज्ञान मिथ्यात्व याप्रमाणें पांच मिथ्यात्वें, हिंसा, लबाडी, चोरी परस्त्रीसंग, आणि

परिग्रह या पांच अविरति, १५ प्रमाद, व मनोयोग वचनयोग, काययोग, हे तीन योग इत्यादिकांनीं आत्म्याला कर्मांचा बंध होतो. त्याचप्रमाणें कुंदकुंदाचार्य पंचास्तिकायांत ह्मणतात कीं,–

जोगणिमित्तं गहणं जोगो मणवयणकायसंभूदो ।
भवणिमित्तो बंधो भावो रदिरागदोसमोहजुदो ॥१॥

अर्थ–मन, वचन आणि शरीर यापासून उत्पन्न होणारा जो योग आहे त्या योगाच्या निमित्तानें कर्मांचें आगमन (येणें) होतें आणि रति, राग द्वेष आणि मोह इत्यादि परिणामांनीं युक्त असलेला आत्मा कर्मांनीं बद्ध होतो. त्या बद्ध होण्यामध्यें योग बाह्य कारण आहे. आणि रागद्वेषादिक अंतरंग कारणें आहेत. कर्मांचा बंध होत असतां आत्मा आपल्या स्वभावापासून च्युत होतो त्यायोगें या आत्म्याला कर्मांचा बंध होतो असें आचार्य सांगतात.

अर्थाद्वैभाविकी शक्तिर्या सा चेदुपयोगिनी ।
तद्गुणाकारसंक्रांतिर्बंधःस्यादन्यहेतुकः ॥ १ ॥

अर्थ–आत्म्यामध्यें वैभाविक नांवाची एक शक्ति आहे ती शक्ति ज्यावेळीं उपयोगांत येते त्यावेळीं आत्मा आपल्या गुणापासून च्युत होतो. ह्मणजे वैभाविक शक्तीची स्वाभाविक परिणति सुटून वैभाविक परिणति होते. त्यावेळीं आत्मा कर्मांनीं बद्ध होतो. त्याची कारणें वर रागद्वेषादिक दाखविलींच आहेत. तत्त्वानुशासनामध्यें नागसेनाचार्यांनीं बंधाचीं कारणें सांगितलीं आहेत तीं हीं–

स्युर्मिथ्यादर्शनज्ञानचारित्राणि समासतः ।
बंधस्य हेतवोऽन्यस्तु त्रयाणामेव विस्तरः ॥ १ ॥

अर्थः— मिथ्यादर्शन, मिथ्याज्ञान, मिथ्याचारित्र हीं बंधाचीं कारणें आहेत. आणि राग, द्वेष, मोह, प्रमादादिक जितकीं म्हणून बंधाचीं कारणें दाखविलीं आहेत तीं या तीहींचाच विस्तार आहे असें समजावें. दर्शन मोहनीय कर्माच्या उदयानें पदार्थांविषयीं यथार्थ श्रद्धा

नसणें याला मिथ्यादर्शन म्हणतात. ज्ञानावरणीय कर्माच्या उदयानें पदार्थांचें यथार्थ ज्ञान न होणें याला मिथ्याज्ञान म्हणतात. आणि चारित्र मोहनीय कर्माच्या उदयानें क्रोधमान मायादि कषायाला वश होऊन मन-वचन शरीराची जी अशुभ प्रवृत्ति ठेवणें यास मिथ्याचारित्र म्हणतात. बंधाच्या कारणामध्यें मोह मुख्य आहे आणि मिथ्याज्ञान हें त्याला कारण आहे. त्या योगानें स्वतःहून भिन्न असलेल्या स्त्री, पुत्र, धनादि स्वरूपाचा मीं आहे असें मानून त्या विषयीं हा प्राणी ममत्वबुद्धि ठेवतो. निश्चय नयानें पाहिलें असतां कर्मकृत परिणांमाहून हा आत्मा वेगळा आहे तथापि हा मिथ्यादर्शनाच्या उदयानें कर्मकृत परिणामालाच आत्मा समजतो. आणि त्या मिथ्याज्ञानाबरोबर असलेल्या मिथ्या दर्शनांच्या योगानें ममत्व बुद्धि उत्पन्न होते. अहंकार व ममत्वबुद्धी पासून रागद्वेषाची उत्पत्ति होते. त्या रागद्वेषापासून कषायांची उत्पत्ति होते. त्या पासून मन वचन काय या योगत्रयांची प्रवृत्ति होते. नंतर हा आत्मा हिंसादि कर्मे करूं लागतो. त्या कारणानें आत्मा कर्मांनीं बांधला जातो. मग याला शरीरादि इंद्रियांची प्राप्ति होते. त्या योगानें इंद्रियाला आवडणाऱ्या पदार्थांवर प्रेम व न आवडणाऱ्या पदार्थांवर द्वेष करून पुनः पुनः तो कर्मांचा बंध करून घेतो. त्याच प्रमाणें कर्मबंधाचीं जीं मुख्य कारणें आहेत त्या कारणांचा नाश झाला म्हणजे पुढें क्रमानें हा प्राणी रागद्वेषादिकांचा ही नाश करितो. या प्रमाणें संपूर्ण बंधांच्या कारणांचा नाश झाला म्हणजे तो मुक्त होतो.

अमृतचंद्राचार्योंनीं निश्चयपद्धतीनें बंध आणि मोक्ष याचें कारण सांगितलें आहे तें हें—

भेदविज्ञानतः सिद्धाः सिद्धा ये किल केचन ।
तस्यैवाभावतो बद्धा बद्धा ये किल केचन ॥ १ ॥

भावार्थ—ज्यांना मुक्ति मिळालेली आहे असे जे सिद्ध भगवान् आहेत ते भेद विज्ञानानेंच (आत्मानुभावानेंच) मुक्त झाले आहेत आणि

या भेदविज्ञानाच्या अभावानेंच प्राणी कर्मबद्ध झाले आहेत. यास्तव मोक्षाचें कारण भेदविज्ञान आहे. या भेदविज्ञानामध्यें केवळ ज्ञानच नसून शुद्धदर्शन, ज्ञान आणि चारित्रमय आत्म्याचा अनुभव असतो. तात्पर्य मोक्षाचें साधन भेद विज्ञान आणि बंधाचें साधन भेदज्ञानाचा अभाव हें आहें.

कर्ता यः कर्मणां भोक्ता, तत्फलानां स एव तु ।
बहिरंतरुपायाभ्यां तेषां मुक्तत्वमेव हि ॥ १ ॥

अर्थ—बाह्य आणि अंतरंग कारणांनीं जो ज्ञानावरणादि कर्मांचा-कर्ता आहे, तोच त्या कर्मांच्या सुखदुःखरूपीं फलांचा भोक्ता ही आहे. या कर्मांचा नाश झाल्यानें मुक्तावस्थेमध्यें कर्मकर्तृत्व व कर्मफलभोक्तृत्व ही अवस्था राहत नाहीं.

भावार्थ—कर्में हीं तीन प्रकारचीं आहेत, द्रव्य कर्म भावकर्म आणि नोकर्म या तीन प्रकारच्या कर्मांचा आत्मा कर्ता अरहे, आणि त्या कर्मां पासून उत्पन्न होणारें जें सुख किंवा दुःख यांचा तो भोक्ता ही आहे संख्यामतावलंबी लोक आत्मा कर्ता नसून तो केवळ भोक्ताच आहे असें मानतात. तें त्यांचें मानणें चुकीचें आहे हें दाखविण्याकरितां आचार्य म्हणतात जो कर्ता आहे तोच भोक्ता ही आहे. जर आत्म्यामध्यें केवळ भोक्तृत्व शक्तिच मानिली आणि कर्तृत्व शक्ति मानिली नाहीं तर भोगणेंरूप जी क्रिया त्या क्रियेमध्यें तरी तो कर्ता ठरलाच. तेव्हां आत्म्याला अकर्ता म्हणणें हें मत अयोग्य आहे. राग द्वेषादिक भावकर्मांचा कर्ता आत्मा आहे असें कुंदकुंदाचार्य प्रवचनसारामध्यें म्हणतात—

परिणामो सयमादा सा पूण किरियत्ति होइ जीवमया ।
किरिया कम्मत्ति मदा तह्मा कम्मस्स ण हु कत्ता ॥ १ ॥

भावार्थः— जीवाचे उत्पन्न होणारे जे परिणाम त्या परिणामाकडून परिणामी जो आत्मा तो भिन्न नसल्यानें परिणामच स्वतः आत्मा आहे. परिणाम म्हणजे क्रिया. ती क्रिया जीवाची असल्यानें तिला जीवमयी

असें म्हटलें आहे. क्रिया म्हणजे कर्म या ठिकाणीं कर्म या शब्दानें जीवाबरोबर राहणारें जें निश्चयात्मक भावकर्म त्याचाच हा आत्मा कर्ता आहे. द्रव्यकर्माचा तो कर्ता नाहीं. त्याचप्रमाणें अमृतचंद्राचार्य नाटक समयसारामध्यें ह्मणतात—

कार्यत्वादकृतं न कर्म न च तज्जीवप्रकृत्योर्द्वयो-
रज्ञायाः प्रकृतेः स्वकार्यफलभुग् भावानुषंगाकृतिः ।
नैकस्याः प्रकृतेरचित्त्वलसनाज्जीवोऽस्य कर्ता ततो
जीवस्यैव च कर्म तच्चिदनुगं ज्ञाता न यत्पुद्गलः ॥ १ ॥

भावार्थः— भावकर्म हें एक कार्य आहे ह्मणून तें कोणी न करता उत्पन्न झालेलें नाहीं व जीव आणि कर्मप्रकृति या दोहोंपासूनही तें झालेलें नाहीं, कारण कर्म हें जड असल्यानें त्याला आपल्या कार्याचें फळ भोगण्याचा प्रसंग येईल. यास्तव एका प्रकृतीचेंच कार्य नाहीं. प्रकृति जड आहे आणि भावकर्म हें चेतन आहे. ह्मणून भाव कर्माचा कर्ता जीवच आहे व तें जीवाचेंच कर्म आहे. तें चैतन्याला अनुसरणारें असल्यानें चैतन्याचाच विकार आहे. पुद्गल जड असल्यानें तें भावकर्म पुद्गलाचें नसून आत्म्याचेंच आहे. तात्पर्य—रागद्वेषरूप भावकर्माचा कर्ता आत्माच आहे. पुनः आचार्य ह्मणतातः—

आत्मभावान् करोत्यात्मा परभावान् सदा परः ।
आत्मैव ह्यात्मनो भावाः परस्य पर एव ते ॥ १ ॥

भावार्थ—आत्मा आपल्या मति, श्रुत, अवधि ज्यामध्यें प्रमुख आ-आहेत अशा विभावपर्यायांचा व केवळ ज्ञान दर्शनादिक शुद्ध पर्यायांचा कर्ता आहे. आत्म्याचे जे परिणाम आहेत तोच आत्मा. कारण द्रव्यदृष्टीनें परिणाम व परिणामी यामध्यें भेद नाहीं. त्याचप्रमाणें पुद्गलाचे जे परिणाम (विकार) आहेत ते पुद्गलाचेच. यांतील सारांश एवढाच कीं ज्याचे जे पर्याय आहेत त्या पर्यायांचा तो कर्ता असतो. इतर पदार्थांच्या पर्यायांचा तो कर्ता नसतो.

पुरुषार्थसिद्ध्युपायामध्येंही असाच आधार मिळतो. तो असा—

परिणममाणो नित्यं ज्ञानविवर्तैरनादिसंतत्या ।
परिणामानां स्वेषां स भवति कर्ता च भोक्ता च ॥ १ ॥

भावार्थ—अनादि परंपरेनें ज्ञानाच्या पर्यायांनीं सदैव परिणमणारा हा आत्मा स्वतःच्या पर्यायांचा कर्ता व भोक्ताही आहे. अनुपचरित असद्भूत व्यवहारनयाच्या अपेक्षेनें ज्ञानावरणादि द्रव्यकर्मांचा आणि औदारिक, वैक्रियक, आहारक या शरीरांना व सहा पर्याप्तींना योग्य अशा पुद्गल पिंडरूप नोकर्मांचा हा आत्मा कर्ता आहे. त्याप्रमाणें उपचरित असद्भूत व्यवहारनयानें बाह्य घट, भांडी, वस्त्रादि पदार्थांचा तो कर्ता आहे. अशुद्धनिश्चय नयानें चैतन्य कर्मांचा ह्मणजे रागद्वेषादि भावकर्मांचा तो कर्ता आहे. कर्मांची उपाधि असल्यामुळें यास अशुद्ध ह्मणतात आणि वर्तमान काळीं तापलेल्या लोखंडाप्रमाणें रागादिमय आत्मा असल्यानें निश्चय ह्मणतात ह्मणून अशुद्ध निश्चयानें भावकर्मांचा कर्ता आत्मा आहे. शुभाशुभ उपयोगाला ज्यावेळीं आत्मा धारण करीत नाहीं त्या वेळीं शुद्ध-ज्ञानस्वरूपानेंच परिणमत असल्यानें संसारी अवस्थेमध्यें देखील एक शुद्धनिश्चय नयानें अनंत ज्ञान दर्शन सुखादिक शुद्ध भावांचा हा कर्ता आहे. मुक्तावस्थेमध्यें शुद्धनयानें शुद्धभावांचा कर्ता आहे. जो पर्यंत हा आत्मा रागादिक हे आत्म्याचे आहेत असें मानणार नाहीं, तो पर्यंत हा रागभावापासून पराङ्मुख होणार नाहीं. आणि रागभावापासून पराङ्मुख झाल्याखेरीज याला शुद्धात्म्याचा अनुभव होणार नाहीं. यास्तव रागादिक भावकर्मालाच आत्मा करितो, द्रव्यकर्माला तो करीत नाहीं असें ज्यावेळीं जाणतो त्याचवेळीं रागद्वेषादिक विकल्पाला सोडून त्यांचा नाश करण्याकरितां स्वशुद्ध आत्म्याची भावना करूं लागतो. त्यायोगें रागादिकांचा विनाश करून आत्मा शुद्ध होतो. शुद्ध निश्चयाप्रमाणें अशुद्ध निश्चय देखील उपादेय आहे. उपचरितासद्भूत व्यवहारानें पंचेंद्रियांपासून उत्पन्न होणारें जें सुख किंवा दुःख याचा आत्मा भोक्ता आहे. अनुप-

चरित असद्भूत व्यवहारानें सुखदुःखाला उत्पन्न करणारें जें द्रव्यकर्म त्याचा ह्मणजे सातावेदनीय व असातावेदनीय कर्मांच्या उदयाचा तो भोक्ता आहे. अशुद्ध निश्चयानें ज्यामध्यें आनंद होतो व विषाद वाटतो असें जें सुखदुःख त्याचा हा भोक्ता आहे. शुद्ध निश्चयनयानें परमात्मस्वभावाची श्रद्धा, त्याचेंच ज्ञान व त्यांतच लीन होण्यानें उत्पन्न होणारें जें आनंदरूपी सुख त्या सुखामृताचा हा भोक्ता आहे. यावरून जो कर्ता आहे तो कर्मफळाचा भोक्ता नाहीं असें मानणाऱ्या बौद्धांचें खंडन झालें. आत्मा मुक्तावस्थेमध्यें कर्मकृत भावांचा कर्ता नसून स्वाभाविक शुद्ध भावांचा कर्ता आहे.

सद्दृष्टिज्ञानचारित्रमुपायः स्वात्मलब्धये ।
तत्त्वे याथात्म्यसंस्थित्यमात्मनो दर्शनं मतम् ॥ ११

अर्थ—शुद्ध आत्म्याची प्राप्ती होण्याला ह्मणजे मोक्षाला सम्यग्दर्शन सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र हीं कारणें आहेत, ह्मणजे उपाय आहेत. जीवादि सप्ततत्त्वाविषयीं किंवा आत्म्याविषयीं यथार्थ श्रद्धा होणें याला सम्यग्दर्शन ह्मणतात.

भावार्थ—जीवादि सप्त तत्त्वांवर श्रद्धान ठेवणें याला सम्यग्दर्शन ह्मणतात. अथवा आत्मानुभवाला सम्यक्त्व ह्मणतात. इत्यादि सम्यग्दर्शनाच्या लक्षणावर विचार केला असतां हीं सर्व ज्ञानरूपेंच पडतात. कारण वस्तुला जशाचे तसें जाणणें आणि जी वस्तु जशी आहे तशी श्रद्धा ठेवणें या दोहोमध्यें फरक नसून दोन्ही ज्ञानाचेच भेद आहेत. या विषयीं पंचाध्यायीमध्यें ह्मटलें आहे कीं,—

श्रद्धानादिगुणा बाह्यं लक्ष्म सम्यग्दगात्मनः ।
न सम्यक्त्वं तदेवेति संति ज्ञानस्य पर्ययाः ॥ १ ॥

अर्थ—सम्यग्दृष्टीचे श्रद्धानादिक जे गुण दाखविले आहेत त्या गुणांवरून त्यांचें लक्षण ठरविणें हें बाह्य लक्षण आहे. श्रद्धादि सम्यक्त्व नसून ते ज्ञानाचेच पर्याय आहेत. जसें ‘ तत्त्वार्थश्रद्धानं सम्यग्दर्शनं ’ हें जें सम्य-

क्त्वाचें लक्षण सांगितलें आहे तें दर्शनरूप पडत नसून ज्ञानरूपच पडतें. तें असें–

अपि चित्सानुभूतिस्तु ज्ञानं ज्ञानस्य पर्ययात् ।
अर्थात् ज्ञानं न सम्यक्त्वं अस्ति चेद् बाह्यलक्षणम् ॥१॥

अर्थ–आत्मानुभूति हा ज्ञानाचा पर्याय असल्यामुळें ती सम्यक्त्व नसून ज्ञानच आहे ह्मणून ज्ञान हें कांहीं सम्यक्त्व नाहीं स्वत्मानुभवाला जरी सम्यक्त्व म्हटलें तरी तें बाह्य लक्षणच आहे. यास्तव सम्यक्त्वाचें खरें वर्णन अल्पज्ञान्याकडून होणार नाहीं. सम्यग्दर्शन हा आत्म्याचा एक सूक्ष्म गुण असल्याकारणानें केवलज्ञानी. परमावधि. सर्वावधि व मनःपर्यय ज्ञानाला धारण करणारे जे असतील त्यांनाच त्याचें ज्ञान होतें; इतरांना त्याचें ज्ञान होणें शक्य नाहीं. सम्यक्त्व हा आत्म्याचा निर्विकल्पक गुण आहे. तो अनादि कालापासून दर्शन मोहनीय कर्मांच्या उदयानें मिथ्यास्वरूपानें परिणत झाला आहे. यास्तव आत्म्याला आपलें दर्शन होत नाहीं. ज्यावेळीं या जीवाला सम्यक्त्वोत्पत्तीचीं कारणें मिळतील त्याचवेळीं सम्यक्त्वाची प्राप्ती होईल; अन्यथा होणार नाहीं. पंचाध्यायीमध्यें सम्यक्त्वोत्पत्तीचीं कारणें दाखविलीं आहेत तीं—

दैवात् कालादिसंलब्धौ प्रत्यासन्ने भवार्णवे ।
भव्यभावविपाकाद्वा जीवः सम्यक्त्वमश्नुते ॥ ३७८ ॥

अर्थ–पूर्व पुण्योदयाच्या योगानें कालादि लब्धींची प्राप्ती झाली असतां व संसाररूपी समुद्राचा अंत–समीप आला असतां ह्मणजे संसारांत फार काळ टिकून राहावयाचें नसतां आणि भव्यत्व गुणाची परिपक्व दशा झाली असतां जीवाला सम्यक्त्वाची प्राप्ति होते.

लब्धि पांच प्रकारच्या दाखविल्या आहेत त्या ह्या–

क्षायोपशमिक लब्धि, विशुद्धि लब्धि, देशनालब्धि, प्रायोग्यलब्धि आणि करणलब्धि. कर्मांचा क्षयोपशम होणें यास क्षायोपशमिकलब्धि ह्मणतात. व कर्मांचा क्षयोपशम होऊन जी शुद्धि होते त्यास विशुद्धिलब्धि ह्मणतात.

मुनी आदिकांच्या उपदेशाचा लाभ होणें याला देशनालब्धि म्हणतात. कर्मांची स्थिति कमी होऊन अंतः कोटीकोटी मात्र राहणें याला प्रायोग्यलब्धि म्हणतात. आत्म्याच्या परिणाममध्यें कर्मांच्या स्थितीचें खंडन व अनुभवाचें खंडन करण्या शक्ति उत्पन्न होणें याला करणलब्धि म्हणतात. सम्यक्त्वाच्या उत्पत्तीमध्यें ह्या लब्धि कारण आहेत. परंतु पहिल्या चार लब्धि सम्यक्त्वाशिवायहि असूं शकतात. कारणलब्धि मात्र उत्पन्न झाल्यावर अंतर्मुहूर्तामध्यें सम्यक्त्वाला प्रगट करितेच. या प्रकारानें निश्चय सम्यक्त्व प्रकट झालें म्हणजे आत्मानुभव होतो. त्या अनुभवामध्यें खरें दर्शन, ज्ञान आणि चारित्र यांचा समावेश होतो. अर्थात् स्वात्मानुभव स्वरूपानें आत्म्याचा अनुभव घेतो व निर्विकार स्वसंवेदन ज्ञानानें रागादिकांपासून आपल्याला भिन्न समजतो आणि सत्तावलोकन दर्शनानें निर्विकल्प स्वरूपाला पाहतो. या प्रमाणें निश्चय रत्नत्रय हें स्वात्मोपलब्धीला कारण आहे व या निश्चयरत्नत्रयाला व्यवहार रत्नत्रय कारण आहे. या दोहोंमध्यें साध्य-साधकपणा आहे.

यथावद्वस्तुनिर्णीतिः सम्यग्ज्ञानं प्रदीपवत् ।
तत्स्वार्थव्यवसायात्म कथंचित् प्रमितेः पृथक् ॥१२

अर्थः— पदार्थ जसें आहेत तसेंच त्याचें ज्ञान होणें याला सम्यग्ज्ञान म्हणतात. व तें सम्यग्ज्ञान दिव्याप्रमाणें स्वतःचें व परपदार्थांचें निश्चयात्मक ज्ञान करून देणारें आहे व फलरूप ज्ञानाहून कथंचित् तें भिन्नहि आहे.

विशेष स्पष्टीकरणः— संशय, विपरीत आणि अनिश्चयात्मक ज्ञानांनीं रहित जें वस्तूच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान होतें तेंच खरें ज्ञान होय व तेंच प्रमाणभूत आहे. ज्याप्रमाणें दिवा इतर पदार्थांचें ज्ञान करून देणारा व स्वतःचेंहि ज्ञान करून देणारा आहे. त्याप्रमाणें ज्ञानहि स्वतःचें व इतर पदार्थांचेंही निश्चयात्मक ज्ञान करून देतें. दिव्याला स्वतःचें स्वरूप दाखविण्याला दुसऱ्या दिव्याची जशी आवश्यकता नसते त्या प्रमाणें ज्ञा-

नालाही आपलें स्वरूप दाखविण्याला इतर ज्ञानाची आवश्यकता लागत नाहीं. दिवा स्वतःच प्रकाश्य व प्रकाशकरूप आहे. त्याप्रमाणें ज्ञानही स्वपरप्रकाशक आहे, म्हणजे स्वतःचें व परपदार्थांचें निश्चितस्वरूप दाखवितें. माणिक्यनंदी आचार्यांनीं ज्ञानाचें वर्णन एका सूत्रांत केलें आहे तें हें—

स्वापूर्वार्थव्यवसायात्मकं ज्ञानं प्रमाणम् ॥ १ ॥

स्व आणि पर पदार्थांचें स्वरूप निश्चितपणें ज्यानें समजतें त्याला ज्ञान असें म्हणतात आणि तेंच ज्ञान प्रमाणभूत आहे. नैयायिकादिमतावलंबी लोक सन्निकर्षालाच प्रमाण समजतात. बौद्धलोक निर्विकल्पक ज्ञानाला प्रमाण मानतात. विज्ञानाद्वैतवादी व ब्रम्हाद्वैतवादी लोक बाह्य पदार्थच मानीत नाहींत. त्याचप्रमाणें मीमांसक लोक ज्ञानाला परोक्ष मानतात. सांख्य लोक ज्ञान हें दुसऱ्या पदार्थालाच जाणतें; त्या ज्ञानाला स्वतःचें ज्ञान होत नाहीं असें मानतात. नैयायिक लोक ज्ञानाला परप्रत्यक्ष समजतात. तेव्हां या सूत्रामध्यें माणिक्यनंदी आचार्यांनीं या सर्वांचें खंडन एका एका पदानें केलें आहे. तें असें—इंद्रिय व पदार्थ यांचा योग्य संबंध होणें याला सन्निकर्ष म्हणतात. या सन्निकर्षामध्यें पदार्थ व इंद्रियें जड असल्यानें तें प्रमाण होऊं शकत नाहीं म्हणून ज्ञान हें पद देऊन त्याचें खंडन केलें. त्याचप्रमाणें निर्विकल्पक ज्ञान हें प्रमाण होऊं शकत नाहीं म्हणून त्या ज्ञानाला व्यवसायात्मक हें विशेषण दिलें. यानें बौद्धांचें खंडन झालें. तसेंच बाह्य पदार्थ नाहींत म्हणणाऱ्या अद्वैतवाद्यांचें व शून्यवाद्यांचें खंडन करण्याकरितां अर्थ—शब्द दिला. ज्ञानाला परोक्ष, अस्वसंविदित, परप्रत्यक्ष मानणाऱ्यांचें खंडन करण्याकरितां स्वपदाचा उपयोग केला. सांगण्याचा सारांश एवढाच कीं, अन्य मतावलंबी लोकांनीं प्रमाणाचें स्वरूप भलतेंच मानलें असल्यानें तें चुकीचें आहे. वेदांती लोक वेदालाच प्रमाण मानतात. व त्याला प्रमाणता येण्याकरितां अपौरुषेय हेतु देतात. म्हणजे वेदाचा कर्ता कोणी पुरुष नाहीं म्हणून वेद प्रमाण आहे

असें ह्मणतात. कर्ता कां नाहीं तर तो अनादि आहे ह्मणून त्या वेदाचा कर्ता नाहीं. अनादि तरी कां आहे तर तो प्रवाहरूपानें नित्य असल्यानें अनादि आहे. याप्रमाणें हेतुमालिका त्या लोकांकडून देण्यांत येते. यावर आपण विचार केल्यास करून घेण्याजोगें आहे. यास्तव प्रश्नोत्तर रूपानें विचार थोडक्यांत करितो.

ही प्रवाहनित्यता शब्दमात्रामध्यें आहे कीं, कांहीं विशिष्ट शब्दामध्येंच आहे ? शब्दमात्रामध्यें आहे ह्मणत असाल तर सर्वच शब्द वैदिक ठरले मग वेदच अपौरुषेय न ठरतां सर्व शास्त्रें अपौरुषेय (कोणी कर्ता नाहीं) असें ठरतील. हा दोष येऊं नये ह्मणून कदाचित् दुसरा पक्ष स्वीकाराल तर पुनः असा एक प्रश्न उपस्थित होतो कीं, त्या विशिष्ट शब्दांचा अर्थ कोणी जाणलेला आहे कीं नाहीं. जर जाणलेला नाहीं तर मग वेदवाक्याला प्रमाणता येणार नाहीं. जर त्या शब्दांचा अर्थ जाणलेला आहे तर मग त्यांचा अर्थ समजावणारा सर्वज्ञ आहे कीं, अल्पज्ञ आहे. जर अल्पज्ञ असेल तर कठीण वेदवाक्याचा अर्थ तो उलटही सांगू शकेल. कारण वेदवाक्य स्वतः हा माझा अर्थ नव्हे हा माझा अर्थ आहे असें कांहीं बोलून दाखविणार नाहीं. मनुष्येंच त्याचें ज्ञान करून घेतात. अशा अवस्थेंत तो मनुष्य अल्पज्ञ आणि रागद्वेषादि दोषांनीं युक्त असला तर तो अवश्य कठीण वाक्याचा अर्थ ध्यानांत नसल्यानें भलताच सांगेल. कदाचित् वेदाच्या अर्थाची परंपरा ठीक चालत आलेली आहे ह्मणून त्याचें यथार्थ प्ररूपण होतें असें ह्मणाल तर, मीमांसकादि लोक भावना, विधि, नियोग इत्यादि भिन्न भिन्न अर्थाला प्रमाण कां मानतात ? यावरून वेदवाक्य अनादि अपौरुषेय सिद्ध होत नाहीं. वेद सांगणारा सर्वज्ञ आहे ह्मणाल तर वेदा प्रमाणें अतींद्रिय पदार्थाला जाणणाऱ्या सर्वज्ञाचें वचनही प्रमाण कां मानूं नये ? अशा वेळीं वेदाला सर्वज्ञपुरुषकृतच प्रमाणता येते. याकरितां वेद अपौरुषेय सिद्ध होत नाहीं. वेदाच्या कर्त्याचें स्मरण होत नाहीं

ह्मणून त्याचा कर्ता नाहीं ह्मणाल तर अशा पुष्कळ वस्तु तुह्माला दाखवितां येतील कीं ज्यांच्या कर्त्यांची बिलकूल आठवणच होत नाहीं. तर मग एवढ्यावरूनच त्यांना अपौरुषेय ह्मणावें कीं काय? जर नाहीं तर वेदालाच असें कां मानावें? त्याचप्रमाणें वेदाच्या कर्त्यांची आठवण होत नाहीं असें सर्व वेदानुयायी मानीतही नाहींत. पिटकत्रयामध्यें वेदकर्त्यांची कांहीं लोक आठवण करितात. यावरून वेद अपौरुषेय न ठरता तो पौरुषेयच ठरतो. याशिवाय वेदामध्यें परस्परविरोधी वाक्यें आहेत. एके ठिकाणीं हिंसेचा निषेध करितात. वेदाच्या एका भागाला एक वेदानुयायी मानीत नाहीं तर त्यालाच दुसरा वेदानुयायी मान देतो. सर्वज्ञभाषित वेद असतां तर पूर्वापर सर्वथा विरोध त्यामध्यें दिसला नसता. यास्तव कोणत्याही प्रकारें वेद प्रमाण नाहीं. वेदामध्यें अशीं पुष्कळ वाक्यें आहेत कीं ज्यांना वेदानुयायी देखील अपौरुषेय मानीत नाहींत, जसें—वटे वटे वैश्रवणः, चत्वरे चत्वरे ईश्वरः, पर्वते पर्वते रामः, सर्वत्र मधुसूदनः।

मा ते भवतु सुप्रीता देवी गिरिनिवासिनी।
विद्यारंभं करिष्यामि सिद्धिर्भवतु मे सदा ॥ १ ॥

अर्थात्—प्रत्येक वृक्षामध्यें कुबेर आहे, घरोघरीं ईश्वर आहे, प्रत्येक पर्वतांत राम आहे. सर्व ठिकाणीं ईश्वर आहे, तुझ्यावर पार्वतीदेवी प्रसन्न होवो. मी विद्येचा आरंभ करीन, सदा माझी सिद्धि होवो इत्यादि. पौराणिक लोक वेदाचा कर्ता ब्रह्मा मानतात. ते ह्मणतात कीं 'वक्त्रेभ्यो वेदास्तस्य विनिसृताः' ह्मणजे ब्रह्माच्या तोंडून वेद निघाले. 'यो वेदांश्च प्रहिणोति' जो वेद पाठवितो. इत्यादि वेद वाक्येंच वेदाच्या कर्त्यांची सिद्धि करितात. शिवाय त्यांत पुष्कळ ऋषींचीं नांवेंही आलीं आहेत. यावरून वेद वाक्यांनीं त्या ऋषींना अनादि मानावें कीं वेदाला. दोहोंपैकीं एकच मानावें लागेल. दोहोंला कांहीं मानता येणार नाहीं. इत्यादि विवेचनावरून वेदाची सिद्धि दाखविणारी एक देखील खरी युक्ति दिसत

नाहीं. करितां वेद प्रमाण नाहीं. ज्ञानच एक खरें प्रमाण आहे. ज्यामध्यें हिताची प्राप्ति व अहिताचा परिहार करण्याचें सामर्थ्य असेल तेंच प्रमाणभूत आहे; आणि तें प्रमाणभूत ज्ञान प्रमितिरूप ज्ञानाहून कथंचित् भिन्न आहे. ज्ञानाला प्रमिति असें नांव आहे. ज्ञानाचे जे उत्तरोत्तर भेद होत जातात त्यांत पूर्वज्ञान प्रमाण व उत्तरज्ञान एक साक्षात् फळ व दुसरें परंपरा फळ असें त्याचे दोन भेद आहेत. त्यांत अज्ञानाचा नाश होणें हें साक्षात् फळ आहे आणि अहिताचा त्याग व हिताचा स्वीकार तसेंच उपेक्षा हीं परंपरा फळें आहेत. व हीं प्रमाणाहून भिन्नही आहेत व अभिन्न ही आहेत या विषयीं अनंतवीर्य आचार्य ह्मणतात कीं—

पारंपर्येण साक्षाच्च फलं द्वेधाभ्यधायि यत् ।
देवैर्भिन्नमभिन्नं च प्रमाणात्तदिहोदितम् ॥ १ ॥

अर्थः— माणिक्यनंदी आचार्यांनीं परंपरा आणि साक्षात् अशीं जीं दोन फळें प्रमाणाचीं दाखविलीं आहेत तीं प्रमाणज्ञानापासून सर्वथा भिन्नहि नाहींत व सर्वथा अभिन्नहि नाहींत. तर कथंचित् भिन्न आणि कथंचित् अभिन्न अशीं आहेत. ह्मणून या ग्रंथांत आचार्यांनीं ' कथंचित् प्रमितेः पृथक् ' या पदानें स्पष्ट केलें आहे.

दर्शनज्ञानपर्यायेषूत्तरोत्तरभाविषु ।
स्थिरमालंबनं यद्वा माध्यस्थ्यं सुखदुःखयोः ॥१३॥
ज्ञाताद्रष्टाऽहमेकोऽहं सुखे दुःखे नचापरः ।
इतीदं भावनादार्ढ्यं चारित्रमथवा परम् ॥ १४ ॥

अर्थ-ज्ञान आणि दर्शन यांचे होणारे जे पर्याय त्या पर्यायांच्या ठिकाणीं स्थिरता ठेवणें किंवा सांसारिक सुखदुःखाविषयीं रागद्वेष भाव नसणें याला चारित्र ह्मणतात, किंवा सांसारिक सुखदुःखाच्या प्रसंगीं दुसरा कोणी नसून ज्ञाता (जाणणारा) आणि द्रष्टा ह्मणजे पाहणारा असा मी एकटाच आहे यापमाणें चिंतवनाची जी स्थिरता यालाही चारित्र ह्मणतात.

विशेष स्पष्टीकरण—गुणाचे जे विकार होतात त्यास पर्याय असें ह्मणतात. त्या पर्यायाचे स्वभावपर्याय व विभावपर्याय असे दोन भेद आहेत. दर्शन गुणाचे चक्षुर्दर्शन, अचक्षुर्दर्शन, अवधिदर्शन आणि केवल दर्शन असे चार भेद आहेत. त्यांपैकीं केवलदर्शन हा स्वभाव पर्याय आहे बाकीचे विभावपर्याय आहेत. त्याच प्रमाणें ज्ञान गुणाचे हीनाधिक रूपानें अनंत भेद होतात. त्यांत केवलज्ञानच स्वभावरूप आहे. बाकीचे सर्व विभावरूप आहेत. स्वभावरूप ज्ञानदर्शन गुणामध्येंही परिणति सारखी चाललेली असते. स्वभावरूपानें होणारे जे ज्ञानदर्शन गुणाचे पर्याय त्यास स्वभाव अर्थपर्याय असेंही ह्मणतात.

याप्रमाणें ज्ञानदर्शन गुणांच्या होणाऱ्या सर्व पर्यायामध्यें आत्म्याचा उपयोग स्थिर ठेवणें याला चारित्र ह्मणतात अथवा संसारामध्यें उत्पन्न होणारें जें सुख किंवा दुःख या विषयीं मनांत असा विचार आणावा कीं साता वेदनीय कर्मांच्या उदयानें संसारांत सुख प्राप्त होतें व असाता वेदनीय कर्मांच्या उदयानें आपल्याला दुःख होतें तेव्हां सुख उत्पन्न झालें ह्मणून आनंदही मानावयाचा नाहीं व दुःख प्राप्त झालें ह्मणून शोकही करावयाचा नाहीं, कारण साता अथवा असाता हीं दोन्हीं कर्मेंच आहेत. कर्में असल्यानें आत्म्याला खरें सुख होऊं देत नाहींत वास्तव सुखदुःखा-विषयीं समान बुद्धि ठेवणें यालाही चारित्र म्हणतात, अथवा संसारामध्यें ज्यावेळीं ह्या आत्म्यावर सुखदुःखाचा प्रसंग येतो त्यावेळीं आत्मा दुसऱ्या स्वरूपाचा नसून जाणणारा व पाहणारा असा तोच मी आहे या प्रमाणें वरचेवर चिंतवन करून भावना स्थिर करणें यालाही चारित्र म्हणतात. इतर ठिकाणीं आचार्यांनीं सामायिक, छेदोपस्थापना परिहार विशुद्धि सूक्ष्मसांपराय व यथाख्यात चारित्र असे चारित्राचे पांच भेद दाखविले आहेत.

शुद्धोपयोग स्वरूपी रत्नत्रयानें युक्त असलेला असा जो आत्मा त्याच्या ठिकाणींच लीन होणें याला चारित्र ह्मणतात.

सर्व जीव केवलज्ञान शक्तीनें युक्त आहेत अशी भावनाठ्यानें समता ठेवणें याला सामायिक ह्मणतात. किंवा संपूर्ण शुभाशुभ विकल्प सोडून समाधि लावणें याला ही सामायिक ह्मणतात. अथवा निर्विकार स्वसंवेदन ज्ञानाच्या सामर्थ्यानें रागद्वेषापासून रहित होणें याला हिं सामायिक ह्मणतात. किंवा स्वतःच्या शुद्ध आत्म्याचा जो अनुभव त्या अनुभवाच्या सामर्थ्यानें आर्तध्यान व रौद्रध्यान यांचा त्याग करणें याला ही सामायिक ह्मणतात. संपूर्ण सांसारिक सुखदुःखाविषयीं रागद्वेष भाव नसणें याला ही सामायिक ह्मणतात. संपूर्ण संकल्पांचा त्याग करणें हें उत्कृष्ट सामायिक आहे. अशा सामायिका मध्यें स्थिर राहण्याला जीव ज्या वेळीं समर्थ होत नाहीं त्या वेळीं हा जीव संपूर्ण हिंसादि पांच पातकांपासून दूर राहण्याकरितां पांच प्रकारच्या व्रतांचा स्वीकार करितो व राग द्वेषादिक सावद्य कर्मापासून पराङ्मुख होऊन आपल्या शुद्ध आत्म्याच्या ठिकाणीं पुनः आत्म्याचें स्थापन करितो याला छेदोपस्थापना चारित्र ह्मणतात. अथवा व्रत भंग झाला असतां निर्विकार स्वसंवेदन स्वरूपी निश्चय प्रायश्चित्तानें अथवा त्या निश्चयाचें साधक असें जे बाह्य व्यवहार प्रायश्चित्त त्यानें आत्म्याला आत्म्याच्या ठिकाणीं लीन करणें याला छेदोपस्थापना चारित्र ह्मणतात. ज्यांची तीस वर्षे सुखांत गेलीं असून कर्मीत कमी ८ वर्षे तीर्थंकराच्या समीप राहून ज्यांनीं प्रत्याख्यान शास्त्राचें अध्ययन केलें आहे व संधिकाल सोडून दोन कोस विहार करणारा जो मुनि त्याचा मिथ्यात्व रागादिक विकल्परूप मलांचा त्याग होऊन विशेष प्रकारानें त्याच्या आत्म्याची शुद्धि होतें त्यास परिहारविशुद्धि चारित्र ह्मणतात.

सूक्ष्मलोभरूप जो कषाय आहे त्याचा उपशम अथवा क्षय ज्या आत्मध्यानानें होतो त्यास सूक्ष्मसांपराय चारित्र ह्मणतात. ज्या प्रमाणें आत्म्याचें स्वभाविक शुद्ध. निष्कंप आणि कषायरहित असें वर्णन केलें आहे त्याप्रमाणेंच यथाख्यात चारित्राचें वर्णन केलें आहे ह्मणून त्यास यथाख्यात चारित्र ह्मणतात. साहाव्या, सातव्या, आठव्या व नवव्या या

चार गुणस्थानांत सामायिक व छेदोपस्थापना हीं दोन चारित्रें असतात सहाव्या व सातव्या या गुणस्थानीं परिहारविशुद्धि चारित्र असतें. सूक्ष्मसांपराय चारित्र दहाव्या गुणस्थानीं असतें आणि यथाख्यात चारित्र अकराव्या, बाराव्या, तेराव्या व चवदाव्या या चार गुणस्थानीं असतें. सामायिक व छेदोपस्थापना या दोन चारित्रांची जघन्य विशुद्धि थोडी त्याही-पेक्षां परिहार विशुद्धि चारित्राची जघन्य विशुद्धि अनंत पटीनें जास्त आहे. आणि यांचीच उत्कृष्ट शुद्धि पूर्वीपेक्षां अनंतपटीनें जास्त आहे. त्याही-पेक्षां सामायिक छेदोपस्थापना या चारित्रांची उत्कृष्ट शुद्धता अनंतपटीनें जास्त आहे. त्यापेक्षां सूक्ष्मसांपरायाची जघन्य शुद्धि अनंत पटीनें जास्त आहे व याचीच उत्कृष्ट शुद्धि अनंत पटीनें जास्त आहे. यथाख्यात चारित्राची त्याहीपेक्षां अनंत पटीनें जास्त आहे. निश्चय सम्यक्त्व व निश्चय ज्ञानाप्रमाणें निश्चय चारित्रही मोक्षाला मुख्य कारण आहे.

यदेतन्मूलहेतोः स्यात्कारणं सहकारकम् ।
तद्बाह्यं देशकालादि तपश्च बहिरंगकम् ॥ १५ ॥

अर्थ– आत्मोपलब्धीची (मोक्षाची) कारणें सम्यग्दर्शन, ज्ञान आणि चारित्र हीं मूळ कारणें मागें श्लोकांत दाखविलीं आहेत. त्या कारणांचीं दुसरीं सहकारीं कारणें बारा प्रकारचें तपश्चरण व बाह्य द्रव्य, क्षेत्र, काल भाव हीं कारणें आहेत.

विशेष स्पष्टीकरण:–जें कार्य दृष्टोत्पत्तीस येतें त्या कार्याला अनेक कारणांची आवश्यकता असते. उदाहरणार्थ, शेतामध्यें उत्पन्न होणारें जें धान्याचें अंकुर आहे त्याला जमीन, हवा, पाणी, वेळ, मनुष्यें, जनावरें, नांगर, औत आदि जितकीं म्हणून साधनें आहेत त्या सर्व साधनांची अवश्यकता असते. बाह्य साधनांवाचून अंकुरोत्पत्ति होणार नाहीं. त्याचप्रमाणें बाह्य साधनें असून अंतरंग साधन जी ज्वारी ती नसेल तरी देखील कार्योत्पत्ति होणार नाहीं. कार्योत्पत्तीला अंतरंग व बहिरंग साधनांची अत्यंत अवश्यकता असते. ही दोन्हीं साधनें ज्या वेळीं जुळ-

तील त्याच वेळीं अंकुरोत्पादन कार्य दृष्टीस पडतें. त्याचप्रमाणें मोक्ष प्राप्तीच्या कार्यालाहि अनेक कारणें आचार्यांनीं सांगितलीं आहेत त्या पैकीं निश्चय रत्नत्रय हें अंतरंग मुख्य कारण आहे. याविषयीं अमृतचंद्र आचार्य नाटक समयसारांत म्हणतातः —

दर्शनज्ञानचारित्रमयात्मा तत्त्वमात्मनः ।
एक एव सदा सेव्यो मोक्ष मार्गो मुमुक्षुणा ॥ ४६ ॥

भावार्थः— निश्चय दृष्टीनें आत्म्याचें खरें स्वरूप सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्रमय आहे व हा एकच मोक्षाचा मार्ग आहे. यास्तव मोक्षाची इच्छा करणाऱ्या माणसांनीं नेहमी या मोक्षमार्गाची सेवा करावी. मिथ्यात्वीं लोकांनीं सांगितलेला मोक्षाचा मार्ग सदोष असल्यानें जिनेश्वरांनीं सांगितलेला आत्मदर्शन, आत्मज्ञान व आत्मानुभवरूप निश्चय रत्नत्रयाचा आश्रय घ्यावा, हाच मोक्षाचा उपाय आहे व हेंच आत्म्याचें स्वरूप आहे. या निश्चय रत्नत्रयाला बाह्य तपश्चरण साह्य करणारें आहे. त्याचे बारा भेद आहेत त्या पैकीं अनशन, अवमोदर्य, वृत्तिपरिसंख्यान, रसपरित्याग, विविक्तशय्यासन, कायक्लेश हे सहा बाह्य तपश्चरणाचे भेद आहेत व प्रायश्चित्त, विनय, वैयावृत्य, स्वाध्याय, व्युत्सर्ग, ध्यान हे सहा अंतरंग तपश्चरणाचे भेद आहेत.

इंद्रिय संयम व प्राणिसंयम या दोन्ही संयमाची प्राप्ति होण्याकरितां व रागद्वेष नाहींसे करण्याकरितां पुष्कळ कर्मांची निर्जरा व्हावी यासाठीं शुभ ध्यान व शास्त्रज्ञान प्राप्त करण्याकरितां एक, दोन, तीन, पांच, सात अथवा पक्ष, मास, वर्षपर्यंत अन्न, पान, खाद्य, लेह्य अशा चार प्रकारच्या आहारांचा त्याग करणें यास उपवास म्हणतात. अशा तऱ्हेचे उपवास मरेपर्यंत अथवा कालमर्यादा करूनहि करितां येतात. जास्त झोंप येऊं नये या करितां व वात, पित्त, कफादि दोष शांत होण्या-करितां, स्वाध्याय करण्यासाठीं व उपवासांच्या श्रमांनीं उत्पन्न झालेला वात पित्तांचा प्रकोप नाहींसा व्हावा व संयमाचें संरक्षण व्हावें याकरितां

आपल्या प्रकृतीस अनुसरून नेहमीपेक्षां अर्धा आहार, पाव आहार, एक घासानें कमी असा आहार घेणें याला अवमोदर्य ह्मणतात.

तपश्चरणाच्या सामर्थ्यानें शरीर कृश करणाऱ्या साधूंनीं संयम पालन करण्याकरितां एक घर, पांच घर, अथवा रस्ता, गांव अथवा भोजन पदार्थ इत्यादिकाविषयीं संकल्प करणें यास वृत्ति परिसंख्यान म्हणतात. यायोगें साधूंची आशा कमी होते.

इंद्रिय स्वाधीन राहण्याकरितां व संयमाचें संरक्षण करण्याकरितां दूध, दही, तूप, गूळ, तेल इत्यादि रसांचा त्याग करणें यास रसपरित्याग तप म्हणतात.

बाधा येऊं नये व ब्रह्मचर्याचें पालन व्हावें, ध्यानाची सिद्धि व्हावी, राग द्वेष नाहींसा व्हावा एवढ्याकरितां ध्यान व अध्ययन यामध्यें बाधा आणणारे पशु, स्त्री, नपुंसक इत्यादि लोक ज्या ठिकाणीं नाहींत अशा पर्वताच्या गुहेमध्यें, स्मशानभूमी व शून्यस्थान, जंगल इत्यादि ठिकाणीं साधूंनीं बसणें, निजणें याला विविक्तशय्यासन ह्मणतात.

वृक्षाच्या मूळाशीं, नदीच्या काठीं, पर्वताच्या शिखरावर इत्यादि ठिकाणीं वीरासन, कुक्कुटासन, पर्यंकासन, अर्धपर्यंकासन, एकबाजूनेंच निजणें, दंडाकार, धनुष्याकार इत्यादि अनेक आसन व शयन यांनीं शरीराला त्रास देणें यास कायक्लेशतप म्हणतात. मिथ्यात्वी लोकांचें पंचाग्निसाधन तपश्चरण हिंसामूलक असल्यानें त्याचा कायक्लेशामध्यें समावेश होत नाहीं. इतरांनाहीं दिसण्यासारखीं असल्यानें यांना बाह्य तपश्चरण असें म्हटलें आहे. करण्यायोग्य गोष्ट न केल्यानें सोडण्याला योग्य अशा गोष्टींचा त्याग न झाल्यानें आचार्याजवळ जावून प्रमादानें झालेले दोष त्यांना सांगून त्यांनीं दिलेला उपवासादि दंड घेणें यास प्रायश्चित्त म्हणतात.

रत्नत्रयांचा व त्या रत्नत्रय धारकांचा मनापासून आदर करणें यास विनय ह्मणतात; याचे ज्ञान, दर्शन, चारित्र आणि उपचार असे भेद आहेत.

आळस सोडून शुद्ध मनानें ज्ञानाचा अभ्यास व त्याचे चिंतवनादिक करणें यास ज्ञानविनय म्हणतात.

जिनेश्वरांनीं सांगितलेल्या पदार्थांविषयीं निःशंक रीतीनें श्रद्धा ठेवणें यास दर्शनविनय म्हणतात. रत्नत्रय धारक साधूंचा व रत्नत्रयाचा विनय मनांत धारण करून त्याचा स्वीकार करणें हा चारित्र विनय होय. प्रत्यक्ष व परोक्ष रूपानें पंचपरमेष्ठींचा आदर करणें यास उपचार विनय म्हणतात. साधूंच्या पाठीमागें जाणें, त्यांना नमस्कार करणें, आले असतां उठून उभे राहणें इत्यादि प्रकार उपचार विनयाचे आहेत.

स्वतःच्या हिताकरितां आहे त्यास स्वाध्याय म्हणतात. स्वतः ग्रंथ वाचणें, वाचून दुसऱ्यास मोक्षमार्गाचा उपदेश करणें यास वाचना स्वाध्याय म्हणतात. आपल्याला उत्पन्न झालेल्या शंका नाहींशा करण्याकरितां आळस सोडून विनयानें दुसऱ्यांना विचारणें यास पृच्छना स्वाध्याय म्हणतात. वारंवार त्याच्या अर्थाचें मनन करणें यास अनुप्रेक्षा म्हणतात निर्दोष रीतीनें ग्रंथ वाचणें यास आम्नाय म्हणतात.

मिथ्यात्वाचा नाश करण्याकरितां, संशय नाहींसा व्हावा व नवीन नवीन पदार्थांचें ज्ञान व्हावें एवढ्याकरितां धर्मकथा, धर्मग्रंथ यांचा उपदेश करणें यास धर्मोपदेश म्हणतात.

स्वाध्यायापासून ज्ञानवृद्धि, पदार्थांचा योग्य निश्चय शास्त्राचा मार्ग स्थिर राहणें, संशय नाहींसा होणें, अन्यमतावलंबी लोकांच्या शंकेचें निरसन, प्रभावना, उत्कृष्ट वैराग्य, तपश्चरणाची वृद्धि, अतिचारांचा अभाव कषाय व इंद्रियें यांचा जय इत्यादि गोष्टींचा फायदा होतो. बाह्य आहार, गृह, धन, स्त्री, मित्रादिकांचा व अंतरंग क्रोध मान मायादिकांचा त्याग करणें यास व्युत्सर्ग म्हणतात.

या प्रमाणें बारा प्रकारचें बाह्य तपश्चरण मोक्षाला साहकारी कारण आहे, तसेंच शुक्लध्यान, उच्चगोत्र, उत्तम जाति, उत्कृष्टशरीर ही सर्व मोक्षाचीं कारणें आहेत या विषयीं आचार्य म्हणतात.

जातिगोत्रादिकर्माणि शुक्लध्यानस्य हेतवः ।
येषु ते स्युस्त्रयो वर्णाः शेषाः शूद्राः प्रकीर्तिताः ॥ १ ॥

भावार्थ—उच्चगोत्र, उत्तमजाति इत्यादि शुभकर्में शुक्लध्यानास कारण आहेत, ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य या तीन वर्णामध्यें वरील गोष्टी दिसून येतात. शूद्रामध्यें ह्या गोष्टी दिसून येत नाहींत.

यावरून उच्चगोत्र, उत्तम जाति मानणें भाग आहे. मोक्षाला वज्रवृषभनाराच संहनन, अवसर्पिणीचा तीसरा काल व चवथा काल या सर्वांची जरूरी असते त्याशिवाय मोक्ष प्राप्ति होणें शक्य नाहीं. हीं सर्व मोक्ष प्राप्तीची सहकारी कारणें आहेत. ज्याप्रमाणें मोक्षाचें निश्चय रत्नत्रय मुख्य साधन आहे त्याप्रमाणें व्यवहार रत्नत्रयही निश्चय रत्नत्रयाचें साधक आहे. या विषयीं तत्वानुशासनामध्यें म्हटलें आहे कीं—

मोक्षहेतुः पुनर्द्वेधा निश्चयव्यवहारतः ।
तत्राद्यः साध्यरूपः स्यात् द्वितीयस्तस्य साधनं ॥ २८ ॥

भावार्थ—निश्चय धर्म आणि व्यवहार धर्म हे दोन्ही मोक्षाचीं साधनें आहेत. त्यांत निश्चय धर्म साध्य आहे आणि व्यवहार धर्म हा त्या निश्चयाचा साधक आहे. तात्पर्य निश्चय धर्माच्या प्राप्तीला व्यवहार धर्म कारण आहे.

इतीदं सर्वमालोच्य सौस्थ्ये दौःस्थ्ये च शक्तितः ।
आत्मानं भावयेन्नित्यं रागद्वेषविवर्जितम् ॥ १६ ॥

अर्थ—मागें वर्णन केल्याप्रमाणें सर्व गोष्टींचा विचार करून सुख दुःखाच्या वेळीं आपल्या शक्तीला अनुसरून नेहमीं रागद्वेष यांनीं रहित अशा आत्म्याचें चिंतन म्हणजे ध्यान करावें.

विशेष स्पष्टीकरण—आत्मा हा कर्मपरवश झाल्यानें नेहमीं सांसारिक सुख दुःखामध्यें पडलेला दिसतो. अशावेळीं या आत्म्याची स्वाभाविक अनंत शक्ति प्रगट होत नाहीं. यास्तव हा प्राणी सुखाच्यावेळीं आनंद व्यक्त करितो व दुःखाच्या प्रसंगीं शोक प्रकट करितो. हें

त्याचें करणें संसार वाढविण्याला कारण असल्यानें आचार्य सांगतात कीं संसारामध्यें सुख सामग्री मिळाली म्हणून त्याविषयीं प्रीति दाखवू नकोस व वाईट प्रसंग आला म्हणून त्याविषयीं द्वेष ही दाखवू नकोस; कारण रागद्वेष हे कर्मबंधालाच कारण आहेत याकरितां आत्म्याचेंच ध्यान करा याविषयीं नेमिचंद्र सिद्धांत चक्रवर्ती म्हणतात कीं—

मा मुज्झह मा रज्जह मा दुस्सह इट्ठणिट्ठअत्थेसु ।
थिरमिच्छह जइ चित्तं विचित्तझाणप्पसिद्धीए ॥ ४८ ॥

भावार्थ—अनेक प्रकारच्या ध्यानांची प्राप्ती व्हावी म्हणून मन स्थिर ठेवण्याची इच्छा करीत असाल तर बायका, मुलें, मित्र, पुष्प, चंदनादि इष्ट वस्तुविषयीं मोह धरू नका, त्याचप्रमाणें शत्रु, विष, कंटकादि पदार्थांविषयीं द्वेष व्यक्त करू नका. मोह राग द्वेष यांचा त्याग केल्यानें ध्यानाची सिद्धि होते. यास्तव:—

आर्त्तं रौद्रं च दुर्ध्यानं वर्जनीयमिदं सदा ।
धर्मं शुक्लं च सद्ध्यानमुपादेयं मुमुक्षुभिः ॥ ३४ ॥

तत्वानुशासन.

भावार्थ—आर्तध्यान व रौद्रध्यान हीं मोक्षाला बाधक असल्यानें मोक्षाची इच्छा करणाऱ्या पुरुषांनीं यांचा त्याग करावा आणि धर्मध्यान व शुक्लध्यान हीं मोक्षप्राप्तीला कारण असल्यानें यांचा स्वीकार करावा.

अकरा अंगें व चवदा पूर्वे इत्यादि शास्त्रांचें ज्ञान ज्यांना होतें असे पुरुष श्रेणी मांडून शुक्लध्यानाचा आरंभ करितात. त्या प्रमाणें सामग्री साधत नसल्यानें शुक्लध्यान जरी होत नसलें तरी धर्मध्यान होण्याला कोणतीच आडकाठी नाहीं. या करितां ध्यान करण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषांनीं ध्याता म्हणजे काय ? ध्यान कशाला म्हणतात ? ध्येय म्हणजे काय ? ध्यानाचें फल कोणतें ? इत्यादि गोष्टींचा योग्य विचार करावा. याचा खुलासा थोडक्यांत असा आहे कीं—

मन आणि इंद्रियें ज्यानें ताब्यांत ठेविलीं आहेत तो ध्याता, व ज्या वस्तूचें चिंतन करावयाचें ती ध्येय होय.

मनाला अनेक ठिकाणीं जाऊ न देतां एका ठिकाणींच रोकून ठेवणें यास ध्यान ह्मणतात. कर्माची निर्जरा होणें व संवर होणें हें त्याचें फल आहे.

ध्यानाचीं साधनें आचार्य सांगतात कीं—

वैराग्यं तत्वविज्ञानं नैर्ग्रन्थ्यं समचित्तता ।
परीषहजयश्चेति पञ्चैते ध्यानहेतवः ॥ १ ॥

भावार्थ—वैराग्यभाव असणें, पदार्थांच्या स्वरूपाचें खरें ज्ञान असणें, दिगंबरपणा, शत्रु—मित्राविषयीं समानबुद्धि असणें आणि परीषह जिंकणें अशीं हीं पांच साधनें ध्यानप्राप्तीचीं आहेत. ज्यानें आपल्या मनाला ताब्यांत ठेवलें त्यानें कुमार्गामध्यें जाणाऱ्या इंद्रियरूपी घोड्याला, ज्ञान आणि वैराग्यरूपी लगाम घालून वाईट मार्गापासून रोकून ठेविलें. ह्मणजे तो इंद्रियांना वाईट मार्गाकडे जाऊ देत नाहीं. त्याचप्रमाणें परिग्रहांचा त्याग करणें, परीषह जिंकणें अनुप्रेक्षांचें चिंतवन करणें, पंचपरमेष्ठींचे जप करणें, जिनेश्वरांनीं सांगितलेल्या शास्त्राचा अभ्यास करणें, नित्य स्वाध्याय करणें—हीं सर्व धर्मध्यानाचीं साधनें आहेत. स्वाध्यायाच्या योगानें ध्यानाचा अभ्यास होतो व ध्यानाच्या अभ्यासानें स्वाध्यायाची वृद्धि होते. ध्यान व स्वाध्यायानें परमात्म्याचें स्वरूप कळतें ह्मणजे परमात्मा प्रकाशित होतो.

पंचमकाळीं आचार्य शुक्ल ध्यानाचा निषेध करितात, तसें धर्मध्यानाचा निषेध करीत नाहींत. यास्तव आपल्या शक्तीला अनुसरून ध्यानाचा अभ्यास करावा. त्याच प्रमाणें शक्तीला अनुसरून तपश्चरण करावें. त्या बरोबर आपल्या खऱ्या आत्मस्वरूपाचें चिंतनही विसरूं नये. निश्चय नयानें आत्मा ज्ञाता द्रष्टा असा आहे. रागद्वेष हे कर्मानें उत्पन्न होतात. कर्म हें भिन्न द्रव्य असल्यानें रागद्वेष हे त्याचे नाहींत. या

विषयीं अमृतचंद्र आचार्य नाटक समयसारांत ह्मणतात कीं:—

वर्णाद्या वा रागमोहादयो वा भिन्ना भावाः सर्व एवास्य पुंसः।
तेनैवांतस्तत्त्वतः पश्यतोमी नो दृष्टाः स्युर्दृष्टमेकं परं स्यात् ॥३७॥

भावार्थः—निश्चय नयाकडे दृष्टी देऊन आत्मा ज्या वेळीं आपल्याला पाहतो त्यावेळीं त्याला आपल्या ठिकाणीं काळा किंवा गोरा, गोड किंवा कडू, हलका किंवा भारी, सुगंध किंवा दुर्गंध यापैकीं कोणतेही गुण दिसून येत नाहींत. राग द्वेष मोह ईर्ष्यादिक उत्पन्न होणारे वैभाविक भाव हे तरी त्यावेळीं दिसत असतील असें ह्मणावें तर तेही दिसत नाहींत. तेही आत्म्याहून भिन्नच आहेत. असें दिसतें त्या वेळीं केवळ एकटा परमात्माच दिसतो. त्याशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं. या ठिकाणीं कोणी शंका घेईल कीं वर्णादिक हे पुद्गलाचे गुण असल्यानें ते मात्र आत्म्याच्या ठिकाणीं दिसणार नाहींत; परंतु रागद्वेष, मोह हे आत्म्याच्या ठिकाणीं दिसत असतांना ते त्याचे नाहींत असे कसें ह्मणावें? या विषयीं श्री ब्रह्मदेव वर्णन करितात कीं—

ज्याप्रमाणें स्त्री आणि पुरुष यांच्या संयोगानें मुलाची उत्पत्ति होते अथवा चुना आणि हळद या दोहोंच्या मिश्रणानें जसा लालरंग उद्भवतो त्याप्रमाणें कर्म आणि आत्मा या दोहोंच्या संयोगानें रागद्वेषाची उत्पत्ति होते. जे सर्वथा रागद्वेषाचा कर्ता आत्मा नाहीं असें समजतात ते अज्ञानी आहेत. या विषयीं नाटक समयसारामध्यें ह्मटलें आहे कीं.

रागजन्मनि निमित्ततां परद्रव्यमेव कलयंति ये तु ते ।
उत्तरंति नहि मोहवाहिनीं शुद्धबोधविधुरांधबुद्धयः ॥ १ ॥

भावार्थ—जे रागभाव उत्पन्न होण्यामध्यें आत्मद्रव्य कारण न मानतां परद्रव्यालाच कारण मानतात ते शुद्ध ज्ञानानें रहित असे आंधळे, मोहरूपी नदीला तरून जात नाहींत. तात्पर्य आत्मा रागभावाला कारण आहे. नयाच्या अपेक्षेनें विचार केला असतां विवक्षित एकदेश अशुद्ध निश्चय नयानें कर्मापासून रागद्वेषाची उत्पत्ति होते. अशुद्ध निश्चयनयाच्या

अपेक्षेनें जीवापासून रागद्वेषाची उत्पत्ति होते. शुद्ध निश्चय नयाच्या अपेक्षेनें पाहिलें असतां ज्या प्रमाणें पुरुष आणि स्त्री यांच्या संयोगावांचून पुत्रोत्पत्ति होत नाहीं किंवा चुना आणि हळद मिसळल्यावांचून तिसरा रंग दिसत नाहीं, त्याप्रमाणें राग आणि द्वेष यांची उत्पत्ति होत नाहीं म्हणजे शुद्ध निश्चय नयानें रागद्वेष कोणाचे आहेत हे सांगतां येत नाहीं. रागद्वेष मोह हेच बंधाला कारण आहेत. या विषयीं पुरुषार्थ सिद्ध्युपाया मध्यें असें म्हटलें आहे कीं -

' येनांशेन तु रागस्तेनांशेनास्य बंधनं भवति '

अर्थात् जेवढ्या अंशानें [भागानें] राग भाव आहे तेवढ्या अंशानें या आत्म्याला बंध होतो. शुद्ध दर्शन, ज्ञान आणि चारित्र हीं जेवढ्या अंशानें असतील तेवढ्या अंशानें बंध होत नाहीं. यांनींही जर बंध होऊं लागेल तर आत्मा कधींच मुक्त होणार नाहीं. मोह या शब्दावरून दर्शन-मोह व चारित्रमोह हे दोन्हीं येतात. शुद्ध आत्मादि तत्वाविषयीं जी विपरीत बुद्धि होते ती दर्शनमोहनीय कर्माच्या उदयानें होते.

निर्विकार स्वसंवेदनरूप वीतराग चारित्राला होऊं न देणारे जें चारित्रमोहनीय कर्म त्याचेच रागद्वेष हे दोन भेद आहेत. क्रोध, मान हे द्वेषाचे भेद आहेत व माया, लोभ हे रागाचे भेद आहेत. हास्य, रति, स्त्रीवेद, पुंवेद, नपुंसकवेद हे रागाचे अंग आहेत. अरति, शोक, भय, जुगुप्सा हे द्वेषाचे अंग आहेत. तात्पर्य, चारित्रमोहनीय कर्माच्या प्रत्येक भागांत रागद्वेषाची मात्रा असते. या रागद्वेषांहून अत्यंत भिन्न अविनाशी, स्थिर, अनंत ज्ञान, दर्शन सुखात्मक हा आत्मा एकटाच आहे. कर्मजनित भाव जे आहेत ते याचे नाहींत व हे योगी पुरुषानांच दिसणार आहेत. असें वारंवार विचार करणें.

याविषयीं पूज्यपाद आचार्य म्हणतात कीं—

एकोऽहं निर्ममः शुद्धो ज्ञानी योगींद्रगोचरः ।
बाह्याः संयोगजा भावा मत्तः सर्वेऽपि सर्वथा ॥ २७ ॥

भावार्थ—या संसारामध्यें मी एकटाच आहे, मला ममत्वबुद्धि ठेवण्यासारखी कोणतीच वस्तु नाहीं. ह्मणजे मी ममत्वबुद्धिनें रहित आहे. त्याचप्रमाणें कोणत्याही तऱ्हेचे कर्ममळ मजमध्यें नाहींत व मी पूर्ण ज्ञानी आहे. अशा तऱ्हेचें माझें स्वरूप साधु लोक पाहतात व जाणतात. कर्मांच्या संबंधानें उत्पन्न होणारे भाव माझे नसून मी त्यापासून अगदींच भिन्न आहे. या प्रमाणें आत्म्याच्या स्वरूपाचें चिंतन करण्यास आचार्य ' आत्मानं भावयेन्नित्यं ' या वाक्यानें सुचवितात.

कषायै रञ्जितं चेतस्तत्त्वं नैवावगाहते ।
नीलीरक्तेऽम्बरे रागो दुराधेयो हि कौंकुमः ॥ १७ ॥

अर्थः—ज्या प्रमाणें निळ्या रंगानें रंगविलेल्या वस्त्रावर केशरी रंग बसणें शक्य नाहीं, त्याप्रमाणें क्रोध, मान, माया, लोभ या कषायांनीं व्याप्त झालेलें अंतःकरण वस्तूचें खरें स्वरूप जाणूं शकत नाहीं.

विशेष स्पष्टीकरण—संसारांत उत्पन्न झालेल्या प्राणीमात्राला आपलें कल्याण करून घेण्याकरितां वस्तूच्या स्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून घेणें इष्ट आहे. अशा तऱ्हेचें ज्ञानप्राप्त करून घेण्याला आधीं ज्याप्रमाणें धान्य उगवण्याला शेताची मशागत करून त्यांतील हराळी वगैरे काढून टाकण्याची आवश्यकता असतें त्या प्रमाणें मनरूपी शेतामध्यें असलेली कषायरूपी हराळी जो पर्यंत काढून टाकणार नाहीं तो पर्यंत मनरूपी शेतामध्यें तत्वज्ञानरूपी धान्य उगवणार नाहीं, ह्मणजे तो पर्यंत मन तत्वज्ञान ग्रहण करण्यास समर्थ होत नाहीं. किंवा ज्या प्रमाणें ' दग्धभूम्युप्तबीजस्य न अंकुरसमर्थता ' जळालेल्या जमीनीमध्यें जरी बी पेरलें तरी त्या बियामध्यें अंकुरोत्पादन (अंकुर उत्पन्न) करण्याचें सामर्थ्य येत नाहीं त्या प्रमाणें कषायरूपी अग्नीनें जळून गेलेल्या अंतःकरणांत तत्वज्ञानरूपी अंकुर कधींच उत्पन्न होणार नाहीं. सारांश तत्वज्ञान ग्रहण करण्याला तें अंतःकरण पात्र नाहीं. अशी एक म्हण आहे कीं ' वाघिणीच्या दुधाला सोन्याचेंच पात्र लागतें. ' त्या प्रमाणें कषायरहित अंतःकरणांतच तत्व-

ज्ञान टिकून राहतें. जो पर्यंत आत्म्यांच्या ठिकाणीं कषाय असत राहतील तो पर्यंत त्या आत्म्याच्या हातुन सरळ रीतीनें धर्मकृत्य अथवा व्यवहारही होणार नाहीं. सर्व कांहीं लोक लज्जेस्तव सरळपणा आणि धर्मकृत्यें करण्याचा आव आणितात या कषायरूपी चोरांच्या ताब्यांत गेल्यावर काय काय अनर्थ त्या आत्म्याकडून होणार नाहींत तर सर्व कांहीं अनर्थ त्याच्या हातून होणार. फार कशाला; आचार्योनीं स्थितिबंध व अनुभागबंध यानाच बंध हें सार्थक नांव दिलें. याचें तरी खरें कारण हेंच कीं स्थितिबंध अनुभागबंध हे कषायानेंच होतात. ह्मणून संसार वाढविण्याला कषायच एक मुख्य कारण आहे. त्या कषायाचे क्रोध, मान, माया आणि लोभ असे चार भेद आहेत. त्याचेंच अनंतानुबंधी आदि अपेक्षेनें सोळा भेद आहेत हे कषाय आत्म्याच्या ठिकाणीं दर्शन व चारित्र होऊ देत नाहींत. ते असे,

'अनंत-अनंतसंसारं अनुबध्नाति स अनंतानुबंधी' ह्मणजे जे अनंत संसाराला वाढवितात त्यास अनंतानुबंधी ह्मणतात. अनंतानुबंधी कषाय जो पर्यंत असतो तो पर्यंत आत्म्याला सम्यक्त्व होऊ देत नाहीं.

'अ— ईषत्, प्रत्याख्यानं— चारित्रं, आवृणोति— रुणद्धि असौ अप्रत्याख्यानावरणः' ह्मणजे एक देश चारित्रही जे होऊ देत नाहीं त्यास अप्रत्याख्यानावरण कषाय ह्मणतात.

'प्रत्याख्यानं— सकलचारित्रं आवृणोतीति प्रत्याख्यानावरणः' ह्मणजे- जे संपूर्ण चारित्र होऊ देत नाहीं त्यांस प्रत्याख्यानावरण ह्मणतात.

'यो यथाख्यातं संज्वलयति भस्मसात् करोति स संज्वलनः' जें यथाख्यात चारित्र होऊ देत नाहीं त्यांस संज्वलन कषाय ह्मणतात.

एक क्रोध असा आहे कीं ज्याप्रमाणें दगडावरील रेषा—ही रेषा पुष्कळ दिवस तशीच टिकून राहते. त्याच प्रमाणें पृथ्वीवर काढलेली रेषा त्याहीपेक्षां कमी वेळ टिकून राहते. आणि मातीवर काढलेली रेषा त्याहीपेक्षां कमी वेळ टिकून राहते. व पाण्यावरील रेषा तर

मिटले. याप्रमाणें शक्तीच्या अपेक्षेनें एका क्रोधाचे चार भेद झाले व ते क्रमानें नरकगति, तिर्यंचगति, मनुष्यगति आणि देवगति या चार गतिला नेणारे आहेत.

मान कषायाला ताठरपणाची उपमा दिलेली आहे. त्याचे पर्वत, हाडुक, लाकूड व वेत हे चार दृष्टांत आहेत.

तीव्र मान ज्याला आहे तो पर्वताप्रमाणें सदैव ताठ्यांत राहणार. किंचित् देखील त्याच्या अंगी नम्रता राहत नाहीं.

हाडूक पर्वतापेक्षां कमी ताठरपणा ठेवणारें आहे. त्यापेक्षां लांकूड आणि वेत लवकर वाकणारे आहेत. अशा तऱ्हेनें चार प्रकारचा मान क्रमानें पूर्वीप्रमाणें चारी गतीला नेणारा आहे.

मायेला वक्रपणाची उपमा दिलेली आहे. तिची उदाहरणें –

वेळूच्या खालील गांठी, मेंढीचें शिंग, गाईचे मूत्र आणि खुरपे. यामध्यें वेळूच्या गांठी फारच वक्र असतात. त्याहीपेक्षां उत्तरोत्तर वक्रतेचें कमी प्रमाण आहे. हेही क्रमानें नरकादि गतीला पोंहचवितात.

लोभाचे दृष्टांत—किरमिजी रंग, गाडीच्या चाकाचें ओंगण, शरीरावरील मळ व हळदीचा रंग. यांत किरमिजी रंगापेक्षां इतर रंग लवकर जाणारे आहेत. या चार प्रकारच्या शक्तीला धारण करणारा लोभ चारी गतीला नेणारा आहे. कषायांश जोपर्यंत आहेत तोंपर्यंत वेगवेगळ्या गतीची प्राप्ती व तत्वज्ञानाचा अभाव याच गोष्टी होत राहतील. वास्तव कषाय कमी करण्याला व आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होण्याला ध्यानाची आवश्यकता आहे. ध्यानाला कषायाच्या अभावाची आवश्यकता आहे. या विषयीं आचार्य सांगतात–

संगत्यागः कषायाणां निग्रहो व्रतधारणं ।
मनोऽक्षाणां जयश्चेति सामग्री ध्यानजन्मने ॥ १ ॥

भावार्थ—परिग्रहाचा त्याग, कषाय जिंकणें, व्रताचें पालन करणें मन आणि इंद्रियें ताब्यांत ठेवणें हीं सर्व साधनें ध्यान उत्पन्न करणारीं

आहेत. यांत कषायांना जिंकण्याचा ही उपदेश आचार्यांनीं केलाच आहे. जो पर्यंत कषाय राहतील तो पर्यंत आत्म्याचें खरें स्वरूप समजणार नाहीं. याकरितां प्रत्येक प्राण्यानें स्वकल्याण साधण्याचें ध्येय पुढें ठेऊन कषाय कमी करण्याचा प्रयत्न करावा.

ततस्त्वं दोषनिर्मुक्त्यै निर्मोहो भव सर्वतः ।
उदासीनत्वमाश्रित्य तत्त्वचिंतापरो भव । १८ ।

अर्थ—तत्वज्ञान न होण्याला कषाय कारण आहेत, म्हणून कषायरूपी दोष नाहींसे करण्याकरितां हे आत्म्या तूं सर्व प्रकारें मोहरहित हो आणि वैराग्यभाव धारण करून वस्तूच्या स्वरूपाचें चिंतन करण्यामध्यें तत्पर हो.

विशेष स्पष्टीकरण—निश्चयानें आत्मा अनादिकालापासून निर्दोष आहे. याच्या ठिकाणीं कोणत्याही प्रकारचे दोष नाहींत. परंतु वाईट मंत्र्याच्या सहवासानें चांगल्या राजाला जसें दोष लागतात त्याप्रमाणें मोहनीय कर्मरूपी मंत्री या आत्म्याच्या जवळ असल्यानें स्वतः निर्दोष आत्मा देखील सदोष होतो. तेव्हां वाईट मंत्र्याचें उच्चाटन केल्याखेरीज जसें राजाचें कल्याण होणार नाहीं त्याप्रमाणें आत्म्याला दूषित करणाऱ्या मोहरूपी मंत्र्याचें उच्चाटन केल्याखेरीज आत्मा दोषमुक्त होणार नाहीं. तात्पर्य, सर्व कर्मांमध्यें मोहनीय कर्मच बलवान असल्यानें त्याचा नाश करणें अत्यंत आवश्यक आहे. या चारित्रमोहनीय कर्माचे दोन भेद आहेत; एक द्रव्य मोह, दुसरा भाव मोह.

पौद्गलिक चारित्रमोहाला (कर्माला) द्रव्य मोह म्हणतात व त्या निमित्तानें आत्म्याचे जे रागद्वेषरूप भाव होतात त्यास भावमोह म्हणतात. भावमोहच सर्व अनर्थाला कारण आहे. या विषयीं पंचाध्यायीमध्यें आचार्य म्हणतात—

अपि यावदनर्थानां मूलमेकः स एव च ।
यस्मादनर्थमूलानां कर्मणामादिकारणम् ॥ १ ॥

अशुचिर्घातको रौद्रो दुःखं दुःखफलश्च सः ।
किमत्र बहुनोक्तेन सर्वासां विपदां पदम् ॥ २ ॥

भावार्थ—या संसारमध्यें जितके म्हणून अनर्थ आहेत त्या सर्व अनर्थांचे मूळ कारण भाव मोह आहे. म्हणजे राग आणि द्वेष हे आहेत. अनर्थाला कारण जरी इतर सर्व कर्मे आहेत तथापि त्या इतर कर्मांनाही भावमोहच कारण आहे. हा भावमोह अपवित्र आहे. आत्म्याच्या गुणांचा घात करणास आहे. रौद्र स्वरूपाचा आहे. स्वतः दुःखरूप आहे आणि दुःख उत्पन्न होणें हेंच त्याचें फळ आहे. तात्पर्य- या भावमोहाला संपूर्ण संकटाची खाणच आहे असें म्हटले तरी हरकत नाहीं. या भाव मोहामध्यें परस्पर कार्यकारणभाव आहे. म्हणजे पूर्वी बांधलेल्या कर्मांच्या उदयानें या भावमोहाची उत्पत्ति होते म्हणून हा कार्यरूप आहे आणि त्या भावमोहापासून ज्ञानावरणादि नवीन कर्मांचे आस्रव होतात म्हणून तो कारण ही आहे.

या भावमोहामध्यें ही एक विशेषता आहे कीं,—

द्रव्य मोहनीय कर्माच्या उदयानें भाव मोहांची उत्पत्ति होते. या मध्यें केवळ द्रव्य मोहनीय कर्म आपल्या भाव मोहालाच कारण पडतें परंतु भाव मोह आठहि कर्मांच्या स्थिति बंध आणि अनुभाग बंध करणारा आहे म्हणून सर्व कर्मांना मूळ कारण भाव मोहनीय कर्मच आहे. या भाव मोहाच्या योगानें आत्म्याच्या चारित्र गुणाची विपरीत अवस्था होऊन रागद्वेषाची उत्पत्ति होते आणि तेच आत्म्याला दूषित करून संसारांत फिरविण्याला कारण होतात. यास्तव दोषरहित होण्यासाठीं मोहापासून म्हणजे रागद्वेषांपासून अलिप्त राहिले पाहिजे.

व्यवहार व निश्चय या दोन्ही नयाच्या अपेक्षेनें वस्तूचें स्वरूप पाहिलें असतां परस्पर भिन्न दिसून येईल. कारण निश्चय नय कर्मांकडे दृष्टि न ठेवतां वस्तूच्या मूळ स्वरूपाचें वर्णन करणारा आहे आणि व्यवहार नय कर्मोपाधिसहित वस्तूच्या स्वरूपाचें वर्णन करणारा आहे.

व्यवहार नयानें पाहिले असतां आत्मा कर्मांनीं लिप्त आहे. रागी आहे, द्वेषी आहे, मतिज्ञानी आहे, श्रुतज्ञानी आहे, कर्म करणारा आहे आणि कर्माचें फळ भोगणारा आहे.

निश्चय नयानें पाहिले असतां आत्म्याला कर्माचा बिलकूल संबंधच नाहीं. त्याचप्रमाणें मतिज्ञानी व श्रुतज्ञानी नसून केवलज्ञानीच आहे. व्यवहार धर्मानें आत्मा कर्मांनीं बांधला जातो आणि निश्चय धर्मानें आत्मा मुक्त होतो. दान, पूजन, जप, तप आदि शुभ कृत्यें व्यवहार धर्मामध्येंच येतात आणि निश्चय धर्मामध्यें यांचा समावेश होत नाहीं. व निश्चय धर्माशिवाय मुक्ति प्राप्त होणार नाहीं. यास्तव केवळ निश्चय धर्मच श्रेष्ठ समजून व्यवहार धर्माचा त्याग केल्यानें व्यवहाराविषयीं द्वेष आणि निश्चया-विषयीं प्रेम व्यक्त होत असल्यानें हा एक प्रकारचा पक्षपातच दिसतो. अशा तऱ्हेचा पक्षपात जोपर्यंत आहे तोपर्यंत उदासीनपणा व्यक्त होणार नाहीं. व उदासीनपणा व्यक्त न झाल्यानें वस्तुच्या स्वरूपाचे खरें चिंतन या आत्म्याला करितां येणार नाहीं. याकरितां व्यवहार व निश्चय या दोहोंविषयीं रागभावही दाखवूं नका आणि द्वेषभावही व्यक्त करूं नका. जे लोक केवळ व्यवहाराला अथवा केवळ निश्चयाला मोक्षाचा उपाय मानून त्याविषयीं राग भाव धारण करीत असतील तर ती त्यांची चूक आहे. व्यवहार आणि निश्चय हे दोन्ही धर्म परस्पर सापेक्ष आहेत ह्मणजे एकमेकावर अवलंबून राहणार आहेत. निश्चय धर्माची प्राप्ती व्यवहार धर्मानें होते. यास्तव निश्चयाला धरून ज्यांचा व्यवहार धर्म आहे तोच खरा व्यवहार धर्म होय. व खऱ्या व्यवहार धर्माला धरून निश्चय धर्मामध्यें निमग्न होणें तोच खरा निश्चय. तात्पर्य व्यवहार व निश्चय या दोहोंविषयीं माध्यस्थ भाव धारण करणें ह्मणजे राग द्वेष भाव सोडून देणेंच रास्त आहे. याविषयीं अमृतचंद्राचार्य पुरुषार्थसिद्ध्युपायामध्यें ह्मणतात.

व्यवहारनिश्चयौ यः प्रबुध्य तत्त्वेन भवति मध्यस्थः ॥
प्राप्नोति देशनायाः स एव फलमविकलं शिष्यः ॥ १ ॥

भावार्थ—जो शिष्य व्यवहार आणि निश्चय या दोन्ही नयांचें स्वरूप जाणून वस्तुस्वरूप समजण्यानें एकाविषयीं राग व दुसऱ्याविषयीं द्वेष अशा तऱ्हेचा भाव मनामध्यें धारण न करितां माध्यस्थ भाव धारण करितो तोच शिष्य उपदेशाचें पूर्ण फळ मिळवितो व इष्ट वस्तु जो मोक्ष तो प्राप्त करून घेतो. यास्तव आचार्यांनीं उदासीनता धारण करून वस्तुच्या स्वरूपाचें चिंतन करण्याकरितां ' तत्व—चिंतापरो भव ' असें म्हटलें आहे. या ठिकाणीं आलेल्या तत्त्व शब्दाची व्याख्या अशी होते कीं ' जो पदार्थ जसा आहे तसाच तो असणें यालाच तत्त्व म्हणतात ' असें नागसेन मुनींचेंही म्हणणें आहे कीं—

चेतनोऽचेतनो वार्थो यो यथैव व्यवस्थितः ।
तथैव तस्य यो भावो याथात्म्यं तत्वमुच्यते ॥ २१ ॥

भावार्थ—चेतन अथवा अचेतन पदार्थ तो जसा राहिलेला आहे तसेंच त्याचें असणें यालाच खरें तत्त्व असें म्हटलें आहे. यास्तव अशा तत्वाच्या विचारामध्येंच तत्पर राहण्याविषयीं आचार्यांचा उपदेश आहे.

हेयोपादेयतत्त्वस्य स्थितिं विज्ञाय हेयतः ।
निरालंबो भवान्यस्मादुपेये सावलंबनः ॥ १९ ॥

अर्थ—टाकण्यास योग्य व ग्रहण करण्यास योग्य अशा वस्तूंचें स्वरूप जाणून टाकाऊ वस्तु त्याज्य असल्यामुळें तिचें अवलंबन धरूं नकोस म्हणजे तिचा आश्रय घेऊ नकोस व घेण्यास योग्य अशा वस्तूचें अवलंबन कर.

विशेष स्पष्टीकरण—पदार्थांमध्यें हेयत्व व उपादेयत्व हे गुण असल्यानें पदार्थ हेय म्हणजे टाकाऊ व उपादेय म्हणजे ग्रहण करण्यास योग्य असे होतात.

संसारी जीवांच्या अपेक्षेनें पाहिले असतां जी वस्तु एकाला हेय वाटते तीच वस्तु दुसऱ्याला ग्राह्य वाटते. उदाहरणार्थ ज्या मनुष्याचा स्त्री-वरील रागभाव नाहींसा झाला आहे त्याला ती स्त्री त्याज्य वाटणार आणि ज्याचा स्त्रीवरील मोह सुटला नाहीं त्याला ती ग्राह्य वाटणार. उदाहरणार्थ--साधू त्याज्य समजून स्त्रीला सोडून देतात तर गृहस्थ ग्राह्य समजून तिचा स्वीकार करितात. वास्तविक पाहिले असतां स्त्री, पुत्र, धन, गृह इत्यादिक विषयभोग हे त्याज्यच समजलें पाहिजे. कारण ज्याचे हे पदार्थ नाहींत ते त्याचे कसें होतील ? जर त्याचे असते तर त्याला सोडून ते गेले नसते. ज्या अर्थी त्याला ते सोडतात त्या अर्थी ते त्याचे नाहींत हे सिद्ध होते. व हे सर्व नाश पावतात यास्तव ते त्याचे मूळचे नसून कर्मानें प्राप्त झालेले आहेत. कर्मानें प्राप्त झालेल्या वस्तु त्या नाशवंत असल्यानें त्यांचा त्याग करणेंच योग्य आहे. या वि-षयीं वादीभसिंह सुरि ह्मणतात—

अवश्यं यदि नश्यंति स्थित्वाऽपि विषयाश्चिरम् ॥
स्वयं त्याज्यास्तथाहि स्यान्मुक्तिः संसृतिरन्यथा ॥ १ ॥

भावार्थ—संसारांतील विषयोपभोगाचे पदार्थ पुष्कळ दिवस टिकून जर अवश्यमेव नाश पावणारे आहेत. तर स्वतः आपण होऊनच त्याचा त्याग कां करूं नये ? अवश्य करावा. स्वतः आपण होऊन त्या वस्तूंचा त्याग केल्यानें मोक्षाची प्राप्ति होते. जर आपण होऊन त्यांचा त्याग केला नाहीं तर संसारपरंपरा आपल्या मागे कायमची लागेल. या करितांच तीर्थंकरासारख्या पूज्य पुरुषांनीं स्त्री पुत्र राज्यादि विभूतींचा त्याग केला आणि आत्मचिंतनाला उपादेय समजून त्याचाच स्वीकार केला. या उपा-देय चिंतनाचे पुष्कळ भेद आहेत. तथापि वेगळ्या रीतीनें सावलंबन व निरावलंबन असें दोन भेद आहेत. याविषयीं श्रीमत्कुमार कवि आत्मप्रबोधामध्यें ह्मणतात कीं—

चतुर्विधध्यानविधिः प्रसिद्धो यथायमन्योऽपि तथा प्रकारः ॥
पिंडास्पदं नाम पदास्पदं च रूपास्पदं रूपविवर्जितं च ॥ १ ॥
त्रीण्यत्र सालंबनभावभांजि ध्यानं निरालंबनमंत्यमेकम् ।
सालंबनाभ्यासनिषद्धलक्ष्यो भवेन्निरालंबन योगयोग्यः ॥ २ ॥

भावार्थ — ज्याप्रमाणें आर्तध्यान, रौद्रध्यान, धर्मध्यान, शुक्लध्यान असें ध्यानाचें चार भेद केले आहेत. त्याचप्रमाणें पिंडस्थ, पदस्थ, रूपस्थ आणि रूपातीत असें चार भेद केलें आहेत. या चार प्रकारच्या ध्यानां-मध्यें पहिलीं तीन ध्यानें कोणत्याना कोणत्या तरी पदार्थाचें अवलंबन घेतात म्हणजे यांच्या स्वरूपामध्यें मग्न होतांना पंचपरमेष्ठींची वगैरे अवश्यकता पडते. परंतु रूपातीत ध्यान कोणत्याहि पदार्थाचें अवलंबन घेत नाहीं; म्हणून ते निरावलंबन आहे. जो साधु प्रथम सावलंबन ध्यानाचा अभ्यास पूर्ण करून त्यांतच गढून जातो तोच साधु निरावलंबन ध्यान धरण्याला योग्य होतो.

तात्पर्य — आधीं पदस्थ, पिंडस्थ, रूपस्थ या ध्यानांचा अभ्यास करून नंतर रूपातीत ध्यानाचा अभ्यास करावा. ज्या साधूला पिंडस्थ ध्यान करण्याची इच्छा असेल त्यानें प्रथम आपल्या आत्म्याला अखंड व तेजःपुंज मानून तो सुख समुद्रामध्यें पडलेला आहे असें समजून त्याचें चिंतन करावें. अथवा आपल्या हृदयरूपीं कमळाच्या ठिकाणीं किंवा नाभिकमळाच्या ठिकाणीं किंवा ललाट भागावर पंचपरमेष्ठी वाचक 'ॐ' या बीजाक्षराची स्थापना करून सदैव त्याचें ध्यान करणें. अथवा शरीर हें सप्तधातूंनीं रहित व दिव्य असें आहे. आत्मा केवलज्ञानापासून कधींहि न ढळणारा असा आहे व आत्मा अर्हंतांच्या संपूर्ण गुणांनीं युक्त आहे—असें समजून वारंवार त्याचें चिंतन करणें. अशा प्रकारच्या चिंतनाला पिंड-स्थध्यान म्हटलें आहे. मंत्राला दाखविणाऱ्या अक्षरांचें, पदांचें अथवा वाक्यांचें चिंतन करणें याला पदस्थध्यान म्हणतात. याचें स्वरूप आत्म-प्रबोधामध्यें असें सांगितलें—

यदक्षरं पदं वाक्यमंतर्जल्पस्थिरीकृतं ।
ध्येयनामांकितं किंचित्स समाधिः पदास्पदं ॥ १ ॥

भावार्थ—ध्यान करण्याला योग्य अशा परमेष्ठीवाचक अक्षर, पद, वाक्य, इत्यादिकांचें उच्चारण तोंडातल्या तोंडांतच करून मन स्थिर करणें व ध्यान धरणें याला पदस्थ ध्यान म्हणतात. 'अ, सि, आ, उ, सा' वगैरे परमेष्ठींच्या नांवाला दाखविणारीं जीं अक्षरें आहेत त्यांचें ध्यान करणें हें सर्व पदस्थ ध्यानामध्यें येतें. 'अ' हें अक्षर अर्हंताचे द्योतक आहे. याविषयीं—

अनंतोऽनंत बोधर्धेरधीशस्थातिशायिनः ।
अकारो लक्षकः साक्षादर्हतः परमेष्ठिनः ॥ १ ॥

अर्थ— अविनाशी अशा अनंत ज्ञान रूपी ऋद्धीला धारण करणाऱ्या व सर्वांचा स्वामी अशा, सर्वोत्कृष्ट अशा व उत्कृष्ट पदाचे धारक अशा अर्हंताच्या पदाला दाखविणारें साक्षात् 'अकार' हें अक्षर आहे. म्हणजे 'अ' या अक्षरावरून वरील गोष्टींचा बोध होतो. त्याच प्रमाणें 'सि' या अक्षरावरून सिद्धांचें ज्ञान होतें. तें असें—

सिध्यातिस्म स्वभावेन सेधतिस्म गतिं परां ।
सिद्धो देवः सिकारस्थो योगिनां सिद्धिसाधकः ॥ १ ॥

अर्थ—जो स्वभावानें सिद्ध झाला व ज्यानें उत्कृष्ट गति (मोक्ष) मिळविली व 'सि' या अक्षरामध्यें राहाणारा जो सिद्ध भगवान् तो साधू लोकांना सिद्धपद प्राप्त करून देणार आहे. 'आ, उ, सा' या अक्षरावरून आचार्य, उपाध्याय व सर्वसाधू यांचा बोध होतो.

आचाराधारधौरेयान् ज्ञानैश्वर्येण संयुतान् ।
आकारो बोधयत्येष आचार्यान्संघनायकान् ॥ १ ॥
उपदेष्टार उत्कृष्टा उदात्ता उन्नतिप्रदाः ।
उपाधिरहिता ध्येया उपाध्याया उकारतः ॥ २ ॥

साधारणा रिपौ मित्रे साधकाः स्वपरार्थयोः ।
साधुवादास्पदीभूताः साकारे साधकाः स्मृताः ॥ ३ ॥

अर्थ—ज्ञान, दर्शन, चारित्र, तप व वीर्य या पांच प्रकारच्या आचारांना धारण करण्यामध्यें सर्वांत श्रेष्ठ आणि ज्ञानरूप ऐश्वर्यानें युक्त असलेले संघाचे जे स्वामी अशा आचार्यांना ' आ ' हे अक्षर जाणविते ह्मणजे ' आ ' या अक्षरावरून आचार्यांचा बोध होतो.

दुसऱ्यांना उपदेश करणारे, रत्नत्रयरूप धर्मानें उत्कृष्ट ठरलेले, गंभीर आणि दुसऱ्यांच्या आत्माची उन्नति करणारे, बाह्य व अंतरंग मलानें रहित असे उपाध्याय ' उ ' या अक्षरानें ध्यान करण्याजोगे आहेत ह्मणजे ' उ ' या अक्षराच्या ध्यानानें उपाध्यायाचें ध्यान सिद्ध होतें. जे शत्रु आणि मित्र यांच्यावर समान बुद्धि ठेवतात ह्मणजे शत्रुवर द्वेष व मित्रावर प्रेम दाखवीत नाहींत स्वतःचे कल्याण साधणारे व दुसऱ्याचें कल्याण करणारे आणि जे प्रशंसेस पात्र आहेत असे साधु ' सा ' या अक्षरामध्यें चिंतन केले गेले आहेत. ' सा ' या अक्षराच्या चिंतनानें साधु परमेष्ठींचें ध्यान होते. याप्रमाणें अ, सि, आ, उ, सा या पांच अक्षरांचा जप जो सदैव मनामध्यें करितो तो मोक्षसुखाची प्राप्ति करून घेतो. त्याचप्रमाणें ' ॐ ' अक्षराच्या ध्यानानें पंचपरमेष्ठींचें ध्यान होतें. ह्मणजे ' ॐ ' या अक्षरामध्यें पंचपरमेष्ठी येतात. ते असें-अर्हंताचे आदि अक्षर ' अ ', सिद्ध हे अशरीरी आहेत ह्मणून त्यांचे ' अ ', उपाध्यायाचा ' उ ' आणि मुनीश्वराचा ' म ' हीं पांच अक्षरें मिळून ' ॐ ' हा शब्द बनला आहे. शिवाय ' ॐ ' अक्षर रत्नत्रयाचें द्योतक आहे. यास्तव मोक्षाच्या प्राप्तिकरितां त्याचें ध्यान करावें.

' ॐ ' या अक्षरामध्यें तीन्ही लोकांचा समावेश होतो. तें असें—अधोलोकाचा आदि अक्षर ' अ ', मध्य लोकाचा अवनि हें नांव आहे ह्मणून ' अवनि ' याचे आदि अक्षर ' अ ' आणि ऊर्ध्व लोकाचा आदि अक्षर ' उ ' या तीहींचा संधी होऊन ' ओ ' हें अक्षर सिद्ध

होतें. त्यानंतर त्याच्यावर असलेली अर्धचन्द्राकृति सिद्ध शिलेला सुचविते. आणि त्या अर्धचंद्राकृतीवर असलेला अनुस्वार सिद्धांच्या समूहाला दाखविणारे आहे. याप्रमाणें तीन्ही लोकांच्या स्वरूपाचा असलेला जो 'ॐ' त्याचें ध्यान केल्यानें तीन्ही लोकांचें ध्यान केल्यासारखें होतें. त्याच प्रमाणें 'ओं' हें अक्षर पांच प्रकारच्या ज्ञानालाही दाखविणारें आहे. तें असें—

मति ज्ञानाला अभिनिबोधिक हें नांव असल्यानें त्याचें आद्य अक्षर 'अ' आणि श्रुतज्ञान म्हणजे आगम त्याचा 'आ', अवधिज्ञानाचे पहिलें अक्षर 'अ', मनःपर्ययज्ञान म्हणजे अंतःकरणात्मकज्ञान त्याचे आद्य अक्षर 'अ' व केवलज्ञानाला उत्कृष्ट ज्ञान म्हटल्याकारणानें त्यांतील आद्य अक्षर 'उ' आणि मोक्षाचा 'म' मिळून 'ओं' असा मंत्र सिद्ध होतो. याच्या ध्यानानें पांच प्रकारच्या ज्ञानाचें फळ मिळतें. त्याच प्रमाणें 'अर्हं' या बीजाक्षराचें वर्णन आचार्यांनीं बरेंच केलें आहे.

'अर्हं' यांतील 'अ' हें अक्षर निराकुल सुखाला दाखविणारें आहे. 'र' हें रत्नत्रय स्वरूपाला दाखवितें आणि 'हं' हें अक्षर संपूर्ण पाप आणि मोह याला नष्ट करणारे आहे. त्याच प्रमाणें 'अर्हं' या मंत्रामध्यें अ, र, ह, आणि अनुस्वार हे चार वर्ण दिसतात त्यांत 'अ' आणि 'ह' या दोन अक्षरावरून अकारापासून हकारा पर्यंतचे जे सर्व वर्ण ते शब्दशास्त्रामध्यें त्यांनाच ब्रह्म असें म्हटलें आहे. म्हणून 'अ, ह' यावरून संपूर्ण शब्दब्रह्माचें ज्ञान होतें व 'ं' कारसहित अनुस्वारावरून संपूर्ण सिद्धांचें ज्ञान होतें. म्हणजे परब्रह्मस्वरूपाचें ज्ञान होतें. सारांश 'अर्हं' या मंत्रावरून शब्दब्रह्म व परब्रह्म स्वरूपाचें ज्ञान होतें 'अर्हं' या मंत्रामध्यें रागभाव नष्ट करून मोक्ष प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य असल्यानें बुद्धिमानांनीं याचें ध्यान अवश्य करावें. तसेंच 'ह्रीं' हा मंत्र दर्शन, ज्ञान, चारित्र व परमात्म्याची प्राप्ति करून देणारा असल्यानें याचेंहि ध्यान अवश्य करावें. त्याचप्रमाणें 'णमो अरहंताणं' इत्यादि

पसतीस अक्षरांचा मंत्र, सोळा, पांच, चार, दोन, एक इत्यादि अक्षरांचे पुष्कळ मंत्र आहेत. ज्यांची माहिती नाहीं असे पुष्कळ मंत्र आहेत त्या सर्व मंत्रांचें ध्यान गुरूपदेशानें करावें. या सर्व ध्यानाला पदस्थध्यान म्हणतात.

रूपवान पदार्थांचें ध्यान ज्यामध्यें केलें जातें त्यास रूपस्थध्यान म्हणतात. जसें अशोक वृक्ष, छत्रत्रय, चमर, सुगंधित वारा, पुष्पवृष्टि, दिव्यध्वनि, भामंडल, सिंहासन या आठ प्रातिहार्यांनीं व चवतीस अतिशयांनीं युक्त, देव इंद्र नरेंद्र इत्यादिकांनीं ज्यांची पूजा केली आहे अशा समवसरणामध्यें विराजमान असलेल्या जिनेंद्राचें ध्यान करणें हें सर्व रूपस्थ ध्यानामध्यें येतें.

रूपादि रहित केवल शुद्ध चैतन्य स्वरूपाचेंच ध्यान करणें याला रूपातीत ध्यान म्हणतात. पिंडस्थ, पदस्थ रूपस्थ या तीन प्रकारच्या ध्यानांमध्यें अर्हंत, आचार्य, उपाध्याय, व साधु या चार परमेष्ठींचें व तत्सदृश साधूंचें अवलंबन घ्यावें लागतं असल्यानें हीं तीन ध्यानें सावलंबन आहेत. आणि सिद्ध परमात्मा निष्कलंक रूपादि गुणांनीं रहित असल्यानें त्यांचें ध्यान करणें हें रूपातीत ध्यान होय व तें निरावलंबन आहे. तात्पर्य या श्लोकांत आचार्यांनीं हेय वस्तूंचा त्याग करून उपादेय स्वरूप असलेले पंच परमेष्ठी व आत्मा यांचें अवलंबन घेऊन ध्यान करावयास सांगितलें आहे. तें योग्यच आहे कारण याविषयीं आचार्य म्हणतात—

हेयोपादेयविज्ञानं नो चेद्व्यर्थः श्रमः श्रुतौ ।
किं व्रीहिखंडनायासैस्तंडुलानामसंभवे ॥ १ ॥

भावार्थ—मनुष्याला संसारांत त्याज्य काय आहे व ग्राह्य काय आहे हें जर कळणार नाहीं तर त्यानें शास्त्राध्ययनाविषयीं केलेला परिश्रम व्यर्थ आहे. उदाहरणार्थ ज्या साळीमधून तांदूळ निघत नसतील तर त्या साळीं कांडण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ आहे. तात्पर्य हेयोपादेय वस्तुचें स्वरूप जाणून तदनुकूल आपलें वर्तन ठेवलें पाहिजे.

तथाप्यतीवतृष्णावान् हंत मा भूस्त्वमात्मनि ।
यावत् तृष्णाप्रसूतिस्ते तावन्मोक्षं न यास्यसि ॥२०॥
मोक्षेऽपि यस्य नाकांक्षा स मोक्षमधिगच्छति ।
इत्युक्तत्वाद्धितान्वेष्टा कांक्षां क्वापि न योजयेत ॥२१॥

अर्थ--हेयरूप पदार्थांचा त्याग व उपादेयरूप आत्म्याचा स्वीकार करण्यास सांगितलें ह्मणून हे आत्म्या तूं आपल्या आत्म्याविषयीं अत्यंत लालसा ठेऊं नकोस. ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे कीं जोपर्यंत तुझ्या ठिकाणीं लालसा उद्भवते तोपर्यंत तूं मोक्षाला जाणार नाहींस. मोक्षाविषयीं देखील ज्याची इच्छा नसते तोच मोक्षास जातो असें सांगितलें असल्यामुळें स्वतःच्या कल्याणाची इच्छा करणाऱ्या माणसानें कोणत्याही वस्तुविषयीं इच्छा दाखऊं नये.

विशेष स्पष्टीकरण संसारांत प्राणी मात्राला जी तृष्णा उत्पन्न होते तिला कारण मोहनीय कर्म आहे. त्यायोगें संसारी जीव अनेक वस्तुविषयीं आशा व्यक्त करीत असतो.

उदाहरणार्थ----कोणाला मुलाची तर कोणाला धनाची, कोणाला मानाची, तर कोणाला सुखाची, कित्येक लोक मूल होत नाहीं ह्मणून अनेक प्रकारच्या मिथ्या देवांचे नवस करितात व कित्येक भोंदु साधूंच्या नादीं लागून अनन्वित वाईट कृत्यें करितात. सर्व गोष्टी करून थकल्या नंतर त्यांची कल्पना अशी होते कीं, कोणाजवळ कांहीं नाहीं, आपल्या नशीबीं असेल तर होईल ह्मणून नशीबावर हवाला ठेवतात. कर्मधर्म संयोगानें मुलाची जरी प्राप्ति झाली तर धनाचीहि आशा पाठीमागें लागलेलीच असतें. १०० रुपये मिळाले तर हजाराची आशा करितो. हजार रुपये मिळाले तर लक्षाची आशा करितो. लक्ष मिळाले तर कोटीची, नंतर राज्याची, त्यानंतर चक्रवर्ति होण्याची लालसा उत्पन्न होते. इतके होऊनहि याची आशा खुंटत नाहीं. त्यापुढें देव होण्याची इच्छा, त्या नंतर देवेंद्र होण्याची याप्रमाणें इच्छित वस्तुची प्राप्ति होऊं लागली

म्हणजे इच्छाहि वाढतच जाते. ती अशी:—

अपि संकल्पिताः कामाः संभवंति यथा यथा ।
तथा तथा मनुष्याणां तृष्णा विश्वं विसर्पति ॥ १ ॥

भावार्थ— या संसारी प्राण्याला इच्छित वस्तुची प्राप्ति जशी जशी होत जाते तशी तशी त्याची लालसाहि जगापर्यंत वाढत जाते. त्यायोगें मनुष्य सर्वांचा दास बनतो असें सुभाषितकार म्हणतात.

आशाया ये दासास्ते दासाः सर्वलोकस्य ।
आशा येषां दासी तेषां दासायते लोकः ॥ १ ॥

भावार्थ— संसारांत जे आशेचे दास झाले ते जगांतील सर्व लोकांचे दास झाले. आणि आशा ही ज्यांची दासी बनली त्यांचे सर्व जग दास बनलें.

उदाहरणार्थ— हल्लीं आपले पूज्य श्री १०८ शांतिसागर आचार्य इतके निरिच्छ आहेत कीं, त्यांना कशाचीहि इच्छा नाहीं; असें लोकांना कळून आल्यावरून हजारो लोक त्यांचें दर्शन घेऊन पवित्र होतात. व त्यांचे दास बनतात. निरिच्छपणाचें महत्व किती आहे हें श्रीचंद्र आचार्यांनीं वैराग्य मणिमालेमध्यें म्हटलें आहे कीं—

जीव जहीहि धनादिकतृष्णां मुंच ममत्वं लेश्यां कृष्णां ।
धर चारित्रं पालय शीलं सिद्धिवधूक्रीडावरलीलं ॥ १ ॥

भावार्थ—हे आत्म्या, तूं धन, स्त्री, पुत्र, मित्रादिकाविषयीं इच्छा धरूं नकोस आणि ममत्वबुद्धि टाकून दे. वाईट लेश्यांचा त्याग कर. चारित्राचा स्वीकार कर. आणि इष्ट वस्तुची प्राप्ति हीच कोणी एक स्त्री त्या स्त्रीचें उत्कृष्ट लीलारूप असलेलें जें शील त्याचें पालन कर. तात्पर्य, इच्छा ही इष्ट वस्तुच्या प्राप्तीला बाधक असल्यानें तिचा त्याग करावा मग ती इच्छा परपदार्थविषयक असो किंवा आत्मविषयक असो. कारण इच्छा जोपर्यंत राहिल तोपर्यंत मोहनीय कर्माचा अंश हा राहणारच. तेव्हां आत्म्याविषयीं देखील इच्छा ठेऊं नये म्हणजे माझा आत्मा मुक्त व्हावा किंवा त्याची सद्गति

व्हावी अथवा त्याला सुख मिळावें अशी देखील मनांत लालसा असूं नये. कित्येक मिथ्यात्वी लोक मुलगा, संपत्ति व परलोक त्यांची प्राप्ती करून घेण्याकरितां यज्ञ यागादि कर्मे करितात, कित्येक तपश्चरण करितात. हें सर्व त्यांचें करणें व्यर्थ आहे असें श्री समंतभद्राचार्य स्वयंभूस्तोत्रांत सांगतात.

अपत्यवित्तोत्तरलोकतृष्णया ।
तपस्विनः केचन कर्म कुर्वते ॥
भवान् पुनर्जन्मजराजिहासया ।
त्रयीं प्रवृत्तिं शमधीरवारुणात् ॥ १ ॥

भावार्थ—अग्निहोत्री, मीमांसक व शैव इत्यादि मतावलंबी साधु बाह्य ढोंग दाखविण्याकरितां तपश्चरण करितात, पण त्या तपश्चरणांत खरा सार बिलकूल नसतो. कारण कित्येक साधु तपश्चरणानें मुलगा व्हावा अशी इच्छा ठेवितात, कित्येक संपत्ति प्राप्त व्हावी म्हणून तर कित्येक स्वर्ग प्राप्ती व्हावी, एवढ्या करितां तपश्चरण व यज्ञ यागादि कर्में चाललेलीं असतात. परंतु सर्व प्राणि मात्रावर समान बुद्धि ठेवणारे हे शीतलनाथ भगवन् आपण जन्म व म्हातारपण यांचा नाश करण्याच्या उद्देशानें मन वचन कायेच्या अशुभ प्रवृत्तीला रोकले व रत्नत्रय धर्माचा स्वीकार केला. यावरून हें सिद्ध होतें कीं कोणतीही इच्छा मनांत ठेऊन कार्य करूं नये. यावर कित्येक अशी शंका करतील कीं मोक्षाविषयीं तरी इच्छा ठेवावी किंवा ठेऊं नये ? याविषयीं आचार्यांचें मत असें आहे कीं मोक्षाविषयीं देखील मनांत इच्छा धारण करूं नये कारण नुसती मनांत आकांक्षा बाळगल्यानें सर्व वस्तु प्राप्त होत नाहींत. इच्छेनेंच सर्व वस्तु प्राप्त झाल्या असत्या तर मोक्षाचे सर्व मार्ग सोडून सर्वांनीं केवल मनांत मोक्षाची इच्छाच ठेविली असती. त्याकरितां शील पाळणें, चारित्र स्वीकारणें, नम्र होणें या गोष्टींची त्यांना आवश्यकताच लागली नसती. त्याचप्रमाणें जगांतील व्यवहार चालविण्याला प्रयत्न करण्याची आवश्यकता

नसून केवळ इच्छेनेंच लोकांनीं व्यवहार चालविला असता, ज्या अर्थी तसें होत नाहीं त्या अर्थी—

रत्नत्रयमुपादाय त्यक्त्वा बंधनिबंधनं ॥
ध्यानमभ्यस्यतां नित्यं यदि योगिन्मुमुक्षसे ॥ १ ॥

भावार्थ—हे साधु मोक्षाला जाण्याची इच्छा असल्यास रत्नत्रय धारण करून बंधांचीं जीं कारणें आहेत त्यांना सोडून देऊन सदैव तूं ध्यानाचा अभ्यास कर म्हणजे निष्काम कर्म हेंच मोक्ष प्राप्तीचें कारण आहे असें समज. वास्तव मोक्षाची इच्छा आणि मरणाची भीति बाळगूं नये. याविषयीं समंतभद्राचार्य म्हणतात.

बिभेति मृत्योर्न ततोऽस्ति मोक्षो ।
नित्यं शिवं वाञ्छति नाऽस्य लाभः ॥
तथापि बालो भयकामवश्यो ।
वृथा स्वयं तप्यत इत्यवादीः ॥ १ ॥

भावार्थ—ज्याला मरणाची भीति वाटते त्याला मोक्ष मिळत नाहीं आणि जो सदैव मोक्षाची इच्छा करितो त्यालाही मोक्षाची प्राप्ति होत नाहीं. असें जरी आहे तरी अज्ञ प्राणी मरणाच्या भयानें इच्छेच्या आधीन होतो. आणि त्यायोगें स्वतः क्लेश करून घेतो. यासाठीं बुद्धिमान माणसांनीं कोणत्याही वस्तुविषयीं मनांत इच्छा ठेऊं नये.

स्वं परं चेति वस्तुत्वं वस्तुरूपेण भावय ।
उपेक्षाभावनोत्कर्षपर्यंते शिवमाप्नुहि ॥ २ ॥

अर्थ—वस्तुच्या स्वरूपानें स्वपर पदर्थांच्या वस्तुत्वाचें चिंतन कर आणि उदासीन भावनेच्या उत्कर्षापर्यंत जाऊन मोक्षाची प्राप्ति करून घे.

विशेष स्पष्टीकरण—जगांत जितके म्हणून पदार्थ आहेत ते सर्व स्वपरपणाला घेऊन राहिले आहेत.

उदाहरणार्थ—सोनें आपल्या स्वरूपानें राहिलें आहे आणि चांदी आपल्या स्वरूपानें राहिली आहे. चांदीहून सोनें वेगळे आणि

सोन्याहून चांदी वेगळी आहे. त्याप्रमाणें आत्मा वेगळा आणि इतर पदार्थ वेगळे आहेत वरील उदाहरण स्थूल असल्यानें पर्यायाच्या अपेक्षेनें त्यामध्यें भिन्नता आहे. पुद्गल द्रव्याच्या अपेक्षेनें पाहिलें असतां सोनें आणि चांदी या दोहोंमध्यें भेद मानतां येणार नाहीं. परंतु आत्मा आणि इतर पदार्थ या दोहोमध्यें तसें मानतां येणार नाहीं. आत्मा हा चैतन्य गुणाला घेऊन राहिला आहे आणि इतर द्रव्यें अचेतनपणाला घेऊन राहिलीं आहेत. स्त्री, पुत्र, धनादिक हे सर्व आपल्या आत्म्याहून भिन्न आहेत. असें असतांना हा प्राणी मोहामुळें आपले मानतो. याविषयीं पूज्यपाद स्वामी इष्टोपदेशामध्यें म्हणतात—

वपुर्गृहं धनं दाराः पुत्रमित्राणि शत्रवः ।
सर्वथान्यस्वभावानि मूढः स्वानि प्रपद्यते ॥ १ ॥

अर्थ—शरीर, घर, संपत्ति, बायको, मुलगा, मित्र आणि शत्रु हे सर्व आत्म्याहून अगदींच निराळे आहेत. परंतु ज्याला स्वपर पदार्थांचें ज्ञान नाहीं असा अज्ञ मनुष्य या सर्वांना आत्मा समजून त्यांच्यावर आत्मिक बुद्धि ठेवतो. संसारामध्यें या पदार्थांचा संबंध कांहीं दिवसाचाच आहे. याविषयीं पूज्यपाद आचार्य म्हणतात—

दिग्देशेभ्यः खगा एत्य संवसंति नगे नगे ।
स्वस्वकार्यवशाद्यांति देशे दिक्षु प्रगे प्रगे ॥ १ ॥

भावार्थ— ज्याप्रमाणें पक्षी अनेक दिशेहून व देशाहून येऊन प्रत्येक झाडावर बसतात आणि पुनः पहाटेच्या वेळीं आपआपल्या उद्योगाकरितां पूर्वीच्या ठिकाणीं न जातां वाटेल त्या दिशेला जातात. त्या प्रमाणें कर्मोदयानें स्त्री, पुत्रादिकांचा संबंध झालेला आहे. तो कायमचा नसून नियमित काळाचाच आहे. यास्तव ते सर्व आत्म्याहून भिन्न आहेत आणि आत्मा त्याहून भिन्न आहे याविषयीं नाटक समयसारांत म्हटलें आहे.—

एकश्चित चिन्मय एव भावो भावाः परे ये किल ते परेषां ।

ग्राह्यस्ततश्चिन्मय एव भावो भावाः परे सर्वत एव हेयाः ॥१५॥

भावार्थ— चैतन्य स्वरूपी आत्म्याचा स्वभाव ज्ञानदर्शनमय आहे. आणि याहून इतर जितके ह्मणून भाव आहेत ते सर्व आत्म्याचे नसून इतर पदार्थांचे आहेत. याकरितां आत्म्याचे जे भाव आहेत ते त्याचे आहेत आणि त्याचाच स्वीकार करावा. चैतन्यस्वरूपाहून भिन्न असलेले जे भाव आहेत ते सर्व त्याज्य आहेत. याप्रमाणें वस्तूच्या स्वरूपाचें चिंतन करून उदासीन भावनेला वाढवीत वाढवीत इतके वाढविलें पाहिजे कीं, ज्यायोगें मोक्षाची प्राप्ति होईल.

सापि च स्वात्मनिष्ठत्वात् सुलभा यदि चिंत्यते ।
आत्माधीने फले तात यत्नं किं न करिष्यसि ॥२३॥

अर्थ— उपेक्षारूप भावना ह्मणजे उदासीनता धारण करणें हें आत्म्याच्या स्वाधीन असल्यामुळें तिचा विचार केला जातो. तर बाबा, आत्म्याच्याच स्वाधीन असलेल्या मोक्षरूपी फलाविषयीं तूं कां प्रयत्न करीत नाहींस ? तर अवश्य कर.

विशेष स्पष्टीकरण— कित्येक लोकांची अशी कल्पना आहे कीं, उदासीनता धारण करून दैवावरच हवाला देऊन बसले ह्मणजे कार्य झालें. सर्व कांहीं दैवच घडवून आणतें. जास्त उठाठेवी करण्याची अवश्यकता नाहीं. असें समजून मोक्षप्राप्तीच्या मार्गामध्यें फारच उदास असतात. ह्मणजे प्रयत्नशून्य राहतात. त्यायोगें रत्नत्रय धर्म पाळणें, मंदिर बांधणें, वसतिका बांधणें, विद्यादान देणें या सर्व गोष्टीकडे दुर्लक्ष्य करितात ह्मणजे उदासीनता धारण करितात. ही खरी उदासता नसुन एक प्रकारचा आळस आहे. ज्याच्या योगानें धर्माची व स्वतःच्या आत्म्याचीहि उन्नति करून न घेतां उलट स्वतः फसतात. केवळ उदासीनपणा धारण करून दैवावरच हवाला ठेवून बसल्यानें कार्यसिद्धि होत नाहीं. याविषयीं श्री समंतभद्राचार्य ह्मणतात.

दैवादेवार्थसिद्धिश्चेद्दैवं पौरुषतः कथम् ।
दैवतश्चेदनिर्मोक्षः पौरुषं निष्फलं भवेत् ॥ १ ॥

भावार्थ—दैवानेंच जर कार्यसिद्धि होते तर दैव पुरुष प्रयत्नानें कसें उत्पन्न होतें ? पुरुष तपश्चरणादि अनेक प्रयत्न करून दैव अनुकूल कां करून घेतो? दैवानें द्रव्याचा हांडा दाखवला ह्मणून पुरुषानें उचलून घेतल्याशिवाय त्याला तो मिळेल काय ? सिंह बलाढ्य आहे ह्मणून पशु आपण होऊन त्या सिंहाच्या दाढेंत सापडत नाहींत. दैव अनुकूल करण्याला प्रयत्न कारण न मानतां दैवच कारण मानाल तर कधींच मोक्ष प्राप्ती होणार नाहीं, आणि पुरुषप्रयत्न व्यर्थ ठरेल. त्याचप्रमाणें दैव न मानतां प्रयत्नच कार्यसिद्धि करितो ह्मणावें तर तेंही चुकीचें आहे.

पौरुषादेव सिद्धिश्चेत् पौरुषं दैवतः कथम् ।
पौरुषाचेदमोघं स्यात् सर्वप्राणिषु पौरुषम् ॥ १ ॥

भावार्थ—पुरुषाच्या प्रयत्नानेंच कार्याची सिद्धि होते ह्मणाल तर प्रयत्न हा दैवापासून कसा उत्पन्न होतो ? ह्मणजे पुरुषाच्या प्रयत्नामध्यें दैवही कारण असल्यानें प्रयत्न हा सफल होतो. अन्यथा ज्यांचें दैव अनुकूल नाहीं अशांचे देखील प्रयत्न व्यर्थ होणार नाहींत. तात्पर्य, ज्यांचें दैव अनुकूल आहे व ज्यांचें तें अनुकूल नाहीं अशा दोघां पुरुषांच्या प्रयत्नाचें फल त्यांना सारखेंच मिळालें पाहिजे व जगामध्यें श्रीमंत आणि दरिद्री अशीही परिस्थिति दिसूं नये. ज्याअर्थी दिसते त्याअर्थी प्रयत्न आणि दैव हे दोन्ही कार्यसिद्धीला कारण आहेत. असें मानणेंच रास्त आहे. यास्तव मूल ग्रंथकर्त्या आचार्यांचें म्हणणें असें आहे कीं ज्याप्रमाणें उदासीनता आत्माधीन असल्यानें सुलभ वाटून तिचें जसें चिंतन करितोस त्याच प्रमाणें मोक्ष प्राप्त करून घेणें हेंही आत्म्याच्याच स्वाधीन असल्यानें दैवावर हवाला देऊन न बसतां प्रयत्न हा अवश्य करावा. केवळ उदासीनपणानें (आळसानें) कार्यसिद्धि होत नसून प्रयत्न हा केलाच पाहिजे. ज्यांना संसारांत धर्मकार्याविषयीं प्रयत्न करावयाचा

नाहीं व पडल्या पडल्या आळसांत दिवस काढावयाचे आहेत त्यांनीं मात्र उदासीनपणाचे मिष घेऊन दैवावर अवलंबून बसावें. पण ज्यांना आपल्या आत्म्याची उन्नति करून घेणें आहे त्यांनीं निष्काम प्रयत्न करण्यामध्यें कसूर करता कामा नये एवढ्याकरितां आचार्यांचें म्हणणें आहे कीं—' यत्नं किं न करिष्यसि ' तूं प्रयत्न कां करीत नाहींस, तर अवश्य प्रयत्न कर !

—=—

स्वं परं विद्धी तत्रापि व्यामोहंछिन्धि किन्त्विमम् ॥
अनाकुलस्वसंवेद्ये स्वरूपे तिष्ठ केवले ॥ २४ ॥

अर्थ—मोक्ष प्राप्त करून घेणें हें जरी आत्म्याच्या स्वाधीन आहे, तथापि स्व म्हणजे आत्मा आणि पर म्हणजे आत्म्याहून भिन्न इतर पदार्थ यांचें ज्ञान करून घे व पर पदार्थांवरील मोह सोडून दे आणि ज्यामध्यें कोणत्याही प्रकारची आकुलता नाहीं अशा स्वसंवेदनरूपी आत्मध्याना-मध्येंच निमग्न राहा.

विशेष स्पष्टीकरण—आत्म्याला जोपर्यंत पर पदार्थांचें ज्ञान होणार नाहीं तोपर्यंत स्व पदार्थांचें ज्ञान होणार नाहीं. म्हणून स्व आणि पर या पदार्थांचें ज्ञान परस्परावर अवलंबून असल्यानें स्व ज्ञान करून घेणें ज्ञा-ल्यास पर पदार्थांचेंही ज्ञान करून घेतलें पाहिजे. पर पदार्थांचें ज्ञान झा-ल्यावाचून स्वपदार्थांची कल्पना येणार नाहीं. पर या शब्दाचा उच्चार झा-ल्यानें असें ज्ञान होतें कीं दुसरा स्व नांवाचा एक पदार्थ असावा. आणि स्व पदाचा उच्चार होण्यानेंच पर म्हणून एक पदार्थ असावा अशी एक आकांक्षा मनांत उत्पन्न होते. त्याप्रमाणें जगांत स्वपर पदार्थ असल्यानें त्यांचें ज्ञान करून घेणें रास्त आहे. स्वपर पदार्थांचें ज्ञान होणें सुलभ न-सून कष्टसाध्य आहे. त्याकरितां पहिल्यानें परपदार्थांवरील मोह सोडून दिला पाहिजे. या मोहानेंच सर्व कांहीं अनर्थ होतात. याविषयीं वादी-भसिंह सूरिही म्हणतात कीं,

मुह्यंति देहिनो मोहान्मोहनीयेन कर्मणा ।
निर्मित्ताभिर्मिताशेषकर्मणा धर्मवैरिणा ॥ १ ॥

भावार्थ--संसारी प्राणी या मोहनीय कर्माच्या उदयानेंच स्त्री, पुत्र, धन इत्यादि परपदार्थांवर मोह करितात. धर्माशीं विरोध करणारा हा मोहच आहे आणि हा मोह इतर संपूर्ण कर्मांचा पिता आहे. कारण इतर सर्व कर्में या मोहनीय कर्मानेंच उत्पन्न होतात. जोपर्यंत मोह राहील तोपर्यंत स्वज्ञान म्हणजे आत्मज्ञान होणार नाहीं असें पूज्यपाद आचार्य इष्टोपदेशामध्यें म्हणतात.

मोहेन संवृतं ज्ञानं स्वभावं लभते न हि ।
मत्तः पुमान्पदार्थानां यथा मदनकोद्रवैः ॥ १ ॥

भावार्थ--ज्याप्रमाणें धोतऱ्याच्या बिया खाऊन मनुष्य उन्मत्त झाला म्हणजे त्याला जसें पदार्थांचें ज्ञान होत नाहीं त्याप्रमाणें मोहानें आच्छादिलेले ज्ञान आत्मस्वरूपाची प्राप्ति होऊं देत नाहीं. वास्तव या मोहाचा नाश केला पाहिजे व चित्त शांत ठेऊन, एकांत जागीं बसून, आळस सोडून आत्मज्ञानाचा अनुभव घेण्या करितां अभ्यास चालू ठेवावा. या अनुभवामध्यें जस जसें आत्मज्ञान वाढत जातें तस तसें याची बाह्य विषया वरील प्रीति नाहींशी होते. या विषयीं पूज्यपादाचार्य असें म्हणतात--

यथा यथा समायाति संवित्तौ तत्त्वमुत्तमम् ।
तथा तथा न रोचंते विषयाः सुलभा अपि ॥ १ ॥
यथा यथा न रोचंते विषयाः सुलभा अपि ।
तथा तथा समायाति संवित्तौ तत्त्वमुत्तमम् ॥ २ ॥

भावार्थ--जसजसें ज्ञानामध्यें आत्म स्वरूपाचें शुद्धत्व प्रगट होत जातें तस तसें या आत्म्याला बाह्य सुंदर भोग्य पदार्थ मिळत असतां देखील ते त्याला आवडे नासे होतात, कारण शुद्ध आत्म्यापासून उत्पन्न होणाऱ्या सुखापुढें बाह्य विषयसुखाची कांहींच किंमत नाहीं असें त्यां ला वाटूं लागतें. जगांतील लोकांची ही अशीच प्रवृत्ति दिसून येते कीं

मिळणारा जास्त फायदा सोडून कमी फायद्याकडे कोणी दृष्टि देत नाहीं, किंवा जास्त सुख मिळत असतांना कमी सुखाची इच्छा कोणी करीत नाहीं. त्याप्रमाणें आत्मिक सुख खरें असल्या कारणानें साधु विषयसुखाकडे पाहात देखील नाहींत. जस जसें यांना सुलभ भासणारे बाह्य पदार्थ आव डत नाहींत म्हणजे त्या पदार्थांवरील आसक्ति जस जशी कमीं होत जाते तस तसें आत्मज्ञानांत शुद्धता प्रगट होत जाते. आहार, विहार, निद्रा आणि वचन विलास या गोष्टी कमी होत जातात. त्यायोगें शुद्धात्मस्वरूपाचा अनुभव या जीवाला होत जातो. आत्मानुभवाची इच्छा करणाऱ्या माणसांनीं कषाय, विषयप्रेम, आहाराचे पदार्थ हे कमी करीत गेले पाहिजे. घरीं ऐष आरामांत लोडाला टेकून बसल्या बसल्या आत्मज्ञान होणें शक्य नाहीं. याविरुद्ध असा प्रश्न निघेल कीं 'भरतजी घरमे बैरागी' म्हणजे भरत चक्रवर्ती हे घरीं राजैश्वर्य भोगत असतांनाही विरक्त होतें कीं नाहीं? त्याचप्रमाणें अंतर्मुहूर्तामध्यें त्यांना केवलज्ञान झालें कीं नाहीं? या गोष्टींशीं तुलना करून आज पाहूं गेल्यास त्यांपैकीं आतां एकही दिसून येत नाहीं. कारण भरतचक्रवर्तींचें संहनन व त्यांची आत्मविशुद्धि आणि त्या वेळचें द्रव्य, क्षेत्र, काल, भाव हे आज दिसतात काय? यांपैकीं एकही दिसत नाहीं. एवढ्याकरितां अपवादात्मक नियम घेऊन साधारण नियमाशी सांगड घालणें रास्त नाहीं. कारण इतर पुष्कळ जीव असतांना केवळ भरतचक्रवर्तींनाच आत्मज्ञान व्हावें इतरांना तसें कां होऊ नये! तेवढे एकटेच उदाहरणाला कां दिसावेत! यावरून हेंच सिद्ध होतें कीं हा सर्व साधारण राजमार्ग नसून हा एक विशेष मार्ग आहे. इतकी विशिष्टता असूनही मुक्ति मिळविण्याकरितां दीक्षाही त्यांना घ्यावी लागलीच. केवळ राजैश्वर्यामध्यें बसून त्यांनीं मुक्ति मिळविली नाहीं, हेंही लक्ष्यांत घेतलें पाहिजे. या विशिष्टपणाचा उपयोग सर्व साधारण जीवांना मिळणें शक्य नाहीं. एवढ्याकरितां इंद्रियदमन, कषायत्याग, आहारत्याग, कायक्लेशादि जी कांहीं साधनें

आचार्योंनीं सांगितलीं आहेत त्यांचा योग्य उपयोग करावा आणि आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावें. आत्मज्ञानामध्यें लीन झालेल्या पुरुषाला बाह्य जग हें इंद्रजाला प्रमाणें खोटें भासतें असें. पूज्यपादस्वामी इष्टोपदेशांत सांगतात.

निशामयति निःशेषमिंद्रजालोपमं जगत् ।
स्पृहयत्यात्मलाभाय गत्वान्यत्रानुतप्यते ॥ १ ॥
इच्छत्येकांतसंवासं निर्जनं जनितादरः ॥
निजकार्यवशात् किंचिदुक्त्वा विस्मरति द्रुतं ॥ २ ॥

भावार्थ—ज्या प्रमाणें गारुडि आपल्या चातुर्यानें प्रेक्षकांना अनेक प्रकार खोटे असताना खरे करून दाखवितो त्या प्रमाणें हें जग त्यांतील विषय खोटे असून खरे भासतात. वास्तविक पाहिलें असतां हें सर्व खोटें आहे. अशा दृष्टीनें साधु जगाकडे पाहतो. आपल्या शुद्ध आत्मानुभावाचीच इच्छा करितो आणि अनादि कालीन लागलेल्या संस्काराच्या योगानें आत्मा ज्यावेळीं परपदार्थांची इच्छा करितो त्या वेळीं पुनः हा साधु पश्चात्ताप करून आत्मज्ञानामध्येंच लीन होण्याचा प्रयत्न करितो व त्या करितां पर्वत, गुफा, वन अशा एकांत स्थळामध्यें राहण्याची इच्छा करितो व कांहीं कार्य असल्यास तेवढ्यापुरतें तो भाषण करितो आणि लवकरच त्या गोष्टी विसरून जातो व आपल्या आत्मानुभवामध्यें लीन होतो. असा साधु बाह्य क्रिया करीत असतांनाही तो करीत नाहीं असें पूज्यपाद स्वामी सांगतात.

ब्रुवन्नपि हि न ब्रूते गच्छन्नपि न गच्छति ॥
स्थिरीकृतात्मतत्त्वस्तु पश्यन्नपि न पश्यति ॥ १ ॥

भावार्थ- आत्मसंवेदनामध्यें जो स्थिर राहिलेला आहे असा साधु बोलत असतांनाही तो बोलत नाहीं. सिद्ध प्रतिमा वगैरे पाहात असतांही तो पाहात नाहीं. आहाराकरितां चालत असतांही तो चालत नाहीं. यावरून कित्येकांना असें वाटण्याचा संभव आहे कीं बोलणें, चालणें, पाहाणें या

क्रिया त्यांच्याकडून होत असतांनाही त्या त्यांच्याकडून होत नाहींत हें कसें? या विषयीं आचार्यांचें मत असें आहे कीं आत्मज्ञान प्राप्त करून घेणें हें साधूचें मुख्य कार्य असल्यानें बाकीच्या सर्व क्रिया गौण आहेत. एवढ्याकरितां आचार्य मुख्यतेच्या अपेक्षेनें सांगतात कीं,—

आत्मज्ञानात्परं कार्यं न बुद्धौ धारयेच्चिरम् ।
कुर्यादर्थवशात्किंचिद्वाक्कायाभ्यासतत्परः ॥ १ ॥

भावार्थ—साधूंनीं आपल्या बुद्धीचा उपयोग आत्मज्ञाना शिवाय दुसऱ्या कार्यामध्यें फार वेळ करूं नये आणि वेळ पडल्यास वचनयोग व काययोग यांच्या अभ्यासामध्यें तत्पर असावें. साधूंनीं बसतां, चालतां, निजतां, जेवतां, बोलतां आत्मज्ञानाकडे लक्ष्य लावावें. तें लक्ष्य इतकें गढून गेलें पाहिजे कीं, त्यावेळीं स्वतःच्या देहाची देखील त्याला खबर नसावी. याप्रमाणें आत्मानुभवामध्यें लीन असलेल्या साधूची स्थिति असते ही

किमिदं कीदृशं कस्य कस्मात्क्वेत्यविशेषयन् ।
स्वदेहमपि नावैति योगी योगपरायणः ॥ १ ॥

भावार्थ—ज्यावेळीं साधु शांतरसामध्यें निमग्न होतो त्यावेळीं आत्मिक सुख कसें आहे कशा तऱ्हेचें आहे तें कोणाला होतें व कोणाच्या साहाय्यानें होतें व त्याचा आधार काय इत्यादिक विकल्पच त्यावेळीं उत्पन्न होत नाहींत. फार कशाला, आत्मज्ञानामध्यें निमग्न झालेल्या साधुला स्वतःच्या शरीराची देखील खबर नसते मग बाह्य पदार्थांची काय कथा. या विषयीं म्हटलें आहे कीं.

तदा च परमैकाग्र्याद्बहिरर्थेषु सत्स्वपि ॥
अन्यन्न किंचनाभाति स्वमेवात्मनि पश्यतः ॥ १ ॥

भावार्थ— अनाकुलस्वरूपीं आत्मसंवेदनामध्येंच गढून गेल्यामुळें जगांत पुष्कळसे बाह्य पदार्थ असले तरी ते त्या साधुला दिसत नाहींत. स्वतःच्या आत्म्याला पाहणाऱ्या साधूचें लक्ष्य इतर पदार्थांकडे नसल्यानें त्या वेळीं आत्म्याशिवाय इतर पदार्थांचें ज्ञानच त्याला होत नाहीं म्हणजे

केवल आत्मस्वरूपामध्येंच तो स्थिर राहतो. मूळ ग्रंथकर्ते आचार्यांचा अभिप्राय हाच आहे कीं स्वपर पदार्थांचें ज्ञान करून घेऊन मोहाचा नाश कर आणि केवळ आपल्या अनुकूलरूप आत्मज्ञानामध्येंच स्थिर असें हें आत्मज्ञान ज्यांचें त्यासच होणार इतरांना त्याचा अनुभव येणें शक्य नाहीं. म्हणून तें स्वसंवेद्य आहे याचा अर्थ आपल्या आत्यालाच समजण्या जोगें आहे. यास्तव ज्यांना याचा अनुभव घ्यावयाचा आहे त्यांनीं स्वतःच स्व स्वरूपामध्यें स्थिर राहण्याचा प्रयत्न करावा.

— ० * ० —

स्वः स्वं स्वेन स्थितं स्वस्मै स्वस्मात्स्वस्याविनश्वरे ॥
स्वस्मिन् ध्यात्वा लभेत्स्वोत्थमानंदममृतं पदम्॥२५॥

अर्थ—आत्मा, स्वरूपांत असलेल्या आत्म्याला, आत्म्याच्या योगानें आत्म्याच्या हिताकरितां आत्म्यापासून आत्म्याचें अविनश्वर अशा आत्म्याच्या ठिकाणीं चिंतन करून आत्म्यापासून उत्पन्न होणारा आनंद ज्या ठिकाणीं आहे अशा अविनश्वर पदाचा स्वीकार करावा.

विशेष स्पष्टीकरण—या श्लोकांत आचार्यांनीं कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, संबंध आणि अधिकरण ज्यांचा अर्थ आहे अशा सातही विभक्ति एकाच ठिकाणीं घटित करून दाखविल्या आहेत. तें वरील अर्थावरून कळण्या सारखें आहे. " ज्याप्रमाणें आत्मा इतर पदार्थाला जाणतो. त्या प्रमाणें स्वतःला ही तो जाणतो जसें डोळ्याच्या साहायानें पदार्थाला जाणतो तसें आत्म्याच्या साहायानेंही आत्म्याला जाणता येतें. इतर जीवांच्या हिताकरितां जसा झटतो तसा स्वतःच्या हिताकरितांही त्याला झटता येते. इतरांपासुन जसा फायदा करून घेतो तसा स्वतःपासूनही याला फायदा करून घेता येतो. दुसऱ्या वस्तुचें जसें हा चिंतन करितो तसें याला आपल्या आत्म्याचेंहि चिंतन करितां येते. जसें परक्या नश्वर अशा शरीरामध्यें राहून हा चिंतन करितो तसें अविनश्वर अशा आत्म्यामध्येंहि स्थिर राहूनहि याला आत्म्याचें चिंतन करिता येतें. " असें नागसेन मुनिही म्हणतात.

स्वात्मानं स्वात्मनि स्वेन ध्यायेत् स्वस्मै स्वतो यतः ।
षट्कारकमयस्तस्माद् ध्यानमात्मैव निश्चयात् ॥ १ ॥

भावार्थ—स्वतःच्या आत्म्याच्या ठिकाणीं आत्म्याच्या योगानें स्वतःच्या हिताकरितां स्वतःच चिंतन करावें. निश्चयानें सहा कारकरूप आत्माच ध्यान आहे म्हणजे सहाही कारकामध्यें आत्म्याचाच उपयोग करणें तेंच ध्यान होय. असें ध्यान स्थिर राहिल्यानें या जीवाला खरा आनंद होतो असें श्रीमत्पूज्यपाद आचार्य सांगतात—

आत्मानुष्ठाननिष्ठस्य व्यवहारबहिःस्थितेः ।
जायते परमानंदः कश्चिद्योगेन योगिनः ॥ १ ॥
आनंदो निर्दहत्युद्धं कर्मेन्धनमनारतं ।
न चासौ खिद्यते योगी बहिर्दुःखेष्वचेतनः ॥ २ ॥

भावार्थ—ज्यावेळीं साधु परपदार्थाला सोडून स्वतःच्या आत्म्याच्या ठिकाणींच स्थिर राहतो त्यावेळीं बाह्य प्रवृत्तिनिवृत्ति—व्यवहारापासून तो पराङ्मुख असतो म्हणजे त्याचें लक्ष्य आत्म्याशिवाय दुसरीकडे जातच नाहीं. अशा वेळीं साधुला असा परमोत्कृष्ट आनंद होतो कीं ज्याचें वर्णन जिव्हेनें करूं म्हटल्यास होणें शक्य नाहीं. त्याचें वर्णन करण्यास वचन समर्थ नाहीं. असा हा जो आनंद आहे तो सदैव कर्मरूपी लाकडाला पार जाळून भस्म करून टाकतो. आत्मानंदामध्यें निमग्न असलेला हा साधु बाह्य परिषह, उपसर्ग, कायक्लेश इत्यादि दुःखाकडे त्याची दृष्टी नसल्यानें तो कधींच कष्टी होत नाहीं. अशा रीतीनें आत्म्यामध्यें स्थिर राहिल्यानें खरें जें मोक्षपद तें या जीवाला प्राप्त होत असल्यानें त्या सुखापुढें स्वर्गांतील सुख म्हणजे कांहींच नव्हे असें श्री नागसेन मुनि म्हणतात.

यदत्र चक्रिणां सौख्यं यच्च स्वर्गे दिवौकसां ॥
कलयाऽपि न तत्तुल्यं सुखस्य परमात्मनाम् ॥ १ ॥

भावार्थ—याप्रमाणे मनुष्यलोकांतील चक्रवर्तीचें सौख्य आणि स्वर्गातील देवलोकांचे सौख्य हें परमात्म्याच्या सुखाच्या एका पासंगाचीही बरोबरी करूं शकत नाहीं. यावरून मोक्षसुखाविषयीं कल्पना झाली असेल कीं त्या सुखाशी बरोबरी करण्याला इतर कोणतेंच सुख समर्थ नाहीं. असलें हें सुख दुसरीकडे कोठें नसून आपल्या आत्म्याच्या ठिकाणींच वसलेलें आहे. त्याला शोधण्याकरितां दुसरीकडे कोठें जाण्याची आवश्यकता नाहीं. हें जाणून आत्मानुभवामध्येंच लीन होऊन परमात्मपद मिळविलें पाहिजे.

....० ៰ ०....

इति स्वतत्त्वं परिभाव्य वाङ्मयम् ।
य एतदाख्याति शृणोति चादरात् ॥
करोति तस्मै परमार्थसंपदम् ।
स्वरूपसंबोधनपंचविंशतिः ॥ २६ ॥

अर्थ— या ग्रंथांत वर्णन केल्याप्रमाणें आत्मस्वरूपाचें वर्णन ज्यांत आहे अशा या शास्त्राचें परिशीलन करून जो विनयानें याचें वर्णन करितो आणि हें ऐकतो त्याला हा पंचवीस श्लोकांचा स्वरूपसंबोधन नावाचा ग्रंथ परमार्थ संपत्ति म्हणजे मोक्षरूपी संपत्ति देतो.

भावार्थ—या श्लोकामध्यें श्रीभट्टाकलंकाचार्यांनीं ग्रंथाचें नांव, महत्व, परिणाम, फल आणि सर्व ग्रंथाचा थोडक्यांत सारांश सांगून त्या बरोबर ग्रंथाचा विनयही करावयास सुचविलें आहे तें असें 'स्व तत्वं वाङ्मयं' एवढ्यावरून हें स्पष्ट होतें कीं या ग्रंथमध्यें आत्मस्वरूपाचें वर्णन केलें गेलें आहे. आणि या ग्रंथाचें परिशीलन करा तसेंच दुसऱ्यांना समजावून सांगा, ऐका, ऐकवा असें आचार्य सांगतात. तें योग्यही आहे कारण त्यांनीं मोठ्या परिश्रमानें व विद्वत्तेनें जो ग्रंथ लिहिला तो कशाकरितां ? तर त्यांच्या परिश्रमाचा फायदा इतर जनांना मिळावा व त्यायोगें खरें कल्याण

यांतही हाच एक मुख्य हेतु आहे त्याप्रमाणें मीही आपल्या अल्प बुद्धीस अनुसरून आपल्या धर्म बंधु करितां या ग्रंथाचें मराठींत भाषांतर केलें आहे याचा उपयोग मूळ ग्रंथाप्रमाणें धर्मबंधूनीं करून घ्यावा. मोक्षा प्राप्ति करून देणें या ग्रंथाचें महत्व आहे. या ग्रंथांत श्लोक पंचवी असून स्वरूप संबोधन हें या ग्रंथाचें नांव आहे. सर्व श्लोकांच्या शेव टच्या चरणावरून व्यक्त होतें त्याचप्रमाणें 'आदरात्'. या पदावरू आदरपूर्वक उपयोग करावा हें सिद्ध होतें.
